नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक ३५८ * * अमरावती * सोमवार, दिनांक २३ जून २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## एअर इंडियाचा परवाना रद्द करण्याचा इशारा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २२ :

नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने एअर इंडियाला एक गंभीर इशारा दिला आहे की, जर उड्डाण ऑपरेशन्समध्ये अनियमितता सुरू राहिली, तर एअरलाइनचा परवाना निलंबित केला जाऊ शकतो किंवा तो रद्दही केला जाऊ शकतो. मीडिया रिपोर्ट्सनुसार, पायलट ड्युटी शेड्यूलिंग आणि देखरेखीमध्ये सतत आणि गंभीर उल्लंघनांमुळे हे पाऊल उचलण्यात आले आहे. शनिवारी, डीजीसीएच्या आदेशानुसार, एअर इंडियाने ३ अधिकाऱ्यांना काढून टाकले होते. यामध्ये विभागीय उपाध्यक्ष चुडा सिंग, क्रू शेड्युलिंग हाताळणारी मुख्य व्यवस्थापक पिंकी मित्तल आणि क्रू शेड्युलिंगच्या नियोजनाशी संबंधित पायल अरोरा यांचा समावेश आहे.

Afiffi»fZEf

## खरीखरी..

### तिसऱ्या महायुद्धाच्या वाटेवर...

ट्रम्प नावाच्या एका बावळट माणसाने इराणच्या तीन अणुऊर्जा केंद्रांवर दणादण बॉम्ब टाकले. या ट्रम्पाने टाकलेले बॉम्ब म्हणजेच, तीनही ठिकाणी वापरलेली मिसाईल्स त्याचा इराणवर काहीच परिणाम झाला नाही. असे खुद्द इराणने जाहीर केले आहे. आमच्या अणू कार्यक्रमावर अशा प्रकारचे हल्ले कोणताही प्रभाव टाकू शकणार नाहीत. असेही इराणच्या खोमेनी यांनी जाहीर केलेले आहे. त्यापुढे खोमेनी म्हणतात की, युद्ध तुम्ही सुरू केले. आता आम्ही ते संपवू. भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे पहाटे दोन वाजता अमेरिकेने इराणवर हल्ला केला. त्यानंतर दोन तासातच आपल्या महाभयानक खैबरच्या बरोबरीने तीन डझन मिसाईल इस्त्रायलवर डागून इस्त्रायलची अत्यंत भीषण अवस्था करून टाकली आहे. त्यामध्ये इस्त्रायलची जी हानी झालेली आहे. ती खूप प्रचंड प्रमाणात आहे. आता इराणने जाहीर करून टाकलेले आहे की, ज्या ज्या ठिकाणी अमेरिकेचे सैनिक अड्डे आहेत. त्या त्या ठिकाणी इराण हल्ले करणार आहे. तिकडे अमेरिकेमध्ये अध्यक्षपदावर विराजमान झालेल्या हेकडी स्वभावाच्या ट्रम्प यांच्याविरुद्ध अमेरिकन जनताच रस्त्यावर उतरलेली आहे. अमेरिकन काँग्रेसची मंजुरी न घेता अर्धवट हल्ला करून ट्रम्पने जो मूर्खपणा केलेला आहे. त्यामुळे आता अमेरिकेला नुकसान भोगावे लागेल. इकडे इराणच्या समर्थनार्थ रशिया, चीन आणि उत्तर कोरिया उघडपणे समोर आलेले आहेत. सौदी अरेबिया, इराक, कुवेत, बहरीन वगैरे सारख्या सातआठ ठिकाणी अमेरिकेचे सैनिकी तळ आहेत. हे सैनिकी तळ किंवा अमेरिकेचे अड्डे इराणला उध्वस्त करणे सहज शक्य आहे. त्याची प्रचिती इस्त्रायलवरवर हल्ला करून इराणने दाखवून दिलेली आहे. केवळ इस्त्रायलची राजधानीच नाही. तर इतर १४ शहरांवर केलेल्या इराणच्या हल्लूयांमुळे इस्त्रायलचे जबरदस्त नुकसान झालेले दिसत आहे. इराक जवळ घातक रासायनिक बॉम्ब आहेत. असे यापूर्वी अमेरिकेने घोषित करून टाकले होते. त्यासाठी काही वर्षांपूर्वी अमेरिकेने इराकवर सुद्धा हल्ला करून सद्दाम हुसेन यांना ठार मारले होते. पण त्यानंतर इराककडे अशी घातक शस्त्रे नाहीत. असे सार्वजनिकरित्या अमेरिकेला सांगावे लागले. अगदी तसाच प्रकार अमेरिकेच्या या बिनडोक अध्यक्षांनी म्हणजेच ट्रम्पाने इराणबाबत करून दाखवलेला आहे. इराण हे इराकपेक्षा कितीतरी पटीने मोठे आणि समृद्धीसंपन्न राष्ट्र आहे. त्यामुळे त्यावेळी अमेरिकेच्या दादागिरी विरुद्ध कोणताही देश समोर येऊन बोलत नव्हता. मात्र आता तशी स्थिती किंवा परिस्थिती अजिबात नाही. अत्यंत भांडकुदळ इस्त्रायलने आतापर्यंत कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याची तमा बाळगली नव्हती. गाझातील नागरिकांना अन्नधान्यही मिळू नये. म्हणून युद्धखोर नेत्यान्याहूचा राक्षसीपणा तसाच चालू होता. आता इराणने हल्ला केल्यावरती इस्त्रायलला आंतरराष्ट्रीय कायदे आठवत आहेत. इराणकडून अमेरिकेचे काय वाकडे होईल. हे बहुधा ट्रम्पला ठाऊक असेल. पण इराणचे असेच जबरदस्त बॉम्ब हल्ले सुरू राहिले. तर आत्तापर्यंत फुकटची दादागिरी करणाऱ्या इस्त्रायलचे काय होणार, याचे उत्तर बहुधा ट्रम्पालाही ठाऊक नसेल. दुसऱ्या जागतिक महायुद्धात जर्मनी, इटली आणि जपान यांच्याविरुद्ध संपूर्ण जग होते. यावेळी मात्र अमेरिकेच्या भैताडपणामुळे हे जग विभागले जाणार आहे. मुख्य मुद्दा असा की खुद्द अमेरिकेतच ट्रम्प यांच्या मूर्खपणाचे प्रदर्शन थांबवण्यासाठी अमेरिकेतील जनताच निदर्शन करीत आहे. एकूण परिस्थिती पाहता अमेरिकेने तिसऱ्या महायुद्धाची नांदी घोषित करून टाकली आहे काय, असाच प्रश्न जगातील शांतता प्रेमींना पडला असेल. आता इराणने अमेरिकेवर किंवा त्यांच्या अड्डयांवर कोणताही प्रहार न करता केवळ इस्त्रायलवरच धडाधड मिसाइलबाजी सुरू केलेली आहे. ती जर अशीच सुरू राहिली. तर पुढील दोन-चार दिवसात इस्त्रायलला केवळ दगड-धोंड्याचा प्रदेश म्हणून स्वतःकडे बघावे लागेल. नेत्यानाहूने कितीही आव आणला. तरी इराण त्याला भाव देईल असे अजिबात वाटत नाही. तिकडे ताव खाऊन अमेरिकेने १४ दिवसाचा अल्टिमेटम देऊनही दोन-तीन दिवसातच जो हल्ला केलेला आहे. त्याचा बदला घेण्यासाठी इराणला घाई नाही. पण अमेरिकेने पुन्हा हल्ला केला तर मात्र जागतिक युद्धाला तोंड फुटेल. भविष्यात कोणकोण भस्मसात होईल आणि काय काय विनाशाची लक्षणे दिसू लागतील. याची कल्पना करणेही कठीण आहे. या वेडपट ट्रम्पने युद्धात जम्प तर मारली. पण इराणच्या बम्पमुळे त्याचाच पाय फ्रॅक्चर झालेला आहे. हे त्या लंगड्याला कोण सांगणार. विनोबाजी म्हणतात त्याप्रमाणे भारतात आपण म्हणूया. जय जगत!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# इराणच्या ३ अणुतळांवर अमेरिकेचा बॉम्बहल्ला



१४ इस्त्रायली शहरांवर इराणने डागली क्षेपणास्त्रे : पंतप्रधान मोदींनी साधला इराणी राष्ट्राध्यक्षांशी संवाद

■ वृत्तसंस्था
तेहरान/तेल अवीव, दि. २२ :

अमेरिकेने इराणमधील ३ अणु तळांवर हल्ला केला आहे. यामध्ये फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान यांचा समावेश आहे. भारतीय वेळेनुसार रविवारी पहाटे ४:३० वाजता हा हल्ला झाला.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ही माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की फोर्डोवर बॉम्बचा संपूर्ण साठा टाकण्यात आला. ट्रम्प यांनी लिहिले, सर्व विमाने सुरक्षितपणे घरी परतत आहेत. आमच्या महान अमेरिकन योद्धयांचे अभिनंदन. जगात असे दुसरे कोणतेही सैन्य नाही जे हे करू शकले असते. आता शांततेची वेळ आली आहे.



त्यांनी दुसऱ्या पोस्टमध्ये म्हटले आहे की इराणने आता हे युद्ध संपवण्यास सहमती दर्शवावी. ट्रम्प यांनी रविवारी सकाळी देशाला संबोधित केले. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की आता इराणने शांतता करावी. जर त्यांनी असे केले नाही तर त्यांच्यावर आणखी मोठे हल्ले केले जातील.

**इराणमध्ये ६५७ तर इस्त्रायलमध्ये २४ जणांचा मृत्यू**

इस्त्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या संघर्षाचा रविवार हा १० वा दिवस होता. १३ जूनपासून इस्त्रायलने १० इराणी अणुशास्त्रज्ञांना ठार मारले आहे. इस्त्रायल डिफेन्स फोर्सने शनिवारी इराणी सैन्याचे ३ कमांडर आणि ४ सैनिक मारल्याचा दावाही केला आहे.

अमेरिकास्थित ह्युमन राईट्स ॲक्टिव्हिस्ट्स न्यूज एजन्सीनुसार, १३ जूनपासून इराणमध्ये ६५७ लोकांचा मृत्यू झाला आहे आणि २००० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

तथापि, इराणच्या आरोग्य मंत्रालयाने पुष्टी केली आहे की केवळ ४३० नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि ३,५०० जखमी झाले आहेत. दरम्यान, इस्त्रायलमध्ये २४ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर ९०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

दुसरीकडे, भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इराणचे राष्ट्राध्यक्ष अयातुल्ला खोमेनी यांचेशी दुरध्वनीद्वारे संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेतली.

# विध्वंस आणि विध्वंस!



■ वृत्तसंस्था, तेल अवीव, दि. २२ :

दक्षिण इस्त्रायलमधील बेअरशेबा येथे सोरोका हॉस्पिटल आहे. ज्यामध्ये सुमारे १००० बेड आहेत. सकाळी ७:३० वाजता इराणी क्षेपणास्त्र या हॉस्पिटलवर पडले आणि संपूर्ण इमारत उद्धवस्त झाली. हॉस्पिटलची उपकरणे बाहेर विखुरलेली आहेत. बेअरशेबा व्यतिरिक्त, इस्त्रायलमधील तेल अवीव, हैफा आणि रिशोन लेझिओनमध्येही असाच विध्वंस दिसून येतो. कोणतेही ठिकाण सुरक्षित नाही.

इराणच्या हल्ल्यात सोरोका रुग्णालय पूर्णपणे उद्धवस्त झाले. रुग्णालयाजवळ इस्त्रायली लष्कराचे तळ असल्याचा दावा इराणने केला आहे.

इस्त्रायलमध्ये असलेले अनेक भारतीय भयभीत आहेत . त्यात बिहारमधून कामासाठी इस्त्रायलला गेलेले कामगार समाविष्ट आहेत. ते म्हणतात की जर असेच क्षेपणास्त्रे पडत राहिली तर आम्ही लवकरच आमचे काम सोडून भारतात परतू, दरम्यान,



दोन्ही देशांमध्ये सध्या विध्वंस आणि फक्त विध्वंस होतो आहे.

## हुंडा घेतला तर लग्नाला जाऊ नका सुप्रिया सुळेंचा हुंडा विरोधात थेट इशारा

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २२ :

मुलगी आत्महत्या करते आणि आपण अजूनही हुंड्याविषयी बोलतोय, हीच आपल्या समाजाची शोकांतिका आहे, अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी हुंडा प्रथेवर ताशेरे ओढले. तर महाराष्ट्र हुंडामुक्त व्हावा यासाठी समाजाच्या सर्व स्तरावर प्रयत्न होणं आवश्यक आहे. पुण्यात एका सुशिक्षित कुटुंबातील मुलीने केवळ हुंड्याच्या दबावामुळे आत्महत्या केल्याच्या पार्श्वभूमीवर त्या बोलत होत्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, लग्न समारंभात जाताना हुंडा घेतला किंवा दिला आहे का, याचा विचार करावा. जर हुंडा घेतला असेल तर अशा लग्नात सहभागी होऊ नये. लग्नाच्या रुखवतात गाडी दिसली, तर ती कोणी दिली, कोणाच्या नावावर आहे, हे विचारणे गरजेचे आहे. अशा प्रकारे प्रश्न विचारले गेले तरच समाजात योग्य संदेश जाईल.सुळे यांनी जुलै महिन्यापासून पुढील एक वर्ष राज्यभर शाळा, कॉलेज आणि विविध संस्था यांच्यामार्फत हुंडाविरोधी जनजागृती मोहीम राबवण्याची घोषणा केली. या मोहिमेद्वारे



तरुण-तरुणींसह पालकांमध्येही जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

पुण्यात घडलेली आत्महत्येची घटना एका सुशिक्षित कुटुंबातली आहे. या घटनेबाबत बोलताना सुळे म्हणाल्या की, आजही काही कुटुंबांत सून माहेरी गेल्यावर गाडी, मोबाईल, इतर वस्तू घेऊन याव्यात यासाठी तिला दबाव टाकला जातो, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे, मोबाईल हवा असेल तर स्वतःच्या पैशातून घ्या असे त्यांनी म्हटले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेतून महिलांना पैसे मिळाले, हे सकारात्मक आहे. मात्र त्यातून महिलांच्या आयुष्यात मोठा बदल झाला का, हे पाहणे गरजेचे आहे.

## वाल्मीक कराडची प्रकृती बिघडली वैद्यकीय पथक जेलमध्ये दाखल

■ महासागर प्रतिनिधी,
बीड, दि. २२ :



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडची बीड तुरुंगात प्रकृती बिघडली आहे. त्याची तुरुंगातच वैद्यकीय पथकाकडून तपासणी करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, कराडला शुगर आणि कमी रक्तदाबाचा त्रास जाणवत आहे. सध्या वैद्यकीय पथक त्याच्यावर लक्ष ठेवून आहे आणि तब्येतीत अधिक बिघाड झाल्यास त्याला रुग्णालयात दाखल केले जाण्याची शक्यता आहे.

माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून वाल्मीक कराड ओळखले जातात. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर धनंजय मुंडे यांच्यावर मंत्रिपदाचा राजीनामा देण्याचा दबाव निर्माण झाला होता. अखेरीस त्यांनी प्रकृती कारण पुढे करत मंत्रिपदाचा राजीनामा दिला. दरम्यान, वाल्मीक कराडला कठोर शिक्षा व्हावी यासाठी या प्रकरणाचे वकीलपत्र प्रसिद्ध सरकारी वकील उज्वल निकम यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. वाल्मीक कराडला बीडच्या तुरुंगात व्हीआयपी ट्रिटमेंट दिली जात असल्याचा आरोप निलंबित पीएसआय रणजित कासले यांनी केला आहे.

कासले यांनी सांगितले की, कराडसाठी तुरुंगात विशेष सुखसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याला झोपण्यासाठी अतिरिक्त पांघरूण दिले जाते, चहा पिण्यासाठी वेगळा कप वापरतो, तसेच इतर कैद्यांच्या नावावर तो रेशन घेतो. कराडवर खरोखर कारवाई करायची असेल, तर त्याची तात्काळ दुसऱ्या तुरुंगात रवानगी करावी, अशी मागणी कासले यांनी केली आहे.

## चाकूने भोसकून वाहन चालकाची हत्या

### आरोपी अटकेत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २२ :

क्षुल्लक कारणावरून दोन वाहन चालकांमध्ये वाद झाला. वाद विकोपाला जाऊन हाणामारीत त्याचे रुपांतर झाले. या दरम्यान एकाने दुसऱ्याची चाकूने भोसकून निर्घृण हत्या केली. ही थरारक घटना कळमना मार्केट यार्डच्या धान्य बाजार परिसरात घडली. रवी पुनाराम वाघमारे (३१) रा. चिखली, कळमना असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपी वाहन चालकाला अटक केली आहे. किशोर ज्ञानेश्वर ठाकरे (३८) रा. वकीलपेठ, इमामवाडा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

किशोर आणि रवी हे दोघेही कळमना बाजार परिसरात ट्रांसपोर्टरचे वाहन चालवतात. शनिवारी रात्री ९.४० वाजताच्या सुमारास किशोर धान्य बाजारच्या खल्ला क्र. १२ जवळ हमाल आणि इतर चालकांसोबत बसलेला होता. या दरम्यान रवी हा सुद्धा तेथे आला. किशोरशी आधीपासूनच त्याचे पटत नव्हते. त्यामुळे तो किशोरला पाहताच चिडला आणि तेथे बसण्यास मनाई केली. किशोरनेही जशास तसे उत्तर दिले. दोघेही दारूच्या नशेत असल्याने हा वाद चिघळला. बाचाबाचीचे रुपांतर हाणामारीत झाले. त्याच दरम्यान रवीने छोटा चाकू काढून किशोरवर हल्ला केला.

# मुख्यमंत्री फडणवीस व केंद्रीयमंत्री गडकरी यांनी घेतला शहरातील विविध विकास कामांचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :

नागनदीतील प्रदूषणावर प्रतिबंध घालण्यासाठी शहरातील व्हीएनआयटी व डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या (पीकेव्ही) जागेमध्ये उभारण्यात येणार्या सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या (एसटीपी) कामांना गती द्यावी तसेच इतर शहरातील पाणी पुरवठा, सीसीटीव्ही प्रणालीचे काम तात्काळ पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (ता. २२ जून) दिले.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शहरातील विविध विकास कामांचा आढावा घेतला. यावेळी राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, नगरविकास खात्याचे प्रधान सचिव . गोविंदराज के. एच, महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे (एमएसआयडीसी) व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीणा, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, यांच्यासह महापालिका, एनआयटी, महावितरण, जिल्हाधिकारी

### शहरातील दोन्ही एसटीपी प्रकल्पांच्या कामांना गती

**मुख्यमंत्री फडणवीस व केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचे निर्देश**

कार्यालय व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

व्हीएनआयटीच्या जागेत तसेच पीकेव्हीच्या जागेत उभारण्यात येणारे हे एसटीपी प्रकल्प मुंबईतील धारावीच्या धर्तीवर कमी जागेमध्ये उभारण्यात यावे, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

हे प्रकल्प त्वरित पूर्ण करण्यासाठी टीसीएसने त्वरित अहवाल सादर करावा, असे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले. पाण्याच्या टाक्यांमधून कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने अनेक भागाला पाणी मिळत नाही. यावर उपाययोजना करण्याचे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले.

शहरातील एकात्मिक वाहतूक व्यवस्थापनाअंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरा प्रणालीचा आढावा यावेळी घेण्यात आला. बंद असलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करण्यासाठी सहा पथके काम करीत असून येत्या दोन महिन्यात सर्व सीसीटीव्ही कॅमेरे सुरू होतील, असे महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी यावेळी सांगितले.

नागपूर शहराचा भविष्यातील विकास लक्षात घेऊन हा डीपीआर तयार करावा, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. महापालिकेने विकास कामे केल्यानंतर महावितरण तर्फे रस्त्यांचे खोदकाम केलेल्या ठिकाणी रस्त्याचे कामे त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.



# देवाभाऊ पुढचे १०० वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा : नितेश राणे



**मुंबई :** आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यामुळे, देवाभाऊ पुढचे 100 वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा, असा सल्ला भाजप नेते व मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी कोळी बांधवांना दिला आहे. वेसावा खाडीजवळ स्थानिक मच्छीमारांची भेट घेऊन राणेंनी चर्चा केली. यावेळी त्यांनी हे विधान केले आहे. नितेश राणे म्हणाले, मी राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून आलेलो आहे. आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यामुळे, देवाभाऊ पुढचे 100 वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा, असा सल्ला त्यांनी कोळी बांधवांना दिला. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वतुर्ळात पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. पुढे बोलताना नितेश राणे म्हणाले, मत्स्य व्यवसायाला कृषी चा दर्जा मिळावा ही मागणी वषार्नुवर्ष आहे. राज्यात महायुतीचे सरकार आले आणि पहिल्या 100 दिवसात मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. आपण आधी सरकार म्हणून मदत मागायला जायचो तेव्हा अधिकारी हात आकडते घ्यायचे, तुटपुंजी मदत द्यायचे. पण, डहाणूमध्ये 1 कोटी 89 लाख रुपयांचे नुकसान झाले. त्यावेळी मी मदत पुनर्वसन मंत्र्यांकडे गेलो आणि नुकसान जास्तीत जास्त भरून देण्याचे ठरविले. जर आधीच्या अनुषंगाने मदत केली तर मच्छिमारांचा अपमान आहे. मी मुख्यमंत्र्यांना सांगितले त्यांनी आदेश दिले आणि आता 100 टक्के नुकसान भरपाई देण्याचे ठरविले. मी गुजरातवरुन थेट तुमचे आशीर्वाद घ्यायला आलो आहे. आता कोणीतीही चिंता करू नका जास्तीत जास्त नुकसान भरपाई देऊ. आम्ही ड्रोनने पाहणी करत आहोत, जेणेकरून एलईडी वाल्यांच्या ढुंगणाला आग लागेल. जर कोणताही अधिकारी कोणाकडूनही वजन घेत असेल तर त्याला असा जिल्हा देईल की पुन्हा मासे दिसणार नाहीत.

# अपर परिवहन आयुक्तांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करा

## रोहित पवारांनी पाठवले फडणवीसांना पत्र



**मुंबई :** अपर परिवहन आयुक्तांवरील भ्रष्टाचाराचे पुरावे देऊन गेल्या अधिवेशनात आवाज उठवूनही चौकशी का होत नाही, असे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे. पुरावे म्हणून कागदपत्रे पाठवत असून प्रभारी अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर यांच्यावरील आरोपाची सखोल चौकशीची मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. शासकीय अधिकाऱ्यास पदोन्नती देताना त्यांची सचोटी निःसंशय चांगली असणे आवश्यक आहे. मात्र, कळसकर यांची सचोटी संशयास्पद असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. रडार कॅमेरा घोटाळा, एचएसआरपी नंबर प्लेट घोटाळा, जीपीआरएस किट घोटाळ्यांसह अनेक आरोप त्यांच्यावर आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाचा दाखला देत अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात फौजदारी आरोपाचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असताना पदोन्नती देण्यात प्रतिबंध आहे. अशा वेळी अधिकाऱ्यांची विभागीय पदोन्नती समितीने केलेले मूल्यमापन आणि दिलेली प्रतवारी सीलबंद पाकिटात ठेवण्याची तरतूद आहे. त्यामुळे न्यायालयात प्रलंबित प्रकरण फौजदारी असल्याने कळसकर पदोन्नतीस पात्र ठरत नसल्याचा आरोप पवार यांनी या पत्रातून केला.

# क्षमतेप्रमाणे संधी दिली जात नाही : भास्कर जाधव



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा आमदार भास्कर जाधव यांनी अलीकडेच राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले असून, त्याचबरोबर त्यांना पक्षात डावलले जात असल्याची भावना व्यक्त केली आहे. क्षमतेप्रमाणे संधी दिली जात नाही, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली. तसेच शरद पवार यांची साथ सोडणे हे कधीकधी चुकीचे वाटते, असेही वक्तव्य त्यांनी केले होते. तसेच संजय राऊत यांनी देखील भास्कर जाधव यांनी खंत व्यक्त केली असून पक्षप्रमुख दखल घेतील असे म्हटले आहे. भास्कर जाधव म्हणाले, शरद पवार यांची साथ सोडली, त्यामुळे मला काहीतरी चुकल्यासारखे वाटते, असे अजिबात नाही. तसे स्पष्टीकरण मी दिलेले आहे. मी शरद पवार यांना सोडल्याचा निर्णय चुकीचा होता, हे मी स्पष्टपणे बोललो. पण मला त्याची खंत वाटते असे अजिबात नाही. मला मंत्रिपद मिळायला पाहिजे होते, मी तेव्हा बोललो. मी आजही बोलेन. उद्याही बोलेन. मला मंत्रिपद का मिळायला नको, हे मला कोणी सांगायला हवे. मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून काय रडत बसायचा का? उलट लढायचं. मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून मी जे फुटून गेले त्यांच्याबरोबरही मी गेलो नाही. मी लढत आहे. संजय राऊत म्हणाले, भास्कर जाधव काय बोलले. हे त्यांचे वक्तव्य मी ऐकलेले नाही.

# आगामी निवडणुकीसाठी ओबीसींनी एकत्रित यावे : हेमंत पाटील



**मुंबई :** राज्यात गेल्या काही काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे.अशात ओबीसी तसेच राज्यातील उपेक्षित वगार्साठी लढणाऱ्या संघटना,पक्षांनी एकत्रित येऊन निवडणूक लढवावी, असे आवाहन इंडिया अगेन्स्ट करप्शन चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी रविवारी (ता.२२) केले. ओबीसी एकजुटीचे आवाहन करीत पाटील यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नवा सहभाग, नव्या अपेक्षा व्यक्त केल्या. राज्यातील ओबीसी समाज, तसेच उपेक्षित आणि मागासवर्गीय घटकांनी यंदाच्या स्थानिक निवडणुकांमध्ये आपले नेतृत्व सक्षमपणे उभे करावे. हे आवाहन कुठलाही राजकीय पक्ष किंवा सरकार विरोधात नसून, समाजहितासाठी सकारात्मक भूमिका बजावणाऱ्या नेतृत्वाची गरज ओळखून केले असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. राज्यात ओबीसी समाजाची लोकसंख्या ५० टक्क्यांहून अधिक आहे.परंतु विधानसभेपासून ते स्थानिक स्वराज्य संस्था पातळीपर्यंत त्यांचे राजकीय प्रतिनिधित्व तुलनेने कमी आहे. हे चित्र बदलण्यासाठी विविध समाजघटकांनी संघटित होणे गरजेचे असल्याचे पाटील म्हणाले. विचारधारेवर आधारित, पारदर्शक आणि जनतेच्या प्रश्नांशी बांधिलकी ठेवणाऱ्या नेतृत्वाने पुढे यावे.समाजाने आता फक्त मतदानापुरता नव्हे, तर खंबीर नेतृत्व घडविण्याच्या दिशेनेही विचार करावा,असे आवाहन पाटील यांनी केले. राज्यातील सध्याची राजकीय परिस्थितीही बदलती आहे. विविध पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्यासंदर्भात चाचपणी करीत आहेत. अशावेळी ओबीसी नेतृत्वाने एकत्र येऊन स्वतंत्र आघाडी तयार केली, तर नवीन राजकीय समीकरण तयार होतील. येत्या काळात ओबीसींच्या राजकीय एकीकरणाची दिशा ठरवण्यासाठी हे आवाहन असल्याचे पाटील पाटील म्हणाले.

# हिंगोली जिल्ह्यातील वादळी वाऱ्यामुळे १५७७ हेक्टरचे नुकसान

## मदतीसाठी लागणार ५.७७ कोटी रुपये, शासनाकडे अहवाल सादर

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. २२ :** हिंगोली जिल्ह्यातील वसमत व कळमनुरी तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे तब्बल 1577 हेक्टर क्षेत्राच्या केळी व पपई पिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले असून या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 5.77 कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सासनाकडे सादर करण्यात आला आहे.



हिंगोली जिल्ह्यातील वसमत व कळमनुरी तालुक्यात केळीचे पिक घेतले जाते. यावर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून केळीचे पिक काढणीसाठी आले असतांनाच ता. 9 जून रोजी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बागाच उध्वस्त झाल्या आहेत.

यामध्ये प्रामुख्याने कळमनुरी तालुक्यातील डिग्रस बुद्रूक, डोंगरकडा, सालापूर, रेडगाव, वडगाव, जवळपांचाळ, भाटेगाव यासह परिसरातील गावांचा समावेश आहे. तर वसमत तालुक्यातील कुरूंदा, गिरगाव यासह परिसरातील गावांचा समावेश आहे. दरम्यान, वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या होत्या.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार जीवककुमार कांबळे, शारदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने पंचनामे सुरु केले होते. यामध्ये कळमनुरी तालुक्यात 1049 हेक्टर वरील फळबागांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले असून वसमत तालुक्यात 528 हेक्टरवरील फळबागांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या संदर्भातील अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 5.77 कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत नुकसानीची माहिती शासनाकडे सादर केली आहे. आता नुकसानीच्या मदतीसाठी निधी कधी उपलब्ध होणार याची प्रतिक्षा शेतकऱ्यांना लागली आहे.

# कोकण, घाटमाथ्यावर अतिमुसळधार पावसाचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** मागील काही दिवस संपूर्ण राज्यात मुसळधार पाऊस कोसळल्यानंतर आता काही भागात पावसाचा जोर ओसरला आहे. कोकण तसेच घाटमाथ्यावर आज अतिमुसळधार पावसाचा इशारा (ऑरेंज अलर्ट) देण्यात आला आहे. दरम्यान, उर्वरित भागात पावसाचा जोर कमी राहणार आहे.

गेल्या आठवड्यात नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी वाटचाल केल्यानंतर संपूर्ण राज्यात पावसाचा जोर वाढला होता. काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर पावसाचा जोर ओसरला आहे. आज कोकण आणि घाटमाथ्यावर अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याचबरोबर विदर्भातही काही भागात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, कोकण आणि घाटमाथ्यावर पाऊस अधूनमधून कोसळत आहे. उर्वरित भागात मात्र पावसाने उघडीप दिली आहे. रायगड, रत्नागिरी, पुणे या भागात आज अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. तर मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग , सातारा आणि कोल्हापूर परिसरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी देशाचा बहुतांश भाग व्यापला आहे. मोसमी वाऱ्यांनी शुक्रवारी (२० जून) मध्य प्रदेश, बिहार आणि उत्तर प्रदेश व्यापून, पश्चिम उत्तर प्रदेशचा आणखी काही भाग , उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशचा बहुतांश भाग आणि जम्मू काश्मीरच्या काही भागात प्रगती केली. त्यानंतर शनिवारी मोसमी वारे एकाच जागी होती.

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात यंदा मोसमी पावसाच्या सुरुवातीच्या टप्प्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. कोकणात १ ते २० जून या कालावधीत सरासरीच्या ३७ टक्के जास्त पाऊस झाला आहे.

तर मध्य महाराष्ट्रात सरासरीच्या ३८ टक्के जास्त पाऊस झाला आहे.कोकणात २० जूनपर्यंत ५३४.३ मिमी, तर मध्य महाराष्ट्रात १२८.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. साधारण या कालावधीत कोकणात ३९१ मिमी, तर मध्य महाराष्ट्रात ९३.३ मिमी पाऊस पडणे अपेक्षित असते. यंदा राज्यात मोसमी पाऊस लवकर दाखल झाला. त्यानंतर पावसाचा जोर प्रामुख्याने कोकणात सर्वाधिक होता.

## पालखी सोहळ्यात महिलांच्या दागिन्यांची चोरी

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :** पुण्यातील बोपोडी चौक आणि खडकी परिसरात पालखी सोहळ्यादरम्यान महिलांच्या दागिन्यांची चोरी झाली आहे. श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या एका ६८ वर्षीय महिलेने खडकी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदवली आहे. दर्शनासाठी जमलेल्या गदीर्चा फायदा घेत चोरट्यांनी तक्रारदार महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबवले. याच सोहळ्यात आणखी एका महिलेच्या दागिन्यांची चोरी झाली. अशा घटना टाळण्यासाठी पोलिसांनी साध्या वेशातील कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त पालखी मार्गावर तैनात केला आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणीही पोलिसांची गस्त सुरू आहे. औषध विक्री दुकानाचे दरवाजा उचकटून चोरट्यांनी गल्ल्यातील एक लाख २८ हजारांची रक्कम चोरून नेल्याची घटना कर्वे रस्त्यावर घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तीन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्वे रस्त्यावरील गरवारे महाविद्यालय परिसरात पुनमचंद मेडीकल शॉप हे औषध विक्री दुकान आहे.

# ८ वर्षाच्या मुलीचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकाला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** गृहपाठ देण्याच्या बहाण्याने ८ वर्षाच्या मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी ५४ वर्षीय शिक्षकाला कांजुरमार्ग पोलिसांनी अटक केली. आरोपी नवी मुंबईतील रहिवासी असून त्याच्याविरोधात विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण(पोक्सो) कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरोधात यापूर्वी अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारी नसल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून कांजुरमार्ग पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७५ व पोक्सो कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार शुक्रवारी हा प्रकार घडला. शुक्रवारी सायंकाळी पीडित मुलगी घरी परतली असता ती रडू लागली. तिच्या आईने तिला त्याबाबत विचारले असता गणिताच्या तासाला शिक्षकांनी स्वाध्याय व गणिताचे प्रश्न सोडवण्याच्या बहाण्याने पीडित मुलीशी अश्लील कृत्य केल्याचे तीने सांगितले.

अखेर मुलीच्या आईने याप्रकरणी स्थानिक कांजूरमार्ग पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी प्रकणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपी शिक्षकाला शनिवारी याप्रकरणी अटक करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

मुंबईत अल्पवयीन मुले व मुली यांच्याविरोधात घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मुंबईत २०२४ मध्ये बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्या अंतर्गत १३४१ गुन्ह्यांची नोंद झाली होती. २०२३ पोक्सो कायद्या अंतर्गत ११०८ गुन्ह्यांची नोंद झाली होती. २०२४ मध्ये मुंबईत पोक्सो कायद्या अंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये ६०९ बलात्कार, ६६७ विनयभंग व ३५ छेडछाड-अश्लील शेरेबाजी केल्याच्या घटनांचा समावेश आहे. २०२३ मध्ये अल्पवयीन मुलींवरील गुन्ह्यांतील ९९ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले होते. २०२४ मध्ये या प्रमाणात घट झाली असून २०२४ मध्ये हे प्रमाण ९६ टक्के होते. विनयभंग व छेडछाड-अश्लील शेरेबाजी गुन्ह्यांच्या उकल होण्याच्या प्रमाणही अनुक्रमे १०० टक्क्यांवरून ९७ टक्के व ९६ टक्क्यांवरून ९१ टक्क्यांपर्यंत घटले.

# मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा २६.८४ टक्के

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठ्यात गेल्या आठवड्यातील पावसामुळे चांगलीच वाढ झाली आहे. सातही धरणात मिळून २६.८४ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या तीन वषार्तील जून महिन्यातील हा सर्वाधिक साठा आहे. पाणीसाठ्यात चांगली वाढ झाल्यामुळे राखीव साठ्याचा वापर बंद करण्यात आला आहे.



मुंबई शहर आणि उपनगरात तसेच आसपासच्या जिल्ह्यात गेल्या आठवड्यात चांगला पाऊस पडल्यामुळे दोन तीन दिवसातच मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठ्यात १८ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एरव्ही जून महिन्यात पाणीकपातीची वेळ येत असली तरी यंदा जून महिन्यात मुंबई महापालिकेची पाणी पुरवठ्याची चिंता मिटली आहे.

गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत यावर्षी पाणीसाठा चांगलाच वाढला आहे. गेल्यावर्षी याच दिवशी पाणीसाठा अत्यंत खालावला होता व साडे पाच टक्क्यांवर गेला होता. तर त्याच्या आधीच्यावर्षी हाच पाणीसाठा सात टक्के होता. त्या तुलनेत यंदा धरणात तिप्पट चौपट पाणीसाठा जमा झाला आहे.

गेल्या सोमवारी १७ जूनपासून चांगला पाऊस पडल्यामुळे मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणसाठ्यात ही वाढ झाली आहे. सोमवारी सकाळी ८.६० टक्के असलेला पाणीसाठा आठवड्या भरातच २६ टक्क्यांच्या पुढे गेला आहे. खालावलेल्या पाणीसाठ्यात भरघोस वाढ झाल्यामुळे मुंबईकरांसह पालिका प्रशासनाला देखील दिलासा मिळाला आहे. गेल्या काही वर्षांपासून पाऊस खूप लांबत चालला होता. जून महिन्यात पाऊसच पडत नसल्यामुळे धरणांतील पाणी तळ गाठू लागत. त्यामुळे राखीव साठ्याचा वापर करणे, पाणी कपात करणे हे उपाय मुंबई महापालिका प्रशासनाला करावे लागत होते.

पावसाला पुरेशी सुरूवात होत नाही तोपर्यंत अक्षरशः पाणीपाणी करावे लागत होते. यंदा मात्र पावसाला लवकर सुरुवात झाल्यामुळे धरणांत पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या आठवड्यात मुंबई महापालिकेने उर्ध्व वैतरणा धरणातून पाणी उचलण्यास सुरुवात केली होती मात्र पाऊस चांगला पडू लागल्यामुळे राखीव साठ्याचा वापर बंद करण्यात आल्याची माहिती जल अभियंता पुरुषोत्तम माळवदे यांनी दिली.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी सातही धरणात मिळून ३ लाख ८८ हजार ५२३ दशलक्षलीटर म्हणजेच २६,८४ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे.

# पुण्यात शिंदे गटाकडून उद्धव ठाकरेंवर व्यंगचित्रातून निशाणा

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :** मुंबईत १९ जून २०२५ रोजी ठाकरे गटाचा आणि शिंदे गटाचा ५९ वा शिवसेनेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतेवेळी महायुती सरकार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केल्याचे पाहण्यास मिळाले.




त्यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, नाना पाटेकर एका चित्रपटात गुंडा समोर उभे राहून म्हणतात, कम ऑन किल मी, त्या प्रमाणे मी ही गद्दारासमोर उभे राहून म्हणतो, कम ऑन किल मी, असेल हिंमत तर या अंगावर, पण अंगावर येणार असाल तर येताना रुग्णवाहिका घेऊन या, कारण सरळ याल पण जाताना आडवे होऊन जाल अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती.

ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोन्ही नेत्यांमधील आरोप प्रत्यारोपांदरम्यान शिवसेनेचे पुणे शहर प्रमुख नाना भानगिरे यांनी उद्धव ठाकरे यांना व्यंगचित्राच्या माध्यमातून लक्ष करणारे फ्लेक्स शहरातील अनेक ठिकाणी लावले आहे.

त्या फ्लेक्सबाजी बाबत सांगायचे झाल्यास, ते बोलण्यात व्यस्त आहेत, आम्ही कामात मग्न आहोत.आशा आशयाचा मजकूर आणि त्याच्या खाली उद्धव ठाकरे यांचे व्यंगचित्र रेखाटण्यात आले आहे. उद्धव ठाकरे यांच्या हातामध्ये कुबडी तर दुसऱ्या हातामध्ये काँग्रेसचा ऑक्सिजन सिलेंडर, त्यावर काँग्रेस पक्षाचे चिन्ह दाखविण्यात आले आहे. तसेच त्याच्या वरील बाजूला come of...kill me आशा आशयाचा मजकूर लिहिण्यात आला आहे. तर त्याचाच बाजूला एकनाथ शिंदे हे खांद्यावर शिवसेनेचे चिन्ह असलेली भगवी पताका हाती घेऊन चालताना दाखविण्यात आले आहे.

तर त्याचाच बाजूला एकनाथ शिंदे हे रुग्णालयातील जखमीशी संवाद साधताना फोटो दाखविण्यात आले आहे. तर या एकूणच फ्लेक्स बाजीची पुणे शहराच्या राजकीय वतुर्ळात चांगलीच चर्चा रंगू लागली आहे. आता फ्लेक्सबाजीला ठाकरे गटाकडून काय प्रत्युत्तर येते हे पाहणे जरुरीचे ठरणार आहे.

## सासूच्या छळामुळे उच्चशिक्षित महिलेची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :** सासूकडून हुंड्यासाठी होणाऱ्या छळामुळे उच्चशिक्षित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर परिसरातील हांडेवाडी भागात घडली. याप्रकरणी सासूविरुद्ध काळेपडळ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीपिका प्रमोद जाधव (वय २९) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत दीपिकाच्या वडिलांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सासू द्वारका नामदेव जाधव (रा. सातवनगर, हांडेवाडी रस्ता) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपिका आणि प्रमोद जाधव यांचा आठ वर्षांपूर्वी विवाह झाला होता. दीपिकाने कृषीविषयक पदवी मिळवली आहे. विवाहानंतर ती एका खासगी कंपनीत नोकरी करत होती. तिचा पती शासकीय कार्यालयात लिपिक आहे. त्यांना एक मुलगा आहे. विवाहानंतर सासू द्वारका हिने दीपिकाला हुंड्यासाठी त्रास देण्यास सुरूवात केली. विवाहात हुंडा कमी दिल्याचे सांगून तिला टोमणे मारण्यात आले. तिचा शारिरिक आणि मानसिक छळ केला. तिच्याकडे पैशांची मागणी करण्यात आली.

छळ असह्य झाल्यने दीपिकाने शुक्रवारी (२० जून ) राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली, असे तिच्या वडिलांनी दिलेल्या फियार्दीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. सहायक पोलीस निरीक्षक विलास सुतार तपास करत आहेत.

# पैठण येथून माहेश्वरी सत्संग मंडळ दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

■ **महासागर प्रतिनिधी, पैठण, दि. २२ :** पैठण येथून माहेश्वरी सत्संग मंडळ व वै. ह भ प श्रीकृष्णदास महाराज लोहिया यांच्या प्रेरणेतून पैठण ते पंढरपूर दिंडीला मागील तिन वषार्पासून सुरुवात करण्यात आली संत एकनाथ महाराज पालखी दिंडी सोहळ्या बरोबरच ही माहेश्वरी सत्संग मंडळाची दिंडी सामील होते. दिंडीचा पहिला मुक्काम माहेश्वरी भक्तनिवास पैठण व दुसरा मुक्काम हादगाव येथे आणि पुढील सर्व मुक्काम संत एकनाथ महाराज पालखी दिंडी सोहळ्या बरोबर पंढरपूरला पोहोचणार आहे.

या दिंडी बरोबर महिला वारकरी भाविकांची सर्व सोय सुविधा करण्यात आली आहे कारण पंढरपूरच्या वारीत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना अनेक अडचणींना समोरे जावे लागते अशा अडचणी लक्षात घेता माहेश्वरी सत्संग दिंडीने आपल्या दिंडी सोबत तीन लाख रुपये खर्च करून सहा पोर्टेबल टॉयलेट त्यामध्ये तीन इंडियन व तीन वेस्टरन अशा पोर्टेबल टॉयलेट ट्रॅक्टर ट्रॉलीवर बसविले आहेत तसेच दहा बाय दहाची महिलांसाठी स्नानगृहाचे टेंट व रात्री वारकरी भाविकांना झोपण्यासाठी स्लीपर कोच लक्झरी बस, दिंडी सोहळ्यासोबत डॉक्टरची टीम व त्यांच्यासोबत चार लाखाची औषधी यामध्ये बाम, पाय व गुडघेदुखी वरील औषधी व ट्यूब, स्प्रे, ताप, थंडी, खोकला, सर्दी आधी दुखण्याच्या औषधी सर्व वारकऱ्यांना पिण्यासाठी आरोच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

माहेश्वरी सत्संग मंडळाची दिंडी प्रमुख विजयकुमार लोहिया, अध्यक्ष हभप श्रीनाथ महाराज गोसावी, विणेकरी हभप गोरख जनार्दन अंबाडे महाराज, दिंडी यशस्वी करण्यासाठी जयनारायण लोहिया, निवृत्ती लोळगे, गोपाल लोहिया, राजेंद्र झवर , महेश दायमा यांनी परिश्रम घेतले दिंडीमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी व महिला वारकरी सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांसाठी पैसा नाही, पण साखर कारखान्यासाठी ५०० कोटी?

## अर्थमंत्री अजित पवारांवर संजय राऊतांचा घणाघात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** सरकारला शेतकऱ्यांची कर्जमाफी करता येत नाही. लाडक्या बहीणींना तुम्हाला नीट पैसे देता येत नाही, पण मला माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन करा, मी 500 कोटी 24 तासांमध्ये घेऊन येतो हे राज्याचे अर्थमंत्री सांगत आहे, असे म्हणत ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी महायुतीवर निशाणा साधला आहे.



संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार हे राष्ट्रीय नेते आहेत आणि अजून गावातूनच फिरत आहे. हे ह्या राज्याचे दुर्दैव आहेकी असे नेते या राज्याला मिळाले, असा टोलाही राऊतांनी लगावला आहे. 500 कोटी हा काही लहान आकडा नाही, तुम्ही कुणाच्या तिजोरीतील पैसे लुटणार आहात? असा सवाल राऊतांनी केली आहे. अजित पवारांकडे राज्यातील इतर कोणत्याही कामाला द्यायला पैसे नाही. ठणठण गोपाळा, पण माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा जर मी चेअरमन झालो तर 24 तासांमध्ये 500 कोटी रुपये सरकारकडून घेऊन येईल, असे अजित पवार म्हणाले आहेत, असा म्हणत ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी महायुतीवर टीकास्त्र डागले आहे. संजय राऊत म्हणाले की, भास्कर जाधव यांचे वक्तव्य मी काही ऐकले नाही. ते आमचे मित्र आणि जवळचे सहकारी आहेत. वर्धापन दिनानिमित्त ज्या मोजक्या लोकांनी पक्षाच्या मंचावर भाषण केलेल त्यातील एक भास्कर जाधव हे देखील होते. त्यांनी त्यांच्या भावना मांडल्या असतील तर पक्षप्रमुख त्यांची दखल घेतील.

# वारी : परंपरा, विज्ञान आणि माणुसकीचा संगम




पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी अध्यात्मिक चळवळ आहे. हजारो वारकरी, स्त्री-पुरुष, बालक-वृद्ध, गरीब-श्रीमंत अशा विविध थरांतील लोक पंढरपूरच्या दिशेने टाळ, मृदुंगाच्या गजरात, 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषात, विठ्ठलनामाच्या गजरात पायी चालत एकत्र येतात. ही यात्रा केवळ एक धार्मिक परंपरा म्हणून नाही तर ती विज्ञान, आरोग्य, सामाजिक समतेचा संदेश देणारी आणि माणुसकीच्या शिक्षणाची शाळा आहे.

-----------------

आपण आधुनिक युगात विज्ञानावर भर देतो, आणि श्रद्धा-परंपरांकडे संशयाने पाहतो. पण वारी ही परंपरा केवळ श्रद्धेची फलश्रुती नाही. संतांनी वारीच्या माध्यमातून लोकजीवनात चालण्याची सवय निर्माण केली.

पायी चालण्याने होणारा व्यायाम, शारीरिक आरोग्य वाढवतो. एकेका दिवशी २० ते ३० किलोमीटर चालल्याने शरीरातील चयापचय क्रिया सुधारतात, फुफ्फुसे, हृदय मजबूत होते. अनेकदा आधुनिक वैद्यकीय शास्त्रदेखील पायी चालण्याचा आग्रह धरते. संतांनी ही गोष्ट शतकांपूर्वी ओळखली होती.

आजच्या यंत्रयुगात लोक फार कमी चालतात. स्थूलपणा, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार यांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. या आजारांवर चालण्याइतका प्रभावी आणि सहज उपाय नाही. पण कोणी 'चाल' म्हणाले तर ईगो अडथळा ठरतो. म्हणूनच संतांनी 'वारी' सारख्या सामाजिक अध्यात्मिक चळवळीद्वारे पायी चालण्याला धार्मिक अधिष्ठान दिलं. हेच त्यांचं द्रष्टेपण!

**वारी म्हणजे माणुसकीचा झरा**

वारीत सहभागी झाल्यावर मनात एक विलक्षण शांतता येते. अहंकार गळून पडतो. 'मी कोणीतरी खास आहे' ही भावना आपोआप विरते. कारण वारीत कोणी मोठा, लहान, श्रीमंत, गरीब नसतो. सगळे एकाच पंक्तीत उभे असतात. एकमेकांना 'माऊली' म्हणत हाक मारतात. हे संबोधनच दुसऱ्यामधील देवत्वाची जाणीव करून देतं.

वारीत माणसं एकमेकांशी बोलतात, एकमेकांचं दुःख समजून घेतात, अन्न, पाणी, निवारा शेअर करतात. इथे परस्पर सहकार्य, सेवा, सहानुभूती आणि एकोपा हाच धर्म असतो. ही सगळी शिकवण कोणत्याही विद्यापीठात मिळत नाही. वारी म्हणजे माणुसकीची शाळा आहे.

**वारीतून सामाजिक समतेचा संदेश**

वारीमध्ये कोणाचं वंश, जात, वर्ग, धर्म विचारात घेतला जात नाही. इथे प्रत्येक माणूस फक्त वारकरी असतो. टाळ, चिपळ्या, अभंग आणि विठ्ठलनाम हेच त्याचं ओळखपत्र. ही समता संतांनी स्वखुशीने नाही, तर जनतेला समजावून, जगवून, प्रत्यक्ष कृतीतून रुजवली आहे.

आजही हजारो माणसं विठ्ठलाच्या नामात एकरूप होऊन पंढरपूरकडे जातात. त्यांना एकाच गोष्टीचा ध्यास असतो झ ₹विठ्ठलाचं दर्शन, आणि माणूस म्हणून जगणं.₹ यासाठी कोणालाही वेगळं वाटत नाही, कोणी मागे रहात नाही. ही खरी धर्मनिरपेक्षता आणि मानवतावाद आहे.

**वारी आणि नैतिक अधिष्ठान**

वारीमध्ये शिस्त, संयम, त्याग आणि सहनशीलतेचं शिक्षण आपोआप मिळतं. वारीच्या काळात अनेक वारकरी नियमाने उपवास करतात, साधी राहणी ठेवतात, सेवा करतात. अनेक तरुण अल्कोहोल, तंबाखू, व्यसने सोडून या प्रवासात सहभागी होतात. एक नवीन सुरुवात करण्याचा संकल्प करतात.

वारी म्हणजे केवळ चालणं नाही, ती म्हणजे आपले दोष, अहंकार, मोह, मत्सर यांना गळून टाकण्याची प्रक्रिया आहे. विठ्ठलाचं दर्शन घेण्यापूर्वी आपलं अंतरंग शुद्ध करणं ही खरी तयारी असते. म्हणूनच वारी जीवन बदलते.

**वारी टिकली पाहिजे**

वारी ही परंपरा, श्रद्धा आणि शारीरिक आरोग्य यांचा अद्भुत संगम आहे. तिचं स्वरूप टिकवणं, वाढवणं हे प्रत्येक सुजाण नागरिकाचं कर्तव्य आहे. संत नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, चोखामेळा, बहिणाबाई, सावता माळी यांचं जीवनच वारीमय होतं. त्यांचं कार्य आजही चालू ठेवणारे अनेक वारकरी, कीर्तनकार, साधू, सेवेकरी समाजात कार्यरत आहेत. त्यांचं योगदान हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे.

आज वारीवर अंधश्रद्धा किंवा जुनाट परंपरा म्हणून टीका होते. पण ही टीका करणाऱ्यांनी प्रत्यक्ष वारीत सहभागी होऊन अनुभव घ्यावा, मग समजेल झ वारी काय असते!

वारीच्या निमित्ताने भक्ती, विज्ञान, समता, आरोग्य, माणुसकी, एकात्मता, शिस्त, अहिंसा झ हे सगळे गुण एकत्र येतात. ही केवळ महाराष्ट्राची नव्हे तर भारताचीही अनोखी सांस्कृतिक देणगी आहे. शेवटी एकच....

चला वारीला, जपा माणुसकीला!

माझं स्पष्ट मत आहे की, प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी वारी केलीच पाहिजे. ती केवळ पंढरपूर दर्शनासाठी नव्हे, तर स्वतःला ओळखण्यासाठी. आपल्यातील अहंकार झटकण्यासाठी, माणसातला माणूस जागवण्यासाठी. वारी केल्यावर माणूस अधिक नम्र होतो, सहृदयी होतो, समाजाभिमुख होतो. म्हणूनच ही परंपरा विज्ञानाच्या कसोटीवरही खरी ठरते आणि अध्यात्मिक दृष्टिकोनानेही उन्नत करणारी असते. जय हरि! राम कृष्ण हरि!

-----------------

■ गजानन हरणे
समाजसेवक, वारकरी,
निर्भय बनो जन आंदोलन,
जि. प. नगर खडकी, अकोला.
९८२२९४२६२३

**लेखक हे स्वतः पाच वर्षापासून पायी वारी करीत आहेत.**

■ ■ ■

# युवकांनो कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवा...

आजकालचे युवक आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी पूर्णपणे विसरून गेले आहेत. आणि नको त्या फालतू छंदात वेळ वाया घालवत आहेत. त्यांना स्वतःच्या कर्तव्याची जान आणि जबाबदारीचे भान जराही राहिले नाही. आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य काय आहेत? आणि आपण सध्या काय करत आहोत? याचा त्यांना विसर पडला आहे. म्हणूनच ते भरकटत आहेत.

दारू, सिगारेट व गांजा या जीवघेण्या व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेत आहेत आणि स्वतःच मृत्यूला जवळ करत आहेत. व्यसनी तरुणांचा देश ही भारताची नवी ओळख जगासमोर आली आहे. आपल्या भारतात मिसरूड न फुटलेले अगदी पाच ते सहा वर्षांची मुले देखील व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. मग हे युवक कशाला कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवतील?

शिक्षणाच्या नावाखाली आपल्या वडिलांकडून भरपूर पैसा मागवतात मात्र तो पैसा ढाब्यावर जाऊन मौज मजा करण्यात लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून मवाली पोरांसोबत टवाळक्या करत फिरत आहेत. वाईट व्यसनाने नुसते बरबटून गेले आहेत.

खरे तर युवकांनी तरुणपणात खूप खूप शिक्षण शिकून आपले जीवन ध्येय गाठायला हवे. शिक्षणाच्या जोरावर एखादी नोकरी काबीज करायला हवी. आई-वडिलांचे, गावकऱ्यांचे व समाज बांधवांचे स्वप्न साकार करायला हवे. नंतर सामाजिक बांधिलकी म्हणून किंवा सामाजिक कर्तव्य व जबाबदारी म्हणून युवकांनी स्वतः शिक्षित होऊन इतरांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगावे, जेणेकरून ते युवक शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला प्रगतीपथावर नेऊ शकतील.

युवकांनी पर्यावरणाचे महत्त्व ओळखून काळजी घेणे हे देखील खूप महत्त्वाचे काम आहे. त्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाची सुरक्षा करण्यासाठी सतत प्रयत्नशील असायला हवे. युवकांनी समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा उभारायला हवा. समाजातील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी अटोकाट प्रयत्न करायला हवेत.

युवकांनी आपल्या कला आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी व देशासाठी करावा. युवकांनी एक जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या विकासात सक्रियपणे सहभाग नोंदवावा. युवकांनी समाजाला दिशा देण्यासाठी उत्तम नेतृत्वाची भूमिका पार पाडावी. तसेच नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा आणि समाजाला प्रेरित करावे.

गोरगरीब, वंचित, उपेक्षित व तळागाळातील युवकांच्या शिक्षणाला थोडाफार हातभार लावावा. त्यांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी. आणि त्यांना सुद्धा आपल्या बरोबरीला आणून त्यांच्या जीवनात आनंदाची व चैतन्याची मंगलमय पहाट आणावी. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावावा.? अनाथांना व वृद्धांना आश्रमात जाऊन कपडे, भेटवस्तू व अन्नदान वाटप करावे. आपल्या आई वडिलांना सुखाचे व आनंदाचे क्षण दाखवावेत. त्यांना कष्टाची कामे करू देऊ नयेत. उतारवयात त्यांची अधिक काळजी घ्यावी. पत्नीचे ऐकून त्यांना अंतर देऊ नये. त्यांची हेळसांड करू नये.

आजकाल शिकून नोकरीला लागलेले काही महाभाग पत्नीचे ऐकून आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत आहेत. त्यांना घाण घाण शिव्या देऊन घराबाहेर काढत आहेत. युवकांनो आई-वडिलांसोबत असे अमानुष प्रकार न करता, त्यांना गद्दार न होता आणि त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता न दाखवता त्यांना खूप खूप जीव लावूया, त्यांना अगदी आनंदात व मजेत ठेवून त्यांना सुखाचे दिवस दाखवूया. कारण आई-वडिलांनी आपल्यासाठी खस्ता खाऊन व प्रसंगी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला उच्च शिक्षण शिकवलेले असते. त्यांच्या जीवावरच तर आपला उच्च शिक्षणाचा डोलारा उभा असतो. हे आपण कधीच विसरता कामा नये. त्यांनी कष्ट करून आपल्या शिक्षणाला पैसा लावलेला असतो. आपण नोकरीला लागेपर्यंत त्यांना एकदिवस सुध्दा सुखाची झोप लागत नसते. मग आपण आई-वडिलांना सुखात ठेवणे व म्हातारपणात त्यांचे योग्य पालन पोषण करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी असते. हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवायला हवे.

आजकाल नोकरीला लागलेले युवक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी विसरून, आई-वडिलांना गावी ठेवून नोकरीच्या ठिकाणी स्थायिक होतात आणि तिकडेच पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. तिकडच्याच दुनियेत बायको लेकरांसोबत रममान होतात. समाज बांधवांना व आई-वडिलांना मदत करायची असते हे विसरून जातात. नेमके हेच डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित नव्हते.

डॉ. बाबासाहेब म्हणायचे की, लावलेला एक दिवा हजारो दिव्यांना प्रज्वलित करू शकतो. म्हणजे एक नोकरीला लागलेला समाज बांधव आपल्या हजारो बांधवांना आपल्या बरोबरीला आणू शकतो पण आजकालच्या लोकांची मानसिकता फार गढूळ झाली आहे. त्यांना वाटत आहे की, माझ्यासारखा उच्चपदस्थ अधिकारी दुसरा कोणीच होऊ नये, समाजात मलाच अधिक मान मिळावा, मीच भरपूर पैसा व संपत्ती कमवावी आणि इतरांनी फक्त माज्याकडे बघत राहावे. साहेब, साहेब करत माज्या मागे पुढे फिरावे असे आजकालच्या नोकरदारांना वाटते.

आजकालचे नोकरदार स्वार्थी व मतलबी झाले आहेत. त्यांना फक्त आपलेच भले व्हावे वाटत आहे. आणि इतरांचे वाटोळे व्हावे वाटत आहे. आपल्या महापुरुषांनी जर स्वतःचा स्वार्थ पाहिला असता तर ते आज खूप श्रीमंत झाले असते पण आज आपण कुठे असतो? कोणाच्या तरी दावणीलाच बांधलेले गुलाम असतो ना...याचा एकदा विचार करून बघा.

आपले महामानव स्वतः शिकले, मोठे झाले आणि समाजालाही मोठे केले आणि आपल्यालाही खूप खूप शिकून मोठे व्हा आणि आपल्याबरोबर समाज बांधवांनाही मोठे करा असे सांगून गेले. मग माझा आजच्या नोकरदारांना प्रश्न आहे की, आपण नोकरीला लागल्यावर किती लोकांना आपल्या बरोबरीला आणले? किती समाज बांधवांचा उद्धार केला? महापुरुषांच्या नावाचा डंका आजही संपूर्ण जगभर गाजत आहे. हे केवळ त्यांनी केलेल्या कार्यामुळेच! हे आजच्या नोकरदारांनी मनोमन ध्यानात ठेवावे.

आज या महापुरुषांना जाऊन कित्येक वर्षे झाली आहेत, तरी हे महामानव अख्या जगाच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आपण देखील स्वतःबरोबरच समाजाचा आणि देशाचा विचार केला तर नक्कीच आपण देखील मेल्यानंतर सुध्दा लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहाल. कारण बांधवांनो मेल्यावर आपल्याला काहीच सोबत घेऊन जायचे नाही, जसे रिकाम्या हाताने आलोय तसेच एकदिवस रिकाम्या हातानेच जावे लागणार आहे... म्हणून जीवनात असे काहीतरी ऐतिहासिक व अलौकिक कार्य करा की, मेल्यानंतरही तुमचे नाव एक चांगला व्यक्ती म्हणून पंचक्रोशीत आदराने निघत राहील...

--------------

■ बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर. जि. लातूर.
7498715661

■ ■ ■

# कृषी हीच नवी करिअर क्रांती

## एआय आणि स्टार्टअप्सच्या युगात नवा दृष्टिकोन



ऋषिकेश गजानन कोकाटे
पुणे.

१२ वी नंतर उएल, खएए आणि ठएएल यांचे निकाल लागलेत. अनेक विद्यार्थ्यांनी आपापले लक्ष्य ठरवले आहे, तर काही अजूनही विचारात आहेत.. पुढे काय? इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट या पारंपरिक मार्गांपेक्षा वेगळा आणि सशक्त पर्याय म्हणजे कृषी क्षेत्र. होय! कृषी आता केवळ शेतात राबणं एवढंच उरलेलं नाही; हे क्षेत्र आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन आणि उद्योजकतेच्या संधींनी भरलेलं आहे.

**कृषी क्षेत्र का निवडावे?**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रसारख्या राज्यात तर कृषी हा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे. बदलत्या हवामान, जागतिकीकरण आणि अन्न सुरक्षा या पार्श्वभूमीवर सक्षम, तंत्रस्नेही आणि दूरदृष्टी असलेल्या कृषी व्यावसायिकांची मोठी गरज आहे.

**१२ वी नंतर कृषी क्षेत्रातील अभ्यासक्रम:**

१. B.Sc. Agriculture **(कृषी पदवी) :**
**४ वर्षांचा अभ्यासक्रम:**

हा अभ्यासक्रम शेती विज्ञान, मृदविज्ञान, बियाणे तंत्रज्ञान, पिक उत्पादन, कृषी अर्थशास्त्र, कीड व्यवस्थापन, सिंचन व जलसंधारण, अन्न प्रक्रिया आदी विषय शिकवतो.

२. B.Sc. Horticulture / Forestry / Animal Husbandry / Dairy Technology / Agri-Biotechnology :

शेतीची विविध रूपं आणि शाखा समजून घेण्यासाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत.

**३. डिप्लोमा कोर्सेस :**

१२ वी नंतर थोड्या कालावधीचे (१-२ वर्ष) अभ्यासक्रम झ कृषी पत्रकारिता, कृषी विपणन, अन्न प्रक्रिया, शेती यंत्रसामग्री, ऑर्गेनिक फार्मिंग

४. B.Tech in Agricultural Engineering:

हे इंजिनिअरिंग आणि शेतीचे संयोजन आहे. सिंचन, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान यावर भर दिला जातो.

पुढील संधी आणि करिअर मार्ग :

१. सरकारी नोकऱ्या (MPSC, IBPS-AFO, कृषि अधिकारी) :

शासन दरबारी कृषी पदवीधारकांना अनेक संधी आहेत. तालुका कृषी अधिकारी, कृषी विस्तार अधिकारी, बँकांमध्ये कृषी अधिकारी इत्यादी.

२. कृषी संशोधन आणि शिक्षण:

M.Sc. Agriculture U Ph.D. ICAR, कृषि विद्यापीठे, KVKs यामध्ये संशोधक व प्राध्यापक म्हणून काम करता येते.

**३. उद्योजकता**

(Agri-Entrepreneurship):

सेंद्रिय शेती, हरितगृह शेती, अन्न प्रक्रिया यामध्ये स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. शासनाकडून अनुदान, कर्ज आणि प्रशिक्षणही उपलब्ध असते.

४. कृषी स्टार्टअप्स आणि Agri-Tech:

ड्रोन टेक्नॉलॉजी, IoT आधारित शेती, e-Mandi, कृषी डेटा अ?नालिटिक्स, अॅप आधारित सेवा यामध्ये आधुनिक स्टार्टअप्स उभे करता येतात.

**५. खाजगी क्षेत्रात संधी :**

बी-बियाणे कंपन्या, अन्न प्रक्रिया उद्योग, खत-किटकनाशके उत्पादक कंपन्या, बँका, विमा कंपन्यांमध्ये कृषी सल्लागार, फील्ड ऑफिसर इ. पदांवर काम करता येते.

**कृषी हे भविष्य घडवणारे क्षेत्र!**

कृषी म्हणजे फक्त शेतात नांगर चालवणं नव्हे, तर एक शाश्वत, विज्ञानाधिष्ठित आणि उद्योजकीय क्षेत्र आहे. जागतिक लोकसंख्या वाढ, अन्न सुरक्षा, हवामान बदल, पाण्याचे दुर्भिक्ष्य हे मुद्दे लक्षात घेतले, तर कृषी हीच 'फ्युचर इंडस्ट्री' आहे.

या क्षेत्रात काम करताना तुम्ही समाज, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था या तिन्ही पातळ्यांवर सकारात्मक प्रभाव पाडू शकता. त्यामुळे कृषी क्षेत्र हे केवळ करिअर नव्हे, तर एक जीवनधर्म ठरू शकतो.

**आधुनिक शेतीकडे वळावे**

**नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने क्रांती घडवावी**

आजच्या पिढीतील कृषी पदवीधरांनी केवळ खासगी कृषी कंपन्यांमध्ये नोकरी करण्यापुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या ज्ञानाचा खरा उपयोग हा स्वतःच्या शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनक्षमता वाढवण्यात, अन्नप्रक्रिया उद्योग सुरू करण्यात, किंवा कृषी स्टार्टअप्स उभारण्यात आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), ड्रोन टेक्नॉलॉजी, स्मार्ट सेंसर्स, IoT बेस्ड सिंचन प्रणाली, मृदा आरोग्य विश्लेषण, कृषी डेटा अ?नालिटिक्स इत्यादी अत्याधुनिक साधनांचा उपयोग करून शेती अधिक शास्त्रीय, अचूक आणि नफ्याची करता येते. कृषी पदवीधारकांनी जॉब सीकर न राहता जॉब क्रिएटर बनण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

ग्रामीण भागात कृषी-आधारित स्टार्टअप्स उभे राहिल्यास केवळ स्वतःचं भवितव्य नाही तर इतर शेतकऱ्यांनाही नव्याची दिशा मिळेल. त्यामुळे कृषी पदवीधर हे ग्रामीण परिवर्तनाचे खरे शिल्पकार ठरू शकतात.

जिथे माती आहे, तिथे संपत्ती आहे;
जिथे बी आहे, तिथे भविष्यातील बीज आहे!

आजचा तरुण विचारशील आहे. तो केवळ नोकर नको म्हणतोय, तर निमार्ता व्हायचं ठरवत आहे. कृषी क्षेत्र त्यासाठी सर्वोत्तम व्यासपीठ देऊ शकतं.

■ ■ ■

**: लेखक परिचय :**

ऋषिकेश गजानन कोकाटे हे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर, ताथवडे, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक (कृषी विभाग) म्हणून कार्यरत आहेत. ते कृषी सुवर्णपदक विजेते असून, निंदण व्यवस्थापन (Weed MaQagement) या क्षेत्रात त्यांचे विशेष संशोधन आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात Emerging Scientist Award, राष्ट्रीय प्रतिष्ठा पुरस्कार, डॉ. एम. एस. स्वामिनाथन पुरस्कार, तसेच oung Researcher Award या राष्ट्रीय पातळीवरील मान्यतांचा सन्मान मिळवला आहे. कृषी शिक्षणासोबतच, ते विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन करत असून, आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि कृषी उद्योजकतेकडे विद्यार्थ्यांनी वळावे यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

# आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धमार्ची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले.

हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे.

सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

**वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!**

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ■ ■ ■

# तुम्ही पण अशीच चपाती भाजता का? वाढेल कॅन्सरचा धोका.. बदला सवय..





भारतातील प्रत्येक घरात दररोज चपाती ही शक्यतो खाल्लीच जाते. चपात्या किंवा फुलके बनवण्यासाठी बऱ्याच घरात एक पद्धत वापरली जाते ती म्हणजे चपाती तव्यावर अर्धी भाजायची आणि नंतर थेट गॅसच्या आचेवर ठेवून ती फुगवणे. फुललेल्या चपात्या किंवा रोटी खायलाही गरम गरम छान लागतात. पण तुम्हाला हे जाणूव आश्चर्य वाटेल की चपाती भाजण्याची ही पद्धत कॅन्सरचा धोका वाढवू शकते. नक्की कोणत्या अशा चपाती भाजण्याच्या पद्धती आहेत ज्यामुळे कॅन्सर होण्याचे धोके असतात.

काही संशोधनातून असे दिसून आले आहे की उच्च तापमानावर रोटी भाजल्याने काही हानिकारक रसायने तयार होतात, जसे की HCA (हेटेरोसायक्लिक अमाइन्स) आणि ढअल्ह (पॉलीसायक्लिक अॅरोमॅटिक हायड्रोकार्बन्स), ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

एनव्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार नैसर्गिक वायूच्या चुली कार्बन मोनोऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड सारखे धोकादायक वायू आणि WHO च्या मानकांपेक्षा जास्त सूक्ष्म कण उत्सर्जित करतात. या वायूंचा श्वसनाचे आजार , हृदयरोग आणि कर्करोग यासारख्या समस्यांशी संबंध असू शकतो .

पोषण आणि कर्करोग या दुसऱ्या अभ्यासात असे म्हटले आहे की उच्च तापमानावर स्वयंपाक केल्याने कर्करोग निर्माण करणारी रसायने तयार होऊ शकतात.

थेट आगीवर स्वयंपाक करणे कर्करोगाशी जोडले जाऊ शकत नाही. निश्चितच काही रसायने डीएनएला नुकसान पोहोचवू शकतात, परंतु शरीरात स्वतःला बरे करण्याची क्षमता असते. जर कोणी असे अन्न जास्त काळ खाल्ले तरच त्याचा परिणाम होऊ शकतो. ते अधूनमधून खाल्ल्याने कोणतेही मोठे नुकसान होत नाही.

एचसीए, पीएएच आणि अॅक्रिलामाइड सारखी रसायने विशेषतः जेव्हा स्टार्च आणि मांस शिजवले जातात तेव्हा तयार होतात. त्यांचा कर्करोगाशी थेट संबंध नाही, परंतु खबरदारी म्हणून आपण कोळशावर किंवा गावच्या जन्या पद्धतींच्या चुलींवर स्वयंपाक करणे टाळले पाहिजे.

बहुतेक लोक भाकरी किंवा चपाती तव्यावर कमी आणि जास्त वेळ थेट गॅसवर ठेवून भाजतात. असे केल्याने चपाती आतून कच्ची राहते. कच्ची चपाती खाल्ल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### कॉन्ट्रॅक्ट भरती

मजुरांचे होते आर्थिक शोषण
कॉन्ट्रॅक्टर घेतो कापून कमिशन
सेवेची नसते मुळीच शाश्वती
लटकती तलवार डोक्यावरती..

कॉन्ट्रॅक्ट बेसवर केली भरती
शासनाला नसते धास्ती
आधी काम मग दाम
शेवटी भाऊ रामराम..

हमारी मांगे पुरी कर लो
कदाचित शासन कदरले
म्हणुन कॉन्ट्रॅक्ट भरतीला
झुकते माप असावे दिले.. !

# १५ दिवसांतच प्रधानमंत्री सडक योजनेचा रस्त्याला तडे

## गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह, भ्रष्टाचाराचा संशय



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.२२)-** चांदूर बाजार तालुक्यातील जगन्नाथपूर ते मेघनाथपूर या तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत नव्याने बांधकाम करण्यात आले. मात्र, केवळ १५ दिवसांतच रस्त्यावर मोठे तडे दिसू लागल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह आणि आर्थिक भ्रष्टाचाराचा संशय उपस्थित करण्यात आला आहे.

नुकत्याच पूर्ण झालेल्या रस्त्यावर इतक्या कमी कालावधीत मोठाले तडे गेल्याने गावक?यांनी कंत्राटदार आणि संबधित अभियंत्यांविरोधात निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. गुणवत्तेचा अभाव, निकृष्ट साहित्याचा वापर आणि अधिका?यांचे दुर्लक्ष यामुळे हा रस्ता काही दिवसांतच खराब झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विविध विकासकामे सुरू असूनही, प्रशासन किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा देखरेखीचा अभाव असल्याचे चित्र दिसून येत आहे. लाखो रुपयांचा निधी मंजूर होत असतानाही रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याने, सरकारी निधीचा अपव्यय होत असल्याचे गावक?यांचे म्हणणे आहे. गावक?यांनी स्पष्टपणे सांगितले की, या रस्त्याचे अजून लोकार्पणही झालेले नाही, तरीही तो खराब होतो, ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. त्यामुळे थर्ड पार्टी ऑडिट व चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. याबाबत लोकप्रतिनिधींनी मौन बाळगले असून, त्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

### केवळ निधी वाया जातोय?

या घटनेमुळे चांदूर बाजार तालुक्यातील इतर विकासकामांचीदेखील चौकशी होण्याची मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासन आणि शासनाने यावर तातडीने पावले उचलून दोषींवर कारवाई केली, तरच जनतेचा सरकारी यंत्रणेवरील विश्वास टिकून राहील. अन्यथा, अशा निकृष्ट कामांमुळे केवळ निधी वाया जात नाही, तर सामान्य जनतेचा जीवही धोक्यात येऊ शकतो.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना प्रधानमंत्री सडक योजनेचे अभियंता राहुल जवंजाळ म्हणाले की, संबंधित रस्त्यावर क्रॅक निर्माण झाल्याचे लक्षात आले आहे. लवकरच दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल आणि वेळेत पूर्ण केले जाईल.



# मतदान पर्यवेक्षक वसीम फरहत यांचा नवी दिल्लीत राष्ट्रीय सन्मान

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.२२) -** बडनेरा ३७ विधानसभा मतदारसंघ अंतर्गत भातकुली तहसील येथे कार्यरत असलेले मतदान पर्यवेक्षक अधिकारी वसीम फरहत यांचा नवी दिल्लीत राष्ट्रीय पातळीवर सन्मान करण्यात आला. भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था, नवी दिल्ली येथे १२ व १३ जून रोजी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात त्यांचा गौरव करण्यात आला.

या दोन दिवसीय प्रशिक्षणात महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा राज्यांतील जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक अधिकारी आणि बीएलओ अधिकारी सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून एकूण १३२ अधिकारी या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. अमरावती जिल्ह्यातून बडनेरा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना वसीम फरहत यांनी अत्यंत प्रभावी सहभाग नोंदवला.

वसीम फरहत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुलभ आणि विश्वासार्ह ठेवण्यासाठी केंद्रस्तरावरील मतदान अधिकारी सतत अद्ययावत राहणे आवश्यक आहे. निवडणूक व्यवस्थापन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी एक महत्त्वाचा भाग आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात अमरावतीचे तत्कालीन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारत निवडणूक आयोगाचे आयुक्त डॉ. विवेक जोशी यांनी भूषवले. निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी मास्टर ट्रेनर म्हणून उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. वसीम फरहत यांचा सन्मान महाराष्ट्र राज्याचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दुल यांच्या हस्ते करण्यात आला. आपल्या यशाचे श्रेय वसीम फरहत यांनी उपजिल्हाधिकारी जाधव साहेब, जिल्हा उप निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, तहसीलदार डॉ. अजित कुमार येले, नायब तहसीलदार वाढोणकर आणि अशोककुमार कळीवकर यांना दिले. त्यांच्या या गौरवाबद्दल उर्दू शिक्षक संघटना व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अमरावतीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.






# समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मातृशक्तीच्या हस्ते गौरव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२२) -** वीरशैव लिंगायत बहुउद्देशीय सेवा संस्था, अमरावतीच्या वतीने २०२५ मध्ये दहावी व बारावीच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे या सोहळ्यात गुणगौरव समाजातील मातृशक्तीच्या हस्ते करण्यात आला, यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.


या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माधुरी मेंडसे यांनी भूषवले. त्यांच्यासह विजया गुढे, संजीवनी भोगांवकर, शारदा गव्हाणे, अश्विनी कुर्हे, सुरेखा चोंढीकर, अल्का जीवरकर, किरण काळे, पल्लवी धाके आणि भारती कुर्हेकर या मान्यवर महिलांनी विद्यार्थ्यांना सन्मानित केले. कार्यक्रमाची सुरुवात कविता बरमकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. संचालन सविता गुढे यांनी केले तर आभार प्रदर्शन मीनल काडोदे यांनी व्यक्त केले. या सोहळ्यास संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, समन्वयक, समाजातील मान्यवर, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशाला दाद देताना उपस्थित मातृशक्तीने शैक्षणिक प्रगतीसाठी मार्गदर्शन केले व समाजाच्या प्रगतीत महिलांचा वाटा वाढवण्याचा संदेश दिला. आजच्या युगात ज्ञान, विज्ञान, संगणक, प्रशासकीय सेवा आणि लष्कर यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांचे सक्रीय योगदान दिसत आहे. त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने आयोजित मातृशक्तीच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला. कार्यक्रमातून समाजात शिक्षणाची महती व महिलांचा सशक्त सहभाग अधोरेखित झाला.

# युवक काँग्रेसने शहरात राबविले स्वच्छता अभियान

### सायंस्कोर मैदान ते काँग्रेस भवन रस्त्यांची स्वच्छता

### नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२२) -** शहरातील वाढती अस्वच्छता, ठिकठिकाणी साचलेला कचरा आणि मनपाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेली आरोग्यधोक्याची स्थिती याच्या विरोधात अमरावती युवक काँग्रेसने गांधीगिरी पद्धतीने 'स्वच्छता अभियान' राबवत सशक्त जनआंदोलनाचा प्रारंभ केला आहे. जननायक राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त १९ जूनपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत २२ जून रोजी रुक्मिणी नगर येथील सायंस्कोर मैदान ते काँग्रेस भवन रस्त्यापर्यंत विशेष सफाई मोहीम राबवण्यात आली.

शहरातील ऐतिहासिक आणि वर्दळीच्या या भागात मोठ्या प्रमाणावर कचरा साचला होता. युवक काँग्रेसने या भागातील अस्वच्छतेबाबत आवाज उठवल्यानंतर अखेर मनपा प्रशासनाने यंत्रणा कार्यान्वित केली. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेत कचरा उचलून परिसर स्वच्छ केला. या उपक्रमात स्थानिक नागरिकांनीही सहभाग घेत युवक काँग्रेसच्या या उपक्रमाचे कौतुक केले. या अभियानावेळी अनेक मान्यवर आणि काँग्रेस नेते उपस्थित होते. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर मिलिंद चिमोटे, विलास इंगोले, अशोकराव डोंगरे, प्रदेश काँग्रेस सचिव किशोर बोरकर, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, तसेच माजी नगरसेवक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात समीर जवंजाळ, अनिकेत देशमुख, सागर कलाने, योगेश बुंदेले, नितीन काळे, संकेत साहू, आकाश धुराटकर यांसारख्या युवक काँग्रेस आणि एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांनी देखील मोलाचे योगदान दिले. स्वच्छतेच्या या मोहिमेत प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात जनजागृती घडवून आणण्यात आली. युवक काँग्रेसने स्पष्ट इशारा दिला की, जर वेळेत मनपा प्रशासनाने स्वच्छतेबाबत उपाययोजना केल्या नाहीत, तर आंदोलन तीव्र करण्यात येईल. या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण झाली असून, युवक काँग्रेसने घेतलेली ही जबाबदारी निश्चितच स्तुत्य आहे. युवकांनी घेतलेला पुढाकार आणि गांधीगिरी पद्धतीची भूमिका स्वच्छ आणि सुशोभीकरणाकडे नेणारी दिशा दाखवत असल्याचे नागरिकांनी म्हटले.

# श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबाचे विश्वस्तपदी प्रविण कुकडकर यांची नियुक्ती



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे (दि.२२) -** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि कापुराची यात्रा म्हणून ओळख असलेल्या सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दि.२१/६/२०२५ रोजी विश्वस्त मंडळाची सामान्य सभा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. संस्थानचे विश्वस्त स्व. अनिल बेलसरे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर प्रविण नानाजी कुकडकर यांची बहुमताने निवड करण्यात आली.

या निवडीमुळे ग्रामस्थ आणि संस्थान भक्तांतून समाधान व्यक्त होत आहे. नियुक्ती प्रसंगी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्नील चौधरी उपस्थित होते. नवीन विश्वस्त प्रविण कुकडकर यांचे पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. त्यांच्या सहभागामुळे संस्थानच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात नवा उत्साह आणि गती निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चांदूर रेल्वे शहरात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

## नगर परिषद , पतंजली योगपीठ, सहजयोग यांचा स्तुत्य उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,(दि.२२)-** चांदूर रेल्वे नगर परिषद , पतंजली योगपीठ आणि लोकमत सखी मंच यांच्या संयुक्त विद्यामानाने २१ जुन रोजी सकाळी ६:०० वाजता हुतात्मा स्मारक येथे अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिके सादर करून योग दिन साजरा करण्यात आला.

' एक पृथ्वी आरोग्यासाठी योग ' हे या वर्षीच्या घोषवाक्यनुसार एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग या संकल्पनेवर आधारित यंदाचा दिन कल्याणकारी एकात्मिक दृष्टिकोन देणारा ठरणार आहे. 'सर्वे सन्तु निरामयः ' (सर्व रोगमुक्त होऊ देत) या भारतीय नीति तत्त्वातून मानव आणि ग्रहांच्या आरोग्याच्या परस्-परसंबंधावर यामध्ये भर दिला आहे...योग शिक्षिका सोनोने यांनी योग साधनेचे महत्व विषद करत उपस्थित नागरिकांना योगासना चे प्रशिक्षण दिल्या गेले..नगर परिषद चांदुर रेल्वेचे मुख्याधिकारी विकास खंडारे हे आजच्या योगा दिवसाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते.माजी जी. प. शाळेच्या माजी शिक्षिका कुंभारे यांनी सुद्धा उपस्थिताना मोलाचे मार्गदर्शन केले. नंदा वाधवानी , बच्चू वानरे, पप्पू भालेराव, तसेच लोकमत सखीमंच च्या विभाग प्रतिनिधी सुलोचना राऊत , सुषमा पातूर्डे , लता बागडे ,करुणा जावरकर , मंगला मेंढे, पूजा नारेपाल , तसेच पतंजली च्या योग शिक्षिका सुनंदा सोनोने, संध्या साबळे, कुंभारे, धनश्री श्रीराव हे मान्यवर आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार लता बागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नगर परिषदचे मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे यांच्या मार्गदर्शात नगर परिषदेतील कर्मचारी आशिष कु?हाडे, जितेंद्र कर्से, कीर्ती जावडे, शुभम कांबळे, संगीता इमले, श्वेता डोंगरे, शहर समन्वयक पल्लवी जामोदकार, श्यामल नदरधने, देविका बनवे, प्रजा लाकडे , सहाय्यक प्रकल्प अधिकारी उज्वला पटले, उमेश इंगोले, सागर हटवार, विशाल सूरकर, संजय वानखेडे, मनीष कनोजे,अनंता वानखेडे,राजेश शिर्के, मयूर घोडेस्वार, अमोल कड्डू, नीरज दुबे सहकार्यानी पार पडला.

# विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२२)-** विजेचा जोरदार धक्का बसून एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गाडगेनगर हद्दीतील अभिनव कॉलनी परिसरात घडली. शेख वसिम शेख आझिम (वय २३, रा. आजरानगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. वसिम कामानिमित्त अभिनव कॉलनीमधील एका खासगी रुग्णालयात गेला होता. तेथे त्याच्याकडून विद्युत विभागाशी संबंधित काम सुरू होते. यावेळी त्याला अचानक विजेचा धक्का बसला. यात तो गंभीर जखमी झाला. तातडीने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. वसिम नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असून तो हल्ली कामासाठी शेगाव नाका परिसरात जात होता. त्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबियांसह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# वरुड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा





**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.२२) -** कृषी उत्पन्न बाजार समिती आणि योगेश्वर योगा साधना ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने वरुड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार नरेशचंद्र उर्फ बाबासाहेब ठाकरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंदु यावलकर उपस्थित होते. १५ ते २१ जून दरम्यान योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो पुरुष व महिलांनी सक्रीय सहभाग नोंदविला. योग शिक्षक अशोक घोरमाडे यांनी उपस्थितांना योगाचे धडे दिले. त्यांनी योगासने व प्राणायामाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, ङ्गयोगासने केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक आरोग्यासाठीही अत्यंत लाभदायक आहेत. योगामुळे शरीराच्या प्रत्येक स्नायूंचा व्यायाम होतो आणि नियमित योगामुळे आजार दूर होतात.ङ्ग त्यांनी सर्वांना नियमितपणे पहाटे उठून योग करण्याचा संदेश दिला. या वेळी मंचावर माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे, आमदार उमेश यावलकर, डॉ. राजेंद्र राजुरिया, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र (बबलू) पावडे, डॉ. विजय देशमुख, डॉ. मीना बंदे, डॉ. कविता देशमुख, महेंद्र देशमुख, संचालक राजेश गांधी, बाळू पाटील, नितीन खेरडे, तारेश देशमुख, महेश बोरकुटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व प्रमुख पाहुण्यांनी योग दिनाच्या महत्त्वावर भाष्य करत नियमित योग साधनेचे फायदे सांगितले. या निमित्ताने योग शिक्षक अशोक घोरमाडे यांचा माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि ज्येष्ठ योगसाधक उषा वायकुळ व बाबाराव जाणे यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश देशमुख, प्रमोद देऊळकर, डॉ. आशिष डहाने, डॉ. आनंद झामडे, राजु चांडक, संदीप धोटे, विजय जिचकार, महेंद्र राऊत, उद्धव फुटाणे, सुनील काळे, पंकज अनासाने, नितीन अगदकर, रामचंद्र राऊत, सर्वेश कवडे, रामचंद्र गेडाम, अजय राठी, नंदकिशोर बोडखे, सुरेश सालोडे, विजेण खंडेलवाल, सचिन वायकुळ, निलेश मगरदे, महेंद्र खापरे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन एलआयसी चे विकास अधिकारी प्रमोद देऊळकर यांनी केले, तर प्राचार्य संदीप धोटे यांनी औपचारिक आभार मानले.

# जन्म-मृत्यू दाखला वाटप प्रक्रिया अद्यापही ठप्प

## खासदार वानखडे यांची त्वरीत कार्यवाहीची मागणी | किरीट सोमय्या यांच्या आरोपांनंतर प्रशासन साशंक

### शेकडो नागरिक अडचणीत




**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर/ अमरावती, (दि.२२) -** अमरावती जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांमध्ये नागरिकांना जन्म व मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी लावलेले बनावट प्रमाणपत्रनिर्मितीचे गंभीर आरोप. या आरोपांनंतर महाराष्ट्र सरकारने नायब तहसीलदारांमार्फत वितरित करण्यात आलेली सर्व जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे रद्द केली होती. जरी शासनाने यासंदर्भात स्पष्ट आदेश काढले असले तरीही जिल्हास्तरावर अद्याप प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया सुरु झालेली नाही. परिणामी, हजारो नागरिक शासकीय कामकाज, शाळा प्रवेश, पेन्शन, विमा, वारसा हक्क यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांअभावी अडचणीत सापडले आहेत. या गंभीर विषयाची दखल घेत अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी जिल्हाधिका?यांना पत्र लिहून ही प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.

त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, शासनाचे स्पष्ट आदेश असूनही अनेक तहसील कार्यालयांमध्ये ही प्रक्रिया पूर्णतः बंद आहे आणि त्यामुळे सामान्य जनतेवर अन्याय होत आहे. खासदार वानखडे यांनी हेही स्पष्ट केले की, किरीट सोमय्या यांनी लावलेल्या आरोपांमध्ये बांगलादेशी व पाकिस्तानी नागरिकांना बनावट प्रमाणपत्र दिल्याचे म्हटले होते, मात्र तपासामध्ये अशा कोणत्याही प्रकारचा एकही ठोस पुरावा सापडलेला नाही. कोणत्याही विदेशी नागरिकाला महाराष्ट्रात वैध अथवा अवैध मार्गाने जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्र मिळाल्याचे उदाहरण आढळलेले नाही. त्यामुळे ठोस पुराव्यांशिवाय संपूर्ण प्रक्रिया थांबवणे म्हणजे जनतेवर अन्याय होय.

### नागरिकांची पायपीट

प्राप्त माहितीनुसार, अनेक तहसील कार्यालयांमध्ये आजही प्रमाणपत्र वाटप बंद आहे. त्यामुळे शासकीय योजनांचे लाभ, बँक व्यवहार, शाळांतील प्रवेश प्रक्रिया, पासपोर्ट काढणे इत्यादी महत्त्वाच्या सेवा खोळंबल्या आहेत. विशेषतः ग्रामीण व मागास भागातील नागरिक तहसील कार्यालयांचे फेरे मारत आहेत, मात्र त्यांना कोणतेही स्पष्ट उत्तर मिळत नाही. खासदार बळवंत वानखडे यांनी मुख्यमंत्री, राज्याचे बालविकास मंत्री तसेच जिल्हाधिका?यांना विनंती केली आहे की, ही प्रक्रिया त्वरित सुरु करून नागरिकांना दिलासा द्यावा. ही प्रशासनाची निष्क्रियता केवळ नागरिकांसाठी त्रासदायक ठरत नाही, तर शासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करते, असे त्यांनी नमूद केले. आता प्रशासन आणि शासन यावर किती लवकर कार्यवाही करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन ही प्रक्रिया पूर्ववत सुरु केल्यास हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# सावंगा विठोबा नगरीत 'चंदन-उटी' उत्सवाचे भक्तिभावात आयोजन





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,(दि.२२) -** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे अमावस्या निमित्त 'चंदन-उटी उत्सव' भक्तिभावात संपन्न होणार आहे. श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने दिनांक २५ जून २०२५, बुधवार रोजी दुपारी ४.३० वाजता या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


अलीकडेच गुढीपाडवा ते रामनवमी दरम्यान झालेल्या यात्रोत्सवात लाखो भाविकांनी हजेरी लावून शेकडो क्विंटल कापुर जाळत आपल्या मनोकामना मांडल्या होत्या. त्यानंतर आता पुन्हा एक भक्तीपूर्ण पर्वणी 'चंदन-उटी उत्सवाच्या' निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे. यावेळी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी आदींची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमानंतर बाहेरगावाहून आलेल्या भाविकांसाठी महाप्रसाद (अन्नदान) समितीच्या माध्यमातून अन्नदानाचा आयोजन करण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने सर्व भक्तांना तन, मन आणि धनाने सहभाग घेऊन या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## उबाठा सेनेची अगतिकता...

# कोणी युती करताय का युती?

एकनाथ शिंदे यांनी तीन वर्षांपूर्वी बंडाचा झेंडा फडकवल्यापासून उबाठा सेनेची सतत घसरण व अधोगती बघायला मिळत आहे. राहुल गांधी व शरद पवार यांच्या मदतीने उद्धव ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळवले. पण अडीच वर्षांतच त्यांना एककल्ली वागणुकीमुळे सर्वोच्चपदावरून पायउतार व्हावे लागले. राज्याची सत्ता गेली. पक्षाचे नाव, चिन्हही गेले आणि देशातील सर्वांत श्रीमंत असलेल्या मुंबई महापालिकेतील सत्तेलाही ग्रहण लागले. मुंबई महापालिकेवर अविभाजित शिवसेनेने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईने पंचवीस-तीस वर्षे सत्ता उपभोगली. पण शिवसेनाप्रमुखांच्या हयातीनंतर पक्षाला मोठी गळती लागली. चार महिन्यांवर राज्यात महापालिका, जिपच्या निवडणुका अपेक्षित आहेत. वाट्टेल ते करून मुंबई महापालिकेची सत्ता कशी मिळवायची, या प्रश्नाने उबाठा सेनेतील नेत्यांची व पक्षप्रमुखांची झोप उडाली आहे. उबाठा सेनेतील बहुतेक सर्व दिग्गज नेते शिवसेनेत किंवा भाजपात गेले आहेत. शिल्लक सेनेला बरोबर घेऊन पुन्हा सत्ता मिळवता येणार नाही, याची उद्धव ठाकरे यांना पूर्ण जाणीव आहे, म्हणूनच राज ठाकरे यांच्या मनसेने महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेशी युती करावी म्हणून त्यांना आळवणी करण्याची पाळी उद्धव यांच्यावर आली आहे.

गेले दोन-तीन महिने उबाठा सेनेकडून मनसेचे लक्ष वेधण्यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. उबाठा सेनेच्या मुखपत्रातून उद्धव व राज एकत्र असलेले छायाचित्र प्रसिद्ध करून जणू दोघे बंधू आता मनाने एकत्र आलेले आहेत, अशी हूल उठविण्यात आली. राज ठाकरे यांनी वेगळा पक्ष स्थापन केल्यापासून कधी नव्हे ते उद्धव यांना त्यांची राजकीय गरज भासू लागली आहे. उबाठा सेनेच्या सैनिकांनाही उद्धव - राज एकत्र येणार, म्हणून पक्षातून मधाचे बोट लावण्यात आले आहे. दि. १९ जूनला शिवसेना पक्षाचे दोन वर्धापन दिन मुंबईत साजरे झाले. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा वर्धापन दिन शीव येथील षण्मुखानंद सभागृहात, तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा वरळी डोममध्ये साजरा झाला. या दोन्ही मेळाव्यात मनसेची संभाव्य युती हा कळीचा मुद्दा राहिला. महापालिका निवडणुकीत राज ठाकरे कुणाबरोबर जाणार की स्वबळावरच लढणार? हे अद्याप गूढ आहे. ते स्वत: या विषयावर काहीच बोलत नाहीत. पण युतीचा मुद्दा निघाला की त्यांचे शिलेदार इतकी वर्षे उद्धव ठाकरे यांनी मनसेला कशी वागणूक दिली असा प्रश्न विचारून अनेक उदाहरणांचा पाढा उगाळतात. उबाठा सेना व मनसे यांच्या युतीच्या चर्चेला उधाण आले असतानाच मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई पश्चिम उपनगरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये भेट घेतली आणि उबाठा सेनेबरोबर युतीच्या चर्चेला तडा गेला. षण्मुखानंद सभागृहातील मेळव्यात उद्धव ठाकरे यांनी मनसेबरोबर युतीच्या मुद्द्यावर बोलताना जे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे, तेच होईल असे वक्तव्य केले. या विषयावर निर्णय घेण्यास आम्ही सक्षम आहोत, इतरांनी त्याची चिंता करू नये, असेही त्यांनी बोलून दाखवले. उबाठा सेना व मनसे युतीविषयी भाजपाचे नेते बोलताना, दोन्ही भाऊ एकत्र येत असतील तर ते चांगलेच आहे, अशी भूमिका मांडताना दिसतात. पण त्यांना नक्की ठाऊक आहे, हे दोघे बंधू एकत्र येण्याची शक्यता कमी आहे. उद्धव यांच्याकडून राज ठाकरे एकदा नव्हे तर अनेकदा कमालीचे दुखावले गेले आहेत, हे त्यांना कधीही विसरता येणार नाही. अविभाजित शिवसेनेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असताना पक्षात राज यांचे महत्त्व वाढता कामा नये, याची दक्षता उद्धव यांनी नेहमीच घेतली होती. निर्णय प्रक्रियेत राज यांना डावलण्यात येत होते. उमेदवार निवडताना राज यांच्या शिफारसीला किमत दिली जात नव्हती. राज यांनी स्वत:चा वेगळा राजकीय पक्ष स्थापन केला, त्यामागे अनेक कारणे आहेत. पण उद्धव यांनी आपल्या भावाची कदर कधीच केली नाही. राज ठाकरे यांनी आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यापासून उद्धव व राज यांच्यात कधीच सुमधुर संबंध नाहीत. एवढेच नव्हे तर शिवसेनाप्रमुख हयात असताही ते नव्हते. उद्धव यांनी पक्षात सर्वकाही हातात घेतल्यापासून दोघा भावांमध्ये दुरावा आहे. शिवसेनाप्रमुखांच्या अंत्ययात्रेतही राज यांना अवमानकारक वागणूक मिळाली होती हे कसे विसरता येईल?



महाराष्ट्रनामा

सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

उबाठा सेनेला युतीसाठी घाई झाली असली तरी मध्यस्थ कोण आहे, एवढा परिपक्व, विश्वासू व दोघांनाही मान्य होईल असा नेता दोन्ही पक्षांत नाही. युती झाली तर बॉस कोण? जागा वाटप कसे होणार? दोघांची मदार मराठी मतांवर. मग माघार कोण घेणार? गेल्या वीस वर्षांत दोन्ही पक्षांत नवीन नेतृत्व निर्माण झालेले नाही. दोन्ही पक्षप्रमुख हेच दोन्ही पक्षांत सुप्रीम आहेत व त्यांच्याभोवतीच सारा पक्ष फिरताना दिसतो आहे. जरी दोन्ही पक्ष युती करायला तयार झाले तरी भाजपा त्यांना एकत्र येऊ देईल का? हा सर्वांत मोठा व कळीचा मुद्दा आहे.

राज्यात व केंद्रात भाजपा सत्तेवर आल्यापासून मराठी माणसाची अवस्था वाईट झाली आहे. मराठी माणूस, मराठी भाषा व मराठी अस्मिता यांची गळचेपी चालू आहे. महाराष्ट्राला अवमानास्पद वागणूक मिळत आहे म्हणून मराठी माणसासाठी व महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव व राज यांनी एकत्र यावे अशी भावनिक मोहीम चालवली जात आहे. आमच्या वादांपेक्षा मराठी माणूस व महाराष्ट्र हित मोठे आहे असेही उबाठा सेनेने आवाहन केले आहे. ठाकरे बंधूच मराठी माणसाला वाचवू शकतील असे सांगण्यात आहे. पण या भावनिक जाळ्यात मनसे अडकणार नाही किंवा मनसेची तशी मानसिकता नाही असे आजचे तरी चित्र आहे.

मनसेबरोबर युती व्हावी यासाठी उबाठा सेना अगतिक झाली आहे. उबाठा सेनेला खूप घाई झाली आहे. एकनाथ शिंदे यांच्यात शब्दांत सांगायचे तर उबाठा सेना लाचार झाली आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार म्हणून राज्यात काही ठिकाणी पोस्टर्सही झळकले. मनसे सैनिकांच्या बरोबर उबाठा सेनेच्या सैनिकांच्या भेटी-गाठी वाढल्या आहेत. मनसे नेते भेटल्यावर उबाठा सेनेचे पदाधिकारी गळाभेटी घेत आहेत. पण हे सर्व एकतर्फी चालू आहे असे दिसते. एकीकडे भाजपा हा महाराष्ट्र व मराठी विरोधी आहे असे चित्र निर्माण करायचे व दुसरीकडे मराठी माणसाला वाचविण्यासाठी ठाकरे बंधूंनी युती करणे गरजेचे आहे असे सांगायचे अशी दुहेरी प्रचार मोहीम उबाठा सेनेकडून चालू आहे. मात्र उबाठा सेनेच्या आवाहनाला मनसेचा प्रतिसाद थंड आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई - विरार, मीरा - भाईंदर, अंबरनाथ तसेच पुणे, पिंपरी - चिंचवड, छ. संभाजी नगर, नाशिक अशा प्रमुख महापालिकांमध्ये मराठी मतांचे विभाजन होऊ नये यासाठी उबाठा सेना मनसेला बरोबर घेण्यासाठी उतावीळ झाली आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना, उद्धव ठाकरे यांची उबाठा सेना आणि राज ठाकरे यांची मनसे असे तिन्ही पक्षांत मराठी मताचे विभाजन झाले, तर उबाठा सेनेचे सर्वाधिक नुकसान होणार आहे. भाजपा, काँग्रेसकडेही मराठी मतांचा टक्का आहे हे विसरून चालणार नाही. मराठी मतदारांची एकगठ्ठा मते एकाच पक्षाकडे अशी स्थिती नाही. भाजपाला मराठी मतांबरोबरच अमराठी मतांचा मोठा लाभ मिळतो ही या पक्षाची मोठी जमेची बाजू आहे. राज ठाकरे यांच्या संपर्कात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जसे आहेत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीयमंत्री व खासदार नारायण राणे, भाजपाचे अनेक नेते नियमित असतात. तसे उबाठा सेनेतून राज यांच्या संपर्कात उघडपणे कोण असते? आता महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेला एकदम राज ठाकरे यांच्या पक्षाची गरज भासू लागली यामध्ये स्वार्थाशिवाय दुसरे काय असू शकते

सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे काँग्रेसबरोबर गेले, मुख्यमंत्री झाले. तेव्हा निर्णय घेताना त्यांनी मतदारांना, पक्षातील पदाधिकाऱ्यांना किंवा शिवसैनिकांना कोणाला विश्वासात घेतले होते? तेव्हा मतदारांना विचारले होते का? तेव्हा राज ठाकरे यांना बोलावून चर्चा केली होती का, मनसेला काय वाटते अशी विचारणा केली होती का? शिवसेना पक्ष व चिन्ह हातातून गेले. फूट पडली. जेमतेम २० आमदार निवडून आले म्हणून उद्धव यांना राज यांची आठवण होते आहे का? चारच महिन्यांपूर्वी मनसेच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनाप्रमुखांचे फोटो लावले म्हणून उबाठा सेनेच्या नेत्यांनी व प्रवक्त्यांनी आक्षेप घेतला होता, मग आता एकदम मनसेची उबाठा सेनेला उचकी का लागते आहे? खरी शिवसेना कोणती हे एकनाथ शिंदे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दाखवून दिले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुन्हा एकदा मुंबईत येऊन ठणकावून सांगितले, यातच उबाठा सेनेने आपले भविष्य काय आहे हे समजून घ्यावे... कम ऑन किल मी... असे आवेशात आव्हान द्यायचे, अंगावर यायचे तर येताना ॲम्ब्युलन्स घेऊन या असे सांगताना, जाताना आडवे होऊन जाल अशी भाषा वापरायची, मग एवढी ताकद आहे, तर मनसेने युती करावी यासाठी अगतिकता कशासाठी? ७६ हजार कोटींचे बजेट असलेल्या मुंबई महापालिकेची निवडणूक ही उबाठा सेनेच्या अस्तित्वाची लढाई आहे म्हणूनच कोणी युती करताय का युती? असे विचारण्याची पाळी आली आहे...

# अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या हृदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावात त्यांचा झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भगवानराव तर आईचे नाव सोनाबाई असे होते. त्यांना दोन मोठे भाऊ होते. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई भाऊही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जनमलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. जून रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंड देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**



## राशीभविष्य

**मेष :** आज चांगल्या कामात अडथळे येऊ शकतील. पण थोडे प्रयत्न केल्यास परिस्थिती अनुकूल होऊ लागेल. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. पूर्वी प्रलंबित असलेले काही काम पूर्ण होतील.

**वृषभ :** आजचा दिवस चढ-उतारांनी भरलेला असेल. पूर्ण होत आलेल्या कामात बरेच अडथळे येतील. पण हळूहळू परिस्थिती अनुकूल होईल. तुमच्या भावनांना योग्य दिशा द्या. गायन क्षेत्रात सक्रियता वाढेल.

**मिथुन :** काही व्यावसायिक सहकार्यामुळे तुमच्या व्यवसायाला गती मिळेल. तुम्हाला तुमच्या वडिलांकडून पाठिंबा आणि साथ मिळेल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल.

**कर्क :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. तुम्हाला सामाजिक कार्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळेल.

**सिंह :** एखाद्या काही महत्त्वाच्या कामात अनावश्यक विलंब होऊ शकतो. तुम्ही व्यवसायात अत्यंत व्यस्त राहाल. सामाजिक कामात तुमची भूमिका महत्त्वाची असेल. प्रकृतीकडे लक्ष पुरविणे गरजेचे आहे

**कन्या :** कोणत्याही वादात पडू नका. अन्यथा तुम्ही अनावश्यक समस्यांमध्ये अडकू शकता. वाईट सवयी सोडून द्या. प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमाने काम करा. यश नक्की मिळेल.

**तुळ :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना नोकर, वाहन इत्यादी सुविधा मिळतील. आज बँकेत जमा असलेल्या भांडवलाची रक्कम वाढेल. खूप महत्त्वाचे काम यशस्वी होईल.

**वृश्चिक :** नातेवाईकांशी परस्पर मतभेद निर्माण होऊ शकतात. धार्मिक कार्यात रस वाढेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. व्यवसायातील तुमच्या समजूतदारपणामुळे मोठ्या नुकसानापासून वाचाल.

**धनु :** विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अडथळे दूर होतील. तुम्हाला व्यावसायिक मित्राचा पाठिंबा आणि संगत मिळेल. चित्रकला कामात सहभागी असलेल्या लोकांना लक्षणीय यश आणि आदर मिळेल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी नफा आणि प्रगतीचा असेल. तुम्ही आधीच नियोजित केलेल्या कामांमध्ये यशस्वी व्हाल. विरोधकांपासून सावध रहा. तुमच्या योजना उघड करू नका.

**कुंभ :** व्यवसायात तुम्हाला कुटुंबातील सदस्याचा पाठिंबा आणि साथ मिळेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडे तिकडे भटकंती करावी लागेल. तुम्हाला शारीरिक श्रम करावे लागू शकतात.

**मीन :** सामाजिक कार्यात रस वाढेल. तुमचे वर्तन लवचिक बनवण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी गोंधळ निर्माण होऊ देऊ नका. जमीन, इमारत, वाहन यांच्याशी संबंधित कामात तुम्हाला अधिक रस असेल.

# मुलाखत : जलक्षेत्रातील तांत्रिकतेच्या बाबत सुज्ञ असणे आवश्यक

आज महाराष्ट्र राज्य भीषण दुष्काळाच्या उंबरठ्यावर आहे किंबहुना आपण अगोदरच नो रिटर्न मर्यादा ओलांडली आहे. महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हायला हवा या दृष्टीने अनेकजण प्रयत्न करत आहेत. परंतु तरीसुद्धा जलसाक्षरता दृष्टीने आपण बाल्यावस्थेतच आहोत. तज्ञ, प्रशासन आणि लोकसहभाग यात कधी नव्हे एवढी मोठी दरी निर्माण झाली आहे. या सगळ्यात दुष्काळमुक्तीसाठी झटणारे म्हणून जे कोणी भूजल वैज्ञानिक आहेत यात सुरेश खानापूरकर, उपेंद्रदादा धोंडे अशी मोजकीच नावे आढळतात. यावितिरिक्त महाराष्ट्रात केंद्रीय भूजल विभाग आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा मधील भूजल वैज्ञानिक आणि काही खाजगी भूजल वैज्ञानिक सातत्याने प्रयत्नरत आहेतही परंतु ते कदाचित कायदे-नियमांच्या बंधनांमुळे प्रसिद्धीझोतात नसतात. महाराष्ट्राचे जलक्षेत्र अनेक सेलिब्रिटी आणि काही प्रसिद्ध जल महापुरुष वगैरे लोकांनीच व्यापलेले दिसते. मुळात महाराष्ट्राचे जलधोरण म्हणून आपण कुठे चुकत आहोत का? याचे आत्मपरीक्षण होत आहे असे काही दिसत नाही, या सगळ्या परिस्थितीकडे भूजल वैज्ञानिक म्हणून आपण कसे पाहतो या विषयावर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भूजल वैज्ञानिक उपेंद्रदादा धोंडे यांच्याशी केलेली ही चर्चा.

**१. महाराष्ट्र गेल्यावर्षी मुबलक पाऊस पडून देखील या उन्हाळ्यात ग्रामीण व शहरी भागात पाण्याची वानवाच का ?**

ज्या प्रमाणामध्ये पावसाच्या पाण्याचे भूजलात रूपांतर व्हायला हवे त्या प्रमाणात ते होत नाही. कारण आपले प्रयत्न तांत्रिक दृष्टीने योग्य नाहीत. महाराष्ट्राची जल निरक्षरता हे खरं तर एक मोठे आव्हान आहे. महाराष्ट्रातील जलक्षेत्रात स्वयंघोषित खड्डेखोरांनी धुमाकूळ माजवला आहे आणि यावर कुणाचेही नियंत्रण नाही. प्रशासन व लोकप्रतिनिधी देखील खड्डेखोरांचे समर्थन करताहेत. कुठलीही शैक्षणिक तांत्रिक पात्रता नसलेल्या लोकांना शासन समर्थन-प्रोत्साहन देत आहे. शिवाय सरकारी भूजल वैज्ञानिक देखील समोर येऊन बोलत नाहीत कारण त्यांना कुणाचीही नाराजी ओढवून घ्यायची नाही. म्हणूनच महाराष्ट्राचे जलक्षेत्र हे स्वयंभू जलतज्ञांच्या हवाली करणे हेच खरे दुष्काळाचे कारण आहे.

**२. जलतारा सारख्या प्रकल्पाबाबत आपले मत काय ? हा प्रकल्प नेमका फायदेशीर आहे का ? कसा ?**

दरवेळी कुणीतरी उठतो आणि काहीतरी संकल्पना मांडतो. सदरच्या संकल्पनेची प्रसिद्धीमाध्यमं आणि प्रशासन-लोकप्रतिनिधी मार्फत प्रसिद्धी करवून घेतो आणि लोकांना आकर्षित केले जाते. हे करत असताना तज्ञांना मात्र जाणीवपूर्वक दूर ठेवले जाते कारण ते अशा गोष्टीतला फोलपणा उघड करत असतात. दर दोन-चार वर्षांनी अशी कुठली तरी संकल्पना येते प्रसिद्ध होते आणि कालौघात विरून जाते. त्याच्या यशापयशाचे कसलेही मूल्यमापन होत नाही, अथवा कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चित केली जात नाही. उदाहरणार्थ जलतारा व शोषखड्डा यात तसा विशेष काही फरक नाही. ही संरचना फक्त उथळ जलधराला काही अंशी रिचार्ज करणारी योजना आहे. यातून दुष्काळमुक्तीचे स्वप्न पाहणे म्हणजे मूर्खपणा आहे. शोषखड्डा, मैजिक पिट ईत्यादी नावाने हि संरचना पुर्वीपासूनच आहे. परंतु ती आजवर बहूप्रचलित होऊ शकली नाही कारण त्याची मर्यादित यशस्वीता. डासमुक्त परिसरासाठी शोषखड्डा हि संकल्पना निर्माण झाली होती आणि सोबतच यात निश्चितपणे काही प्रमाणात उथळ जलधर हा खात्रीनं रिचार्ज होतो यामुळे तिला पुनर्भरण संरचना देखील मानले गेले. परंतु या संरचनेची व्याप्तीच अत्यंत मर्यादित असल्याने, अर्थात संरचनेसाठी येणारा खर्च आणि तुलनेत फायदा याचे प्रमाण व्यस्त असल्याने, याची फार काही यशस्वीता आढळली नाही त्यामुळे हि योजना तशी उपयुक्त व सुलभ असूनही लोकप्रिय होऊ शकली नाही. म्हणूनच फक्त प्रसिद्धीचा ढोल वाजवत कोणत्याही योजनेला लोकप्रिय करण्याचे तंत्र दिर्घकाळ टिकत नसते, लवकरच लोकांना त्यातला फोलपणा समजतो परंतु दुर्दैवाने तोवर लोकांचे मोठे नुकसान होऊन गेलेले असते. अर्थात जसा शासनाला जाब विचारला जातो तसा जाब या स्वयंघोषित जल महापुरुषांना विचारला जात नाही.

**३. शेतीत सिंचन व्यवस्था मजबूत करण्यासाठी जल संधारण म्हणून नेमकं काय केलं पाहिजे ? शेतकऱ्यांनी वैयक्तिक लाभासाठी काय केलं पाहिजे ?**

तज्ञांच्या सल्लयाने गावस्तरावर जल आराखडा तयार करून त्रिस्तरीय पुनर्भरणाचे नियोजन केले पाहिजे. यात वैयक्तिक पातळीवर करण्याच्या पद्धती, सामूहिक पातळीवरील उपक्रम आणि शासकीय मदतीने, अशा प्रकारे कामांचे नेमकेपणाने वर्गीकरण केले पाहिजे. सहज जलबोध अभियानात आपण हे वर्गीकरण केले आहे. याशिवाय केंद्रीय भूजल विभाग तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यामध्ये तज्ञ प्रशिक्षित भूजल वैज्ञानिक आहेत त्यांच्या तज्ञतेचा योग्य वापर केला गेला पाहिजे. जसे सामान्य माणसाला जलसंधारणासाठी भूजल वैज्ञानिकाचे महत्त्व समजले पाहिजे तसेच ते सेलिब्रिटी व लोकप्रतिनिधींना देखील कळले पाहिजे.

**४. शेततळे योजना हि महाराष्ट्रात खूप लोकप्रिय होताना दिसत आहे पण खरंच ती फायदेशीर आहे का ?**

होय, शेततळे हे निश्चित उपयुक्त आहे पण जर ते भूजलाचा उपसा करून भरले जात असेल तर मात्र ते मोठ्या प्रमाणात धोकेदायक ठरते. कोणत्याही पाणलोटात एका निश्चित संख्येपेक्षा जास्त शेततळी करणे धोकेदायक आहे. शेततळ्यापेक्षाही अधिक उपयुक्त असलेले पाझर तलाव दिवसेंदिवस नष्ट होत आहेत यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या हद्दीत लहान आकाराचे पाझर तलाव ज्याला आम्ही भैरव कुंड असे नाव दिले आहे अशा प्रकारचे लहान लहान तलाव निर्माण केले पाहिजेत तेच खऱ्या अर्थाने परिसराला दुष्काळमुक्त करू शकतात. या विषयावर अधिक माहितीसाठी लोकांनी प्रशिक्षित भूजल वैज्ञानिकास संपर्क साधला पाहिजे.

**५. सरकारी भूजल वैज्ञानिक म्हणून तुमचे पुढील जलक्षेत्रातील उद्दिष्ट काय ? महाराष्ट्रातील जलक्षेत्रासाठी तुम्ही काय उपाय सांगाल ?**

केंद्रीय भूजल विभागाची काम करण्याची निश्चित पद्धती आहे. यामध्ये संशोधन आणि जलधरांचे व्यवस्थापन मोजमाप या गोष्टी महत्त्वाच्या असतात. परंतु केंद्रीय भूजल विभागाच्या मार्फत उपभोक्त्यांसाठी थेट योजना नसतात. थोडक्यात केंद्रीय भूजल विभागाचे काम म्हणजे राज्याच्या जलधरांची नेमकी स्थिती सांगणे आणि त्यावर उपाय सुचवणे हे आहे. खरंतर राज्य सरकारांनी कोणत्याही प्रकारची जलसंधारण योजना राबविण्यापूर्वी केंद्रीय भूजल विभागाचा, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या विभागातील तज्ञ भूजल वैज्ञानिकांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. केंद्रीय भूजल विभागाच्या ध्येयधोरणांचा, तांत्रिक माहितीचा लोकांना अधिकाधिक परिचय व्हावा आणि महाराष्ट्राच्या जलसाक्षरतेसाठी त्याचा फायदा व्हावा यासाठी आपल्या कूवतीनुसार जास्तीत जास्त प्रयत्न करणे प्रत्येक भूजल वैज्ञानिकाचे कर्तव्य आहे ते मी माझ्या परीने पार पाडत राहीलच. या सोबतच मी विषयतज्ञ म्हणून आणि सहज जलबोध अभियानाची भुमिका म्हणून लोकांपर्यंत जलक्षेत्रातील तांत्रिकता नेमकेपणाने पोहोचविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करील.

**मयुर बाळकृष्ण बागुल.**
**राज्य समन्वयक सहज जलबोध अभियान, महाराष्ट्र**
**चलभाषा ९०९६२१०६६९**

# ज्याठिकाणी श्रद्धा विश्वास आस्था असेल त्याठिकाणी मार्ग मिळतो : आचार्यश्री सुवीरसागरजी गुरुदेव

**नागपूर, २१ जून :** ज्याठिकाणी श्रद्धा, विश्वास, आस्था असेल त्याठिकाणी मार्ग मिळतो असे उदबोधन जैन आचार्यश्री सुवीरसागरजी गुरुदेवांनी बाहुबलीनगर येथील श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिराच्या वेदी शिलान्यास कार्यक्रमात दिले.

कार्यक्रमात दीप प्रज्वलन भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय महामंत्री संतोष जैन पेंढारी, श्री पार्श्वोदय तीर्थ नागठाणाचे अध्यक्ष डॉ. अरविंद भागवतकर, दिलीप राखे, सतीश जैन पेंढारी, पवन कान्हीवाडा, राकेश पाटणी, पंकज बोहरा, जितेंद्र तोरावत, किशोर मेंढे, हुकुमचंद सेठी, उल्हास क्षीरसागर, अशोक लाड, नितीन महाजन, अरुण पाटोदी, सुनील जैन पेंढारी, महेंद्र जैन, प्रशांत मानेकर, शशिकांत बानाईत, माजी उपमहापौर मनीषा कोठे, प्रा. उमेशचंद्र सरोदय, श्रीकांत मानेकर, सुधीर सिनगारे यांनी केले.

सकाळी जिनेंद्र भगवंताचा अभिषेक, पूजन, वास्तू विधान संपन्न झाले. शांतीधारा पदमा अरविंद कहाते यांनी केली. प्रतिष्ठाचार्य पं. संदीप जैन दौंड यांच्या मार्गदर्शनात पूजन विधी संपन्न झाला. संगीतकार शुभांगी जैन अमरावती यांनी सुमधुर आवाजात पूजनाची प्रस्तुती सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन नखाते यांनी केले. वेदीचा शिलान्यास डॉ. चंद्रनाथ जिवंधरजी भागवतकर यांनी केला. समृद्धी दर्यापूरकर, प्रमोद राखे, उल्हास जैन यांचे सहकार्य प्राप्त झाले. प्रथम कुर्म शीला जगदीश, विनोद, सोनासाव, आरती, येशू गिल्लरकर परिवाराने केली. आठ शीला डॉ. प्रांजली सावरकर, वर्षा राजेंद्र बंड, माधुरी जैन, जयंत सोईतकर, दीपिका व दिवाकर मांडवेकर, प्रकाश पळसापूरे, रिना राजेंद्र पिंजरकर, नितीन नखाते यांनी स्थापित केल्या.

नवग्रह पूजन अतिशय दीपेश जैन, आरोही सावरकर, कु. नित्या दर्यापूरकर, हर्ष भुसारी, सोहम मखे, आर्या सारंग कस्तुरे, शौर्य महात्मे, पवन दिलीप राखे, देवांश शहाकार, शर्वरी प्रमोद भागवतकर, अभिजीत जुननकर, विवान प्रणय राखे, मनस्वी मांडवगडे, आरना सागर तुपकर, समीक्षा उमेश मचाले, स्वर्णिमा जितेंद्र जैन, मिताली रोशन भुसारी, तीर्थ्या मुकेश पळसापूरे, अमूल्या अतुल येळवटकर, अधीर हितेश गडेकर यांनी पूजन केले.

आमदार कृष्णा खोपडे यांनी वेदी शिलान्यास कार्यक्रमात उपस्थित राहून आचार्यश्री सुवीरसागरजी गुरूदेवांचा आशीर्वाद घेतला आणि ते म्हणाले मंदिराचे काम पूर्ण होताच याठिकाणी एक शेड टाकून देण्यात येईल.

## आज का अंदाज

सोमवार २३ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| २४५ | २४८ | १६० | २२८ | २४६ | २५८ | १६९ | ८९० |
| ५६० | ३४७ | २५० | ३७८ | ३९० | ७८० | ३३० | ७०० |
| ४८९ | ४४६ | ३४० | ४७७ | ३५७ | ३५७ | २४० | ४४९ |
| १० | ४० | ७२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७३ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ | २९ | ५१ | ६४ | ७४ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ | २१ | ५९ | ६३ | ७८ |


**२३ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६४ | ९४ |
| २० | ३० | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# शब्दकोडे क्रमांक २१४४



**आडवे शब्द :-**
१) बातमी
४) बगल
६) जाणून-बुजून, हटकून
८) अधिक महिना
१०) लिंबू, साखर पाण्याचे पेय
१२) तुकडा, चावा
१३) पिता
१४) वेदना
१५) पत्र
१७) पृथ्वी
१९) एक आदिवासी जमात
२१) कुबेराचा सेवक
२२) एकाद्याच्या वतीने घातलेली भीड
२५) हाण! मार!
२७) धपाटा
२८) ओलसर हवा
३०) मर्यादा हद्द
३२) कोलकाताचे विमानतळ
३४) बारीक -सारीक
३६) आपले राष्ट्रगीत
३९) मान्यतेचा शब्द
४०) टिंगल
४१) **** कमीज एक पोषाख
४२) सत्ता
४४) दोरा
४६) प्रामाणिक
४७) रत्न
४९) फांदी तुटतानाचा आवाज
५१) धोका
५३) साल
५६) अवघड, कडक (इं.)
५७) कमीतकमी
६०) माफ
६१) संगीतातील एक राग
६२) जोखड
६३) चामखीळ
६४) त्वरा
६५) बशीचा जोडीदार
६७) चाबूक
६९) थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
७२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७३) दुर्गंधी येऊ लागलेला
७५) बारीक खांब
७६) युद्ध
७७) गीत
७८) दही घुसळण्याचे साधन
७९) पोलीस

**उभे शब्द :-**
१) वाळा
२) भरभराट
३) घासणे (इं)
५) दुष्ट माणूस
६) गुमान, मुकाट्याने
७) टप्प्याटप्पा घेत घेत
८) मध
९) गुरुजी
११) सिद्धता
१६) झाडाभोवतीचा कट्टा
१८) चीर, भेग, फट
१९) मंगळवेढ्यात जन्मलेली एक स्त्री संत
२०) तलवार
२३) कलंक
२४) घोडा, गाढवाची विष्ठा
२६) फूल, पुष्प
२९) अतिशय मऊ, मुलायम कापड प्रकार
३१) विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
३२) पानासकट कोवळी फांदी
३३) समुद्रकिनारा
३५) पुरुष
३७) बाज विणण्याची कापडी पट्टी
३८) नूतन
४१) नवऱ्याची दुसरी पत्नी
४३) सरसकट
४४) भीती, वचक, दरारा
४५) गवंड्याकडील दोरीचे एक साधन
४६) शर्करा
४८) मवाळ धोरण
५०) शाहीराजवळचे चर्मवाद्य
५२) जबरदस्तीने लावलेला विवाह
५४) लोकर (इं.)
५५) मध्यस्थ
५८) लज्जास्पद
५९) स्थान, जागृत
६३) अंत:करण
६६) वारा
६८) मच्छर
६९) सटवाई, दुष्ट स्त्री
७०) छोटी विश्रांती
७१) मृत्यु नसलेला
७४) हात
७६) सदोदित, नेहमी

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नव्या आशेने शेतात उतरलेल्या बळीराजाला दमदार पावसाची प्रतीक्षा

## पावसाची दांडी वाढविताहे चिंता



महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.२२)- निसर्गाच्या अवकृपेचा वारंवार सामना करत, बळीराजा पुन्हा नव्या आशेने आणि धीराने शेतात उतरला आहे. मृग नक्षत्र लागून आठवडा उलटूनही अजूनही दमदार पावसाची सर जमिनीवर आली नसल्याने शेतक?यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पावसाच्या प्रतीक्षेत शेतजमिनीची मशागत, बियाण्यांची जमवाजमव व पूर्वपावसाळी कामे सुरू असतानाच उकाड्याची तीव्रता आणि बाष्पयुक्त हवामानाने बळीराजाला अधिक चिंतेत टाकले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून असमान पावसामुळे शेतीचं गणित कोलमडले आहे. हवामान चक्र बिघडल्यामुळे पेरण्या वेळेवर होतातच असं नाही. सिंचनाच्या साधनांची वानवा असलेल्या अमरावती जिल्ह्यात बहुतांश शेतकरी अजूनही निसर्गाच्या कृपेवर अवलंबून आहेत. त्यातच बियाण्यांच्या दरात वाढ झाल्याने शेतकऱ्यांची उसनवारी वाढली आहे. रात्रंदिवस घाम गाळणारा बळीराजा, फक्त धान्य नव्हे तर संपूर्ण देशाचा पोशिंदा आहे. तरीही पावसावर असलेल्या अवलंबनामुळे दरवर्षी त्याच्या आयुष्यात नव्या संकटांची भर पडते.

यंदा तरी वरुणराजा प्रसन्न होईल, या आशेने शेतकरी देवपुजेला, नवसाला आणि मनोमन प्रार्थनेला सुरुवात केली आहे. ङ्गभरू दे यंदा मृगाचं आभाळ, नावाचा तुझ्या गजर करीना, हे साकडे त्याच्या मनात सातत्याने घुमत आहे. मान्सूनचे संकेत मिळाले असले तरी दमदार पावसाची प्रतीक्षा अद्याप अपूर्ण आहे. उशिरा येणारा पाऊस पेरण्या लांबवतो आणि नफा कमी करतो. तरीही बळीराजाचा निर्धार कमी होत नाही. अशा कठीण परिस्थितीतही तो नव्या हंगामासाठी सज्ज झाला आहे. यंदाचा खरिप हंगाम भरघोस होवो आणि बळीराजाच्या जीवनात समृद्धी येवो, हीच सर्वांची मन:पूर्वक अपेक्षा आहे.

### शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता

मृग नक्षत्र लागून आठवडा उलटला, दमदार पावसाचा अजूनही अत्तापर्यंत मागमूस नाही. बाष्पयुक्त हवामानामुळे उकाडा वाढला, आणि शेतक:यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. बियाण्यांचे वाढलेल्या दरामूळे बळीराजाची चिंता वाढवणारे ठरत आहे.



## मोठी मढीमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

### पतंजली महिला योग समिती आणि लोकजागर परिवाराच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

महासागर प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी,(दि.२२) - येथील मोठी मढी येथील महिला योग वर्ग, माळीपुरा आणि पतंजली महिला योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. 'करो योग, रहो निरोग' या घोषवाक्याखाली योग दिनाचे आयोजन करण्यात आले. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. योगाच्या माध्यमातून अनेक आजारांवर नियंत्रण ठेवता येते, असे मत याप्रसंगी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ. संगीता गोविंद मेण (पतंजली महिला जिल्हा संघटन मंत्री, योग शिक्षिका - लोकजागर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मोठी मढी महिला योग साधक मैत्रिणींनी उत्साहाने आयोजनात भाग घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रांजली महेंद्र धमाले आणि मिना दिलीप अंबुलकर यांनी दीपप्रज्वलन करून केले. योग प्रोटोकॉलचे सत्र डॉ. संगीता मेण यांनी घेतले. यावेळी स्व. गोविंद मेण यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. योगसाधिका विजया अवतने यांनी एक सुंदर कविता सादर केली आणि मेण यांना भेट दिली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयाताई हरणे, उज्वला लाडोळे, वनिता चांदुरकर, निता मोगरे, अनु हिवरे, ममता गोबरे, सुषमा अडगोकार, सुनंदा अडगोकार, अस्लेषा नाथे, वंदना नाथे, शोभा थोरात, वैशाली नवले, वंदना नवले, दिपा मेण, रेखा झापर्डे, भारती लोळे, मेघा लोळे, वनीता घटाळे, अश्विनी अडगोकार, सोनु सातपुते, जयश्री झाडे, काळे काकू, ढोले, सरिता हाडोळे, अनिता सोनपरोते, निर्मला सुने, विजया अवतने, मंगला अडगोकार, प्रणीता हरणे, संध्या टाक, सविता काळे, सुभद्रा काळे, कृतिका अवतने, विजया देवळे आणि छोटे बालयोगी आर्दीनी सहभाग घेतला. कार्यक्रम उत्साहात पार पडला.



## पैशांच्या वादातून महिलेला मारहाण

अमरावती : पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादात एका महिलेला मारहाण करून, तिला शिविगाळ करण्यात आली. या घटनेची तक्रार महिलेने २१ जून रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी जिहान, लकी, एसान, अवेद व एका महिलेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

## निरोगी जीवनासाठी योग, व्यायाम आणि आहाराचा समतोल महत्त्वाचा : जीवन फसाटे

### मोर्शीत ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



महासागर प्रतिनिधी

मोशी,(दि.२२) - फिटनेस ही एक दीर्घकालीन आणि सातत्याने पाळण्याची प्रक्रिया आहे. केवळ आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून एका दिवसापुरते योगासने करून आरोग्य टिकवता येत नाही, असे प्रतिपादन वेलनेस कोच जीवन फसाटे यांनी केले. स्व. भाई मंगळे योगा ग्रुप नेर पिंगळाई आणि जीएम वेलनेस अँड वर्क फ्रॉम होम सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, नेर पिंगळाई येथे आयोजित ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाचे नियोजन वेलनेस कोच सुनील डेहनकर यांनी केले होते. प्रमुख पाहुणे म्हणून वेलनेस कोच माधुरी देशमुख व डॉ. राजेंद्र करवा यांची उपस्थिती होती. जीवन फसाटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ङ्गजर औषधमुक्त जीवन जगायचे असेल, तर योगा, मेडिटेशन आणि संतुलित आहार हे तितकेच महत्त्वाचे आहेत. आहारच आपले औषध आहे. योग्य जीवनशैली आणि मानसिक, आध्यात्मिक, शारीरिक संतुलन राखणे गरजेचे आहे.

वेलनेस कोच माधुरी देशमुख यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांना योग, व्यायाम व आहाराचे महत्त्व सांगितले. ङ्गयोग दिन म्हणजे केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नव्हे, तर तो रोजच्या दिनचर्येचा भाग असावा, असे त्या म्हणाल्या. डॉ. राजेंद्र करवा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या बदललेल्या जीवनशैलीमुळे आरोग्य धोक्यात आले आहे. योग्य आहार आणि व्यायामाशिवाय आपण निरोगी राहू शकत नाही. आपण स्वतःचे डॉक्टर बनणे गरजेचे आहे. या कार्यक्रमात वेलनेस कोच सुनील डेहनकर यांनी त्यांच्या वैयक्तिक अनुभवातून आरोग्यदृष्ट्या झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती दिली. कार्यक्रमाला प्रीती माहुलकर, खैरकर, विजय खंडारकर, खुशाल नेरकर, गीतांजली नेरकर, मोहन नीगोट, ज्योती चोपकर, नीता शेगोकार, रजनी रघुवंशी, ममता म्हात्रे, व इतर गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनता विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



महासागर प्रतिनिधी

अंजनगाव बारी, (दि.२२) - जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे दिनांक १२ जून, शनिवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. योग ही भारताची प्राचीन परंपरा असून, तिचा मूळ उगम भारतात झाला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी योग अत्यावश्यक ठरतो. ग्रामीण भागातही योगाचे महत्त्व पोहोचवणे ही काळाची गरज बनली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक विनोद मुगल यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. त्यांनी उपस्थितांना योग दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, योग केवळ व्यायाम नसून तो मन, शरीर आणि आत्म्याचे एकत्रित आरोग्य टिकवण्याचे साधन आहे.ङ्घ त्यानंतर पर्यवेक्षक गजेंद्र अवघड व शारीरिक शिक्षक रितेश खुळसाम यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून विद्यार्थ्यांना योग्य तंत्र समजावून सांगितले. सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान तसेच विविध आसनांचे प्रात्यक्षिक यावेळी सादर करण्यात आले. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. निसर्गरम्य वातावरणात, शिस्तबद्धतेने पार पडलेल्या या उपक्रमामुळे सहभागी सर्वांना मानसिक व शारीरिक ऊर्जा मिळाली. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण केली असून, नियमित योगाभ्यास करण्याची प्रेरणाही दिली.

## योग हे आरोग्य, आत्मिक समृद्धीसाठी एक पाऊल - केतन खिरकर

### श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



महासागर प्रतिनिधी

अंजनगाव सुजी,(दि.२२) - आयुष मंत्रालयाच्या 'योग कनेक्ट' उपक्रमांतर्गत श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक केतन खिरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ङ्गयोग म्हणजे केवळ व्यायाम नाही तर आरोग्य आणि आत्मिक समृद्धीकडे जाणारे एक सकारात्मक पाऊल आहे. दररोज योग केल्याने शरीर निरोगी राहते तसेच मनाची एकाग्रता वाढते. कार्यक्रमात योगासनांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान व विविध योग क्रिया सादर केल्या. या उपक्रमात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा देखील उत्स्फूर्त सहभाग होता. निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे सहभागी सर्वांना मानसिक आणि शारीरिक ताजेतवानेपणा लाभला. या प्रसंगी विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक विपिन हंतोडकर, सारिका वाठ, अनंता मोहोड, मयुरी लोखंडे, श्रद्धा गोळे, भास्कर चव्हाण, धम्मपाल आठवले व अश्वघोष अभ्यंकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन सुयोग्य रीतीने करण्यात आले होते.

# मोर्शीत विविध ठिकाणी योग दिवस साजरा

महासागर प्रतिनिधी

मोशी,(दि.२३)- तालुक्यात विविध ठिकाणी योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मोशी आयटीआय, रिद्धपूर भाजप मंडल, श्रीमती आर.सी. हायस्कूल आणि शिवाजी शाळेत योगा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व लोकांना समजाविण्यात आले. शिक्षक, विद्याथी आणि स्थानिक नागरिकांनी सहभागी होऊन योगाचे फायदे अनुभवले. योग दिनाने लोकांमध्ये ताजेतवानेपण आणि ताण कमी करण्याची क्षमता विकसित केली. यामुळे समुदायातील आरोग्य सुधारण्यास मदत होईल, असे स्पष्ट झाले. योगाचे महत्त्व वाढवण्याचे काम प्रत्येक संस्थेने केले, हे प्रशंसनीय आहे.




## भाजपाच्या मोर्शी ग्रामीण रिद्धपूर मंडल तर्फे योग दिन

भारतीय जनता पार्टी मोर्शी ग्रामीण मंडला तर्फे रिध्दपूर येथे २१ जून रोजी 'ग्रंथ श्रुती -स्मृती भवन' येथे योग दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून योगासनाचा सराव योग प्रशिक्षक निलेश गव्हांदे रिध्दपूर यांनी करवून घेतला. सुमारे एक तास योगाचे विविध आसने यावेळी त्यांनी मार्गदर्शनासह शिकवले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. येथील महंत श्री गोपीराज बाबा, महंत श्री परसराज बाबा, भाजपा मंडल अध्यक्ष उमेश कोंडे, जि.प चे माजी सभापती तात्यासाहेब मेश्राम, शरदचंद्र बिडकर, विलास आघाडे, रविंद्र हिरूळकर, आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सुनील गवळी यांनी केले. यावेळी प्रामुख्याने ज्ञानेश्वर श्रीराव, संतोष सोनोने, विनायक ढेवले, मनोज वानखडे, अमोल यावलकर, सोपान ढोमणे, संजय पोहोकार, जयप्रकाश गजभिये, दिनेश वानखडे, बंशीधर पंजाबी, अमोल हिवराळे, गणेश पाटेकर, सुरेश पुनासे, रणजित सिनकर, गजानन ढगे, दाऊ पोहोकार, सौरभ पोहोकार व आशय मेश्राम यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## शासकीय आयटीआय मध्ये योगासनाचे धडे



श्री गोविंद प्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोर्शी जिल्हा अमरावती. येथे दिनांक २१ जून २०२५ रोजी संस्थेचे प्राचार्य कमल किशोर फुटाणे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना द्वारा जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.योग प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षक म्हणून तानसेन निकम उपस्थित होते.त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांना शिबिरामध्ये प्राणायाम, कपाल भारती, ध्यान साधना,ताडासन, श्वासासन, मकरासन इत्यादी आसनाचे प्रशिक्षण देऊन महत्व पटवून दिले. तर संस्थेचे प्राचार्य के. डी. फुटाणे यांनी मानवी जीवन जगताना योगासनाचे काय महत्त्व आहे व योगासन केल्यामुळे त्याचा मानवी जीवनात कसा उपयोग होतो याबद्दल अमूल्य मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांमध्ये संस्थेतील १८० प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे गटनिदेशक तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी एस. ए.अंभोरे यांनी केले. कार्यक्रमाकरिता संस्थेतील कर्मचारी श्रीकांत गावंडे,सुरेंद्र सावरकर,जयकुमार भालेराव, शंतनू खैरकर, प्रलोभ वांगे, रवींद्र गाडगे, सागर राऊत, सौरभ काटोलकर, गजानन भातुकुलकर, दिनेश पचारे, सागर तंतरपाळे, अमित बोडखे, राकेश वर्मा, वैभव मोथरकर, प्रांजली बिडकर, वैष्णवी फरतोडे, जेतल डेबे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## अंबाडा येथे ग्रामविकास विद्यालयात योग दिन साजरा



ग्रामविकास विद्यालय अंबाडा येथे अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. दिनांक २१ जून २०२५ ला अंबाडा येथील ग्रामविकास माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे प्राचार्य अविनाश साळकर यांचे नेतृत्वात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश लोकांना योगाच्या फायद्यांबद्दल जागरूक करणे आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात, अनेक लोक शारीरिक आणि मानसिक ताणतणावाशी झुंजत आहेत, अशा परिस्थितीत योग करणे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. यामुळे अनेक प्रकारचे आजार रोखता येतात, शरीर सक्रिय राहते आणि ताण कमी होतो असे प्राचार्य अविनाश साळकर यांनी सांगितले.यामध्ये विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर जे गेडाम यांनी योगाचे प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन केले. याकरिता विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी सुद्धा प्रत्यक्ष योगा व प्राणायाम केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचालन व आभार प्रदर्शन विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक श्रीकांत केंडे यांनी केले.

## करो योग रहो निरोग-योगगुरू नामदेवराव सातपुते




मोर्शी- अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून श्रीमती आर.सी.हायस्कूल लोणी येथील भव्य प्रांगणावर योग व प्राणायाम तसेच यावर्षीच्या नवीन ' एक पृथ्वी एक आरोग्य ' या घोषवाक्य नुसार योगगुरु नामदेवराव कृष्णाजी सातपुते,मोशी यांच्या मार्गदर्शनपर कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आलेले होते. याच पवित्र दिनाचे औचित्य साधुन 'सहजयोग सामुहिकता ' लोणी यांचे वतीने उपस्थित शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांना आत्मसाक्षात्कार देण्यात आला. याप्रसंगी सहजयोगी प्रदीप आगरकर यांनी आत्मसाक्षात्कार म्हणजे काय? व मानवी जीवनात सहज योगाचे महत्व या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी योगगुरु एन के सातपुते यांनी योग प्राणायमाचे सध्याच्या जीवनपद्धतीत महत्त्व काय? तसेच गुळवेल सारख्या महत्त्वपूर्ण औषधी वनस्पती व इतरही औषधी वनस्पतींचे फायदे व महत्त्व उपस्थितांना समजून सांगितले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक एस व्ही खोडे यांनी योगगुरु सातपुते यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच 'सहजयोग सामूहिकतेतील प्रतिनिधी सहजयोगी प्रदीप आगरकर यांचा सुद्धा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक एस व्ही खोडे यांनी सर्व सहजयोगी व गावातील प्रतिष्ठित नागरिक या सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी सहजयोगी गजानन बेलसरे, आशिष वानखडे, किशोर खोडे, दीपक पोहरकर, गौरव चिंचमलापुरे, अनिता बेलसरे, वंदना दोड, सौ रुपाली बहातकर तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे पर्यवेक्षक व्ही एच चिमोटे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. मानवाच्या कल्याण गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.






## शिवाजी शाळेत - एक पृथ्वी एक आरोग्य या संकल्पनेवर योग दिन

स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला.यावर्षीच्या 'एक पृथ्वी एक आरोग्य' या संकल्पनेवर आधारित योग दिनाच्या आयोजनातून वैयक्तिक तसेच पर्यावरणीय आरोग्य यामधील परस्- परसंबंध अधोरेखित करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन शाळेच्या एनसीसी विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. योग सत्राचे मार्गदर्शन शाळेचे अनुभवी योग प्रशिक्षक अतुल वैद्य यांनी केले. योग अभ्यासक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी योगाचा शारीरिक व मासिक आरोग्यावरील सकारात्मक परिणामांविषयी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी दररोजच्या जीवनशैलीत योगाचा समावेश करावा असे आवाहन केले.

याप्रसंगी शाळेची उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर,पर्यवेक्षक उद्धव गिद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक अजय हिवसे,विजय तारापुरे,एनसीसी अधिकारी पवन भागवत, ज्येष्ठ शिक्षक एस.आर.ठाकरे, राजेश मुंगसे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विशेष परिश्रम घेतले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कॅलिडोस्कोप

## साबणात ब्लेड?

मध्य प्रदेशमधील ग्वाल्हेर येथील एका कुटुंबाने एका नामांकित साबण निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या उत्पादनासंदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. या कुटुंबाने विकत घेतलेल्या दहा रुपयांच्या साबणामध्ये ब्लेड सापडले. अंघोळीदरम्यान या कुटुंबातील एका चिमुकल्याने हा साबण गालावर घासल्याने त्याच्या गालाला साबणामधील ब्लेडमुळे इजा झाली. हा प्रकार समोर आल्याननंतर जखमी मुलाच्या वडिलांनी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन क्रमांक १९१५ वर कॉल करून अधिकृतरित्या कंपनीसंदर्भात तक्रार नोंदवली आहे. जखमी झालेल्या मुलाचे नाव अंश असे आहे. आपल्या मित्रांसोबत खेळून घरी आल्यानंतर हातपाय आणि तोंड धुण्यासाठी बाथरुममध्ये गेलेल्या अंशने साबण चेहऱ्यावर घासण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला गालातून रक्त येत असल्याचे जाणवले. त्यानंतर नीट पाहिले असता साबणात काहीतरी असल्याचे त्याला दिसले. तोपर्यंत त्याचा गाल रक्ताने माखला होता.

एका बाजूने चेहरा रक्तबंबाळ झाल्याने घाबरलेल्या अंशने बाथरुममधूनच आरडाओरडा सुरू केला. मुलाचा आवाज ऐकून धावत बाथरुममध्ये आलेले अंशचे वडील अंगद सिंह तोमर यांना साबणात ब्लेड दिसल्यानंतर नेमके काय घडले याचा अंदाज आला. त्यांनी मुलाला धीर देत बाथरुमबाहेर काढत त्याच्या गालावर झालेल्या जखमेवर प्रथमोपचार केले. त्यांनी ग्राहक हेल्पलाइन क्रमांकावर घडलेल्या प्रकाराची माहिती देत अधिकृत तक्रार दाखल केली.

**मुलाच्या जीवाला होता धोका**

पॅकेजिंगदरम्यान ब्लेड साबणात अडकले अथवा स्थानिक दुकानामध्ये साबणाशी काही छेडछाड केल्याने हा प्रकार घडला याबद्दलची कोणतीही माहिती अद्याप उपलब्ध होऊ शकली नाही. बाहोदपूरमधील आनंद नगर येथे राहणाऱ्या सिंह कुटुंबाने स्थानिक किरणामालाच्या दुकानातून खरेदी केलेल्या साबणामध्ये अशाप्रकारे ब्लेड आढळून आल्याने अंगद सिंह यांनी स्वत: या दुकानात जाऊन तक्रार केली. त्या वेळी दुकानदारालाही सारा प्रकार ऐकून धक्का बसला. त्याने या ब्लेड असणाऱ्या साबणाच्या जागी दुसरा साबण दिला; मात्र घरी गेल्यानंतर अंगद यांनी हा साबण पाण्यात टाकून चाचपणी केली असता त्यामध्येही ब्लेड आढळून आले. अंगद यांनी १९१५ या राष्ट्रीय ग्राहक तक्रार हेल्पलाइन क्रमांकावर कॉल केला. या प्रकारामुळे माझ्या मुलाचा जीवही जाऊ शकला असता, असे अंगद यांनी तक्रारीत म्हटले आहे.

**न्यायालयात जाण्याचा इशारा**

ऑनलाइन माध्यमातून तक्रार करताना त्यांनी साबणाच्या फोटोसहीत इतर माहितीही दिली आहे. या प्रकरणात संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर आपण न्यायालयात हे प्रकरण घेऊन जाऊ, असा इशारा अंगद यांनी दिला आहे.

**कंपनीचे म्हणणे**

साबणात रेझर ब्लेड आढळल्याच्या कथित प्रकरणांबद्दल आम्हाला मीडिया रिपोर्ट्समधून माहिती मिळाली आहे, असे कंपनीने यासंदर्भात जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. या दाव्याची सत्यता पडताळण्यासाठी कंपनी चौकशी करत आहे. आजपर्यंत, आम्हाला कोणत्याही ग्राहकाकडून कोणतीही औपचारिक तक्रार किंवा अशाप्रकारच्या घटनेची सूचना मिळालेली नाही किंवा कोणत्याही व्यक्तीने आमच्याशी थेट संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला नाही. आमच्या सर्व साबणाच्या कव्हरवर आमचे ग्राहक सेवा संपर्क तपशील छापलेले असतानाही आमच्याकडे कोणीही अधिकृत तक्रार नोंदवलेली नाही. त्यामुळेच आम्ही सध्या आरोपाच्या सत्यतेवर भाष्य करू शकत नाही. सध्या तरी प्रथम दर्शनी हे बनावट उत्पादनांचे प्रकरण किंवा ब्रँडची प्रतिष्ठा खराब करण्याच्या उद्देशाने चालवलेल्या दुर्दैवी मोहीमेचा भाग असल्याचे दिसत आहे.




**साबण विक्रेत्याच्याही संपर्कात**

आम्ही तक्रारदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहोत. तथापि, आमच्याकडे त्यांचे संपर्क तपशील नाहीत. याव्यतिरिक्त, आम्ही ज्या घाऊक विक्रेत्याकडून साबण खरेदी केला होता, त्यांच्याशी संपर्क साधला आहे आणि चाचणीसाठी नमुने गोळा केले आहेत. आम्ही माध्यमांना विनंती करतो, की त्यांच्याकडे असलेली कोणतीही संबंधित माहिती देऊन आम्हाला मदत करावी, विशेषतः त्यांनी दावा करणाऱ्या व्यक्तीची मुलाखत घेतली असल्याने आम्हाला यामध्ये सहकार्य करावे, असे कंपनीने कंपनीने निवेदनात म्हटले आहे.

## आशियातील श्रीमंत गाव

भारतातल्या एका गावातील बहुतेक लोकसंख्या अनिवासी भारतीय आहे. हे गाव आशियातील सर्वात श्रीमंत गाव आहे. टुमदार घरे, डोंगर अन् विकसित असे हे गाव असून तिथे १७ बँका, शॉपिंग मॉल आणि थिएटरदेखील आहे. देशातील श्रीमंत गावांच्या यादीत हे गाव अव्वलस्थानी आहे. या ठिकाणचे लोक आजही



शेती करतात, पण या लोकांची बँकातील रक्कम ऐकून आवाक होण्याची वेळ येते. लोक परदेशातून पैसे कमवून गावातील बँकांमध्ये ट्रान्स्फर करतात. गुजरातमधील भूजमधील माधापूर या छोट्याशा गावाची ही एक वेगळी ओळख आहे. आशियातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून या गावाची ओळख निर्माण झाली आहे. फक्त ३२ हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील लोकांकडे सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मुदत ठेवी आहेत. हा एक विक्रम आहे. भारत सरकारनेही तो मान्य केला आहे.

**६५ टक्के लोक एनआरआय**

एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के एनआरआय लोकसंख्येमुळे माधापूर इतके समृद्ध आहे. हे एनआरआय प्रामुख्याने आफ्रिका, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आहेत. माधापूरमधील बँक खात्यात जमा झालेले पैसे वाया जात नाहीत. त्यामुळे गाव विकासाचे एक मॉडेल बनले आहे. या पैशाने चांगले रस्ते, तलाव, शाळा, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे आणि मंदिरे बांधण्यास मदत झाली आहे. या गावात एचडीएफसी, स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँक, ॲक्सिस, आयसीआयसीआय, युनियन बँक आणि प्रमुख खासगी बँका मिळून तब्बल १७ बँका आहेत.





## राजस्थानात विधवांचे गाव!

राजस्थानमधील एक गाव 'विधवांचे गाव' म्हणून ओळखले जाते. या गावाची गोष्ट फारच दुःखद आहे. राजस्थानमधील अनेक गावे सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत, पण याच राज्यात बुंदू हे ठिकाण रकीबपासून ८५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हदौती या भागात आहे. तिथे पुरुषांचा तारुण्यातच मृत्यू होतो. ४,५०० लोकसंख्या असलेले बुधपुरा हे बरार प्रदेशाचा भाग असल्याचे म्हटले जाते. त्या ठिकाणी अनेक खाणी आहेत आणि तिथले लोक या खाणींमध्ये काम करतात. याशिवाय तिथे बाहेरूनही लोक कामाच्या शोधात येतात आणि येथे स्थायिक होतात.

**खाणकामामुळे लोकांना टीबी**

सततच्या कामामुळे आणि दररोज उडणाऱ्या बारीक धुळीमुळे लोकांना टीबी होतो आणि तोही अशा प्रकारे, की ते थेट मृत्यूच्या दारात घेऊन जातो. गावात इतर कोणतेही काम नसल्याने तिथले पुरुष दगडाच्या खाणीत काम करतात आणि या दरम्यान दगडाची धूळ (सिलिका) हळूहळू त्यांच्या छातीत जमा होते आणि नंतर 'सिलिकोसिस'चे रूप धारण करते. 'सिलिकोसिस' किंवा टीबीमुळे त्यांची प्रकृती बिघडते. आजारी पडल्यावर गरिबीमुळे त्यांना योग्य उपचार मिळू शकत नाहीत आणि ते अगदी लहान वयातच मरण पावतात.

## केवळ स्टेशन वाचवण्यासाठी

उत्तर प्रदेशातल्या प्रयागराजमध्ये दयालपूर हे रेल्वे स्टेशन आहे. लोक इथे रोज येतात, तिकीट घेतात आणि घरी परत जातात. ट्रेनमध्ये चढतच नाहीत. या स्टेशनची कहाणी थोडी वेगळीच आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आग्रहावरून १९५४ मध्ये या स्टेशनचे बांधकाम झाले, तेव्हा आजूबाजूच्या गावांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी हे स्टेशन खूप महत्त्वाचे होते.

अनेक गाड्या इथे थांबत असत, पण हळूहळू प्रवाशांची संख्या कमी झाली आणि २००६ मध्ये रेल्वेने तोटा होत असल्याचे सांगत हे स्टेशन बंद केले. रेल्वेच्या नियमांनुसार एखाद्या स्टेशनवर नियमितपणे ५० पेक्षा कमी तिकिटे विकली जात असतील तर असे स्टेशन बंद केले जाते. दयालपूर स्टेशनलाही हाच नियम लागू झाला आणि ते बंद करण्यात



आले. पण स्टेशन बंद झाल्यावर लोकांना त्याची खरी गरज जाणवू लागली. त्यांनी प्रयत्न केले आणि अखेर २०२० मध्ये रेल्वेने हे स्टेशन पुन्हा सुरु करण्यात आले. पण ते पुन्हा बंद होऊ नये यासाठी काय करायचे, हा प्रश्न होता.

स्टेशन वाचवण्यासाठी गावकऱ्यांनी एक मार्ग काढला. प्रवास करायचा नसेल तरी रोज कोणी ना कोणी स्टेशनवर जाऊन तिकीट खरेदी करायचे असे त्यांनी ठरवले. फक्त स्टेशन सुरू राहावे हीच लोकांची इच्छा आहे. आजही तिथले लोक महिन्याला सुमारे ७०० रुपयांची तिकिटे विकत घेतात, पण ट्रेनने जात नाहीत. स्टेशनवर फक्त एकच ट्रेन थांबते. एक दिवस इथे अधिक ट्रेन थांबतील अशी गावकऱ्यांना आशा आहे. चक्क वर्गणी गोळा करून ते रोज तिकीट खरेदी करतात.


## चष्मा घालाल तर...




सध्या चष्मा लागण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. आजकाल लहानग्या मुलांनाही चष्मा लागतो. कॉंप्युटरवर काम करणाऱ्यांना चष्मा लावाला लागतो. विविध कार्यालयांमध्ये कॉम्प्युटरला डोळे लावून बसलेल्यांच्या नाकावर चष्मा असतो. याला महिलाही अपवाद नाहीत. काही वर्षांपूर्वीपर्यंत चष्मा लावणं हे मागासपणाचं लक्षण मानलं जायचं. पण काळानुरुप यात बदल झाला. आता चष्मा लावणं स्टाईल स्टेटमेंट बनून गेलं आहे. पण जपानमधल्या कंपन्यांना महिला कर्मचाऱ्यांनी चष्मा लावणं रुचलेलं नाही. म्हणूनच महिलांनी चष्मा लावून कार्यालयात येऊ नये, असं फर्मान त्यांनी काढलं आहे. चष्मा लावल्यामुळे महिलांच्या सौंदर्यावर परिणाम होत असल्याचं कारण देत चष्मा लावायला बंदी घालण्यात आली आहे. पुरुष कर्मचारी अगदी आरामात चष्मा घालू शकतात. एअरलाईन्सपासून रेस्टॉरंटपर्यंत खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिला चष्मा घालून काम करू शकत नाहीत. या कंपन्या इथवर थांबलेल्या नाहीत तर काही कंपन्यांनी महिलांना मेक अप करून यायची सक्ती केली आहे. तसंच वजन कमी करण्याच्या सूचनाही केल्या आहेत. आपल्या कार्यालयातल्या महिला कर्मचारी आकर्षक दिसाव्यात, असं इथल्या कंपन्यांना वाटतं. अर्थात इथल्या महिलांनी या प्रकाराला विरोध करायला सुरुवात केली आहे. सोशल मीडियावरही विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यामुळे कंपन्या आपला हा निर्णय मागे घेणार का, याबाबत कुतुहल निर्माण झालं आहे.



## मिठाईत भरलीए हवा



भारतात तऱ्हेतऱ्हेच्या मिठाया मिळतात. या चविष्ट मिठाया बघितल्यावर कोणाच्याही तोंडाला पाणी सुटल्याशिवाय रहाणार नाही. भारतात मिठाई खाण्याचं प्रमाण जास्त असलं तरी जगभरातच वैविध्यपूर्ण मिष्टान्न तयार केली जातात. काहींचा आकार वेगळा असतो तर काहींचा प्रकार भन्नाट असतो. अशीच एक मिठाई सध्या चर्चेचा विषय ठरते आहे. ब्रिटनमधल्या शेफने जगातली सर्वात हलकी मिठाई तयार केली आहे. विशेष बाब म्हणजे ही मिठाई बनवण्यासाठी शास्त्रज्ञांची मदत घेण्यात आली आहे. या मिठाईचं वजन अवघं एक ग्रॅम आहे. आश्चर्य वाटण्याजोगी बाब म्हणजे या मिठाईच्या ९६ टक्के भागात हवा आहे. म्हणजे या मिठाईत फक्त चार टक्के घन पदार्थ आहेत. ही मिठाई बनवण्यासाठी एअरोजेलचा वापर करण्यात आला आहे. एअरोजेल हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ आहे. १९३१ मध्ये याचा शोध लावण्यात आला होता. एअरोजेलमध्ये ९५ ते ९९.८ टक्क्यांपर्यंत हवा असते. म्हणूनच हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ ठरतो. एअरोजेल विविध पदार्थांपासून तयार करता येतं. मात्र ही मिठाई बनवण्यासाठी अंड्याच्या पांढऱ्या भागापासून हायड्रोजेल निर्मिती करण्यात आली. यानंतर हायड्रोजेल कॅल्शियम क्लोराइड आणि पाण्यात बुडवून ठेवण्यात आली. काही काळानंतर ती एका साच्यात घालण्यात आली. ही मिठाई तयार करण्यासाठी बरीच मोठी प्रक्रिया करावी लागली. अखेर सगळ्यांच्या मेहनतीला यश आलं आणि जगातली सर्वात हलकी मिठाई तयार झाली.

## मुलाचा मृत्यू, पित्याचा स्पृहणीय उपक्रम



मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातून एक हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. दुचाकी चालवताना हेल्मेट न घालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हादरवून सोडणारी घटना खंडवा जिल्ह्यातील पंधना विधानसभेतील गुराडिया गावात घडली. येथे एका वडिलांनी आपल्या मुलाला गमावले, पण त्यांनी उचललेल्या पावलाने संपूर्ण परिसराला विचार करायला भाग पाडले.

काही दिवसांपूर्वी गावातील आनंद सिंह सावनेर या युवकाचे रस्ते अपघातात अकाली निधन झाले. दुचाकी चालवत असताना हा अपघात झाला. दुर्दैवाने त्याने हेल्मेट घातलेले नव्हते. ही बातमी गावात पसरताच वातावरण उदास झाले. संपूर्ण गावावर शोककळा पसरली. मुलाच्या अंत्यसंस्काराच्या काही दिवसांनी वडील मुकेश सावनेर यांनी घेतलेला निर्णय या दुःखद घटनेला जनजागृती मोहिमेत रूपांतरित करणारे उदाहरण ठरला.

**पूजा, अर्चा, विधीला फाटा**

सामान्यतः पारंपारिक पूजा-पाठ आणि श्रद्धांजली सभा दहाव्या दिवशी आयोजित केल्या जातात, पण याला बगल देत मुकेश सावनेर यांनी सामाजिक संदेश देण्याचे हे एक माध्यम बनवले. त्यांनी त्यांच्या मुलाच्या स्मरणार्थ गावकऱ्यांना आणि जवळच्या तरुणांना हेल्मेट वाटप करण्याचा निर्णय घेतला. आनंदने त्या दिवशी हेल्मेट घातले असते तर तो आज जिवंत असता, असा विचार करून आपण हे पाऊल उचलल्याचे ते सांगतात. इतर कोणालाही आपला मुलगा अशा प्रकारे गमवावा लागू नये. हे दुःख कधीच संपणार नाही, पण माझ्या मुलाच्या मृत्युमुळे दुसऱ्याचे प्राण वाचू शकतील, तर कदाचित त्याचा मृत्यू व्यर्थ जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

**हेल्मेट वाटप चर्चेचा विषय**

गावात आयोजित या अनोख्या श्रद्धांजली सभेत तरुणांची गर्दी जमली होती. सर्वांचे डोळे पाणावले होते. त्याच वेळी मुकेश सावनेर यांनी सर्वांना हेल्मेटचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी डझनभर तरुणांना हेल्मेट घालायला लावले आणि त्यांच्याकडून ते नेहमी घालणार असल्याचे वचन घेतले. यापुढे वाहन चालवताना नक्कीच हेल्मेट घालू, असे तरुणांनी या वेळी सांगितले. ही छोटीशी घटना तरुणांसाठी एक मोठा धडा बनली. एखाद्याच्या मृत्यूवर इतका अर्थपूर्ण सामाजिक संदेश पहिल्यांदाच पाहायला मिळाल्याचे स्थानिक सांगतात.

**वडिलांनी उचललेल्या पावलाचे कौतुक**

ही घटना फक्त गाव किंवा जिल्ह्यापुरती मर्यादित नव्हती, तर ही बातमी 'सोशल मीडिया'वरून व्हायरल झाली. लोक मुकेश सावनेर यांच्या या पावलाचे कौतुक करू लागले. अनेक सामाजिक संघटना आणि स्थानिक प्रशासनानेही त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. असे जागरूक नागरिकच समाजात बदल घडवू शकतात, असे मत व्यक्त केले जात आहे.

## खेकड्यासाठी मोजले ३२ लाख रुपये

मध्यंतरी एका खेकड्याचा लिलाव पार पडला. या खेकड्यावर कोट्यवधींची बोली लागली. अखेरीस हा खेकडा भारतीय चलनात ३२ लाख ६६ हजार रुपयांचा विकला गेला. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला. जपानच्या पश्चिमेकडे असणाऱ्या टोट्टरी परिसरात या खेकड्याचा लिलाव पार पडला. हा क्रस्टेशियन खेकडा आहे. तो फक्त बर्फात सापडतो. म्हणूनच तो खरेदी करण्यासाठी बरीच चढाओढ पहायला मिळते. थंडीच्या काळात जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर मासे खाल्ले जातात. या काळात माशांचा लिलाव केला जातो. जपानी लोक या लिलावात मासे खरेदी करतात. या लिलावादरम्यान ट्यूना हा मासा मुख्य आकर्षण ठरतो. जगातल्या या सर्वात महागड्या खेकड्याचं वजन १.२ किलो असून लांबी १४.६ सेंटीमीटर आहे. गेल्या वर्षीही एक खेकडा भारतीय चलनात तेरा लाख रुपयांना विकला गेला होता. हा एक विक्रमच होता. या विक्रमाची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली होती. मात्र आता ३२ लाख ६६ हजार रुपयांना विकल्या गेल्या खेकड्याने सर्व विक्रम मागे टाकले आहेत. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला आहे.



# खेळाडूंना सर्वतोपरी मदत करण्यास महाराष्ट्र शासन कटीबद्ध

## मुख्यमंत्री फडवणीस यांचे प्रतिपादन : मुख्यमंत्री चषक राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे थाटात उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
भारतात कुस्तीची प्राचीन परंपरा राहिली आहे. सध्या कुस्तीचे स्वरूप बदलले आहे. कुस्ती खेळाला अधिक व्यावसायिक आणि ग्लॅमरस बनवण्यासाठी संस्था, फाउंडेशन आणि कॉर्पोरेट क्षेत्राला जोडून घेण्याचा प्रयत्न करू, तसेच खेळाडूंना उत्कृष्ट प्रशिक्षण देण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आणण्याबरोबरच, आवश्यक पायाभूत सुविधा अद्यावत करण्यासोबतच खेळाडूंना सर्वतोपरी मदत करण्यास महाराष्ट्र शासन कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर महानगरपालिका व शहर कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात आयोजित १५ वर्षांखालील मुले व मुलींच्या मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धा २०२५ या स्पर्धेचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमात राज्याचे अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, आमदार कृपाल तुमाने, शहर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी, भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष संजयकुमार सिंग, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, भारतीय कुस्ती संघ कोषाध्यक्ष एस. पी. देसवाल, महाराष्ट्र कुस्तीगर संघ कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, विदर्भ कुस्तीगीर संघ कार्याध्यक्ष संजय तिरथकर, हिंदकेसरी योगेशजी दोडके, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, उपायुक्त विनोद जाधव, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर, आयोजन समितीचे उपाध्यक्ष दयाराम भोतमांगे प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'प्रथम हनुमानाच्या मूर्तीला आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला माल्यार्पण केले. नंतर आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत पदक विजेता रोहीणी राणू देवबा यांच्या हस्ते मशाल पेटवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.





यावेळी फडणवीस म्हणाले की कुस्ती स्पर्धेकडे सरकारतर्फे लक्ष दिले जाईल.मुख्यमंत्र्यांनी खेळाचे आणि त्यात सहभागी होण्याचे महत्त्व पटवून दिले. छोट्या-छोट्या भागांमध्येही कुस्ती खेळली जाते, हा भारताचा वजूद आहे.

ज्या मुलांनी यात सहभाग घेतला आहे, त्यांच्यात खेळात सहभाग घेऊन संघर्ष करण्याची भावना उत्पन्न होते. खेळाडू हरण्याला घाबरत नाहीत, तर त्यातून पुन्हा संघर्ष करायला शिकतात, असे ते म्हणाले. या विचाराने खेळाडू आणि समाजालाही सकारात्मक संदेश मिळतो.



**अमित योगा ग्रुपतर्फे चित्तथरारक प्रात्यक्षिक**

मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धा मध्ये अमित योगा ग्रुपने योगाचे विविध मानवीय मनोरे व कठीण योगासनाचे चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रास्ताविक करताना आमदार संदीप जोशी यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्याच्या प्रयत्नात आम्ही असल्याचे सांगत मनपाच्या जागेवर एक लहान स्टेडियम तयार करण्याची मान्यता द्यावी अशी विनंती केली. रामदास तडस यांनी खेळाडूंचे मनोबल वाढविले. आशिष जयस्वाल यांनीही मार्गदर्शन केले. संचालन आर जे आमोद यांनी केले.

# कैद्याचा कारागृहात आकस्मिक मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २२ :**
तीन वर्षांपूर्वी एका तरुणाचा खून केल्या प्रकरणी आणि हत्येला प्रवृत्त करण्याच्या अत्यंत गंभीर गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या कैद्याचा अचानक बेशुद्ध पडून मृत्यू झाला. जिल्हा कारागृहाच्या आवारात ही घटना घडली.



मृत कैद्यांचे नाव गंगाधर निखारे (४२) असे आहे, तो पद्मा वॉर्ड, पवनी येथील रहिवासी आहे. हृदयविकाराच्या झटक्याने गंगाधरचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे.

तहसीलदार भंडारा यांच्या उपस्थितीत पंचनामा झाल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी नागपूरला पाठवण्यात आला. २० जूनला दुपारी ३.३५ वाजता तुरुंगाच्या बॅरेकसमोरील व्हरांड्यात चालत असताना तो बेशुद्ध पडला. जिल्हा कारागृह रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर त्याला तातडीने भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

घटनेच्या वेळी कर्तव्यावर असलेले तुरुंग कर्मचारी आनंद खर्चे यांच्या तक्रारीवरून भंडारा पोलिसांनी अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक पूनम कुंभारे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

तीन वर्षांपासून कारागृहात
सुमारे ३ वर्षांपूर्वी घडलेल्या एका खून प्रकरणात ३०२ (खून) आणि १०९ (खून करण्यास प्रवृत्त करणे) अंतर्गत गंगाधरला १० सप्टेंबर २०२२ रोजी न्यायालयाच्या आदेशाने भंडारा जिल्हा कारागृहात दाखल करण्यात आले होते. तेव्हापासून तो शिक्षा भोगत आहे. वाचनालयात स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या तरुणाचा देशी कट्ट्यातून गोळी झाडून गंगाधरने खून केला होता.

# मुख्यमंत्री शहरात असतानाच सापडले २४० ग्राम एमडी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
संत्रानगरी म्हणून ओळखले जाणारे नागपूर हे राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही शहर आहे. मात्र तेच शहरात तळ ठोकून असताना अंमली पदार्थांची वाहतूक होत असल्याने दिसून येते.

ड्रग्ज तस्करांच्या विरोधात पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी दोनच दिवसांपूर्वी मोठा गाजावाजा करीत ऑपरेशन थंडर हाती घेतले. या अंतर्गत पोलिस दल रेकॉर्ड वरील गुन्हेगारांचे समुपदेशनही करीत आहे. मात्र असे असतानाही मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची होणारी तस्करी देखील चर्चेचा विषय बनत चालली आहे.

शहर पोलिसांनी एकट्या इमामवाडातून २४० ग्राम मेफेड्रोन (एमडी) पावडर जप्त करीत चौघांना अटक केली. निलेश लक्ष्मण देशमुख, प्रणय उर्फ सुमित गोपाल गायधने, आशिष प्रकाश मडावी, शुभम उर्फ भुऱ्या राजेश तिडके अशी अटक चार तस्करांची नावे आहेत.

त्यांच्या कारची झडती घेतली असता पोलिसांना २४० ग्राम एमडी पावडर सापडले. विशेष म्हणजे हे सगळे तरुण वयोगटातील आहेत. यावरून तरुणाई किती मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांच्या विळख्यात गुरफटत चालल्याचे दिसते.

ऑपरेशन थंडर अंतर्गत नागपूर पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या महिनाभराच्या कालावधीत ३३६ तस्करांच्या मुसक्या आवळल्या. यातून पोलिसांनी आतापर्यंत एक किलो मेफेड्रोन (एमडी) आणि तब्बल २ किलो अफिम जप्त केले.

अंमली पदार्थ विरोधी पथकाने महिनाभरात १ कोटी ४० लाख १७ हजारांचे अंमली पदार्थ पकडले आहे. या तस्करीत पहिल्यांदा गुन्हा केलेल्या अल्पवयीन आणि तरुणांची संख्या अधिक असल्याची चिंता खुद्द पोलिस आयुक्त सिंगल यांनी व्यक्त केली होती.

महिनाभराच्या कालावधीत पोलिसांनी अटक केलेल्या एकूण ३३६ तस्करांपैकी जवळजवळ ७० टक्के म्हणजे २२६ जण हे अंमली पदाथार्चे सेवन करणारे तरुण आहेत. यातही मोठ्या संख्येने अल्पवयीन मुले आहेत. ही आकडेवारी तरुणाई किती गंभीरपणे व्यसनाधिनतेच्या विळख्या गुरफटत आहे, हे सांगणारी आहे.

# ठाकरेंच्या दोन माजी नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी नगरसेवक ईश्वर तायडे आणि माजी नगरसेविका आकांक्षा शेठ्ये यांनी आपल्या १०० हून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात भाजप जाहीर प्रवेश केला. मुंबई भाजपचे अध्यक्ष आणि राज्याचे मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी आमदार प्रविण दरेकर आणि मुंबई भाजपचे उपाध्यक्ष कमलाकर दळवी देखील उपस्थित होते.

यावेळी मंत्री शेलार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाने प्रेरित होऊन तसेच भारतीय जनता पक्षाच्या ध्येयधोरणांशी एकरूप होऊन काम करण्याची इच्छा व्यक्त करत शिवसेना उबाठा गटाचे माजी नगरसेवक ईश्वर तायडे आणि माजी नगरसेविका आकांक्षा शेठ्ये यांनी आपल्या १०० हून अधिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. याचा अर्थ त्यांनी उबाठाचे नेतृत्व नाकारले आहे. हा या नाटकाचा पहिला अंक आहे. लवकरच दुसरा आणि तिसरा व शेवटचा अंक तुम्हाला पाहायला मिळेल.

उबाठाची अवस्था धोकादायक आणि जीर्ण झाली



आहे. त्यांनी मुंबई, मुंबईकर, हिंदुत्व, हिंदु सण उत्सव यांच्या विरोधात भूमिका घेतली त्यामुळे ते धोकादायक स्थितीत आहेत, तर त्यांना सोडून ज्या पद्धतीने पक्षाचे पदाधिकारी, आमदार, खासदार जात आहेत, त्यावर तो पक्ष जीर्ण अवस्थेत आहे, असे आशिष शेलार म्हणाले.

२०१७ च्या निवडणुकीत त्यावेळच्या शिवसेनेपेक्षा भाजपला फक्त दोन जागा कमी होत्या. आता भाजपमध्ये चार माजी नगरसेवकांनी प्रवेश केल्यानंतर भाजप नंबर १ चा पक्ष झालाच. शिवाय मूळ शिवसेनेतील ५० हून अधिक नगरसेवक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेले. त्यामुळे उबाठा सेना हा पक्ष अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे, अशी टीका शेलार यांनी केली.

## आत्मनिर्भर भारतासाठी आरआरपी इनोव्हेशन आणि ऑप्टिक्स बुल्गारियासोबत भागीदारी



भारताच्या आत्मनिर्भरता आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या दृष्टिकोनाला अधोरेखित करणाऱ्या एका ऐतिहासिक पावलांनी वेगाने वाढणाऱ्या भारतीय इलेक्ट्रो-ऑप्टिक्स कंपनीने, प्रगत इलेक्ट्रो-ऑप्टिक्स सोल्यूशन्समधील जागतिक प्रणेते असलेल्या ऑप्टिक्स बुल्गारियासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.

२० जून रोजी औपचारिकरित्या संपन्न झालेला हा सामंजस्य करार, आरआरपी एस४ई इनोव्हेशन लि.साठी एक ऐतिहासिक क्षण आहे, जो अत्याधुनिक संरक्षण उत्पादनांच्या नवीन पिढीसाठी तंत्रज्ञान हस्तांतरण (टीओटी) साठी मार्ग मोकळा करतो, ज्यामध्ये अल्ट्रा लाइटवेट थर्मल साइट्स विस्तारित लांब पल्ल्याची देखरेख पद्धती समाविष्ट आहे. हँडहेल्ड थर्मल इमेजर्स (एचएचटीआय) ऑप्टिक्स बुल्गारियाने खोलवर कौशल्य आणले आहे. इन-हाऊस संशोधन आणि विकासाद्वारे त्यांच्या सर्व उत्पादन ऑफरमध्ये त्यांनी प्रभुत्व मिळवले असून त्यांच्या नवकल्पनांची युद्ध-चाचणी केली जाते. तसेच जागतिक स्तरावर त्यांचा आदर केला जातो.

या सहकार्याने कंपन्यांचे उद्दिष्ट अशा प्रगत थर्मल तंत्रज्ञानाचा वापर करणे आहे, जे या क्षेत्रात कधीही वापरले गेले नाही. स्पर्धात्मक किमतीत उच्च कार्यक्षमता प्रदान करतात.

३०० हून अधिक थर्मल साइट्स आधीच धोरणात्मक ठिकाणी तैनात आहेत. ऑप्टिक्सचे प्रमुख उत्पादन 'डायना' हे इलेक्ट्रो-ऑप्टिक्समध्ये गेम-चेंजर म्हणून ओळखले जाते. हे नवोपक्रम आता भारतीय गरजांनुसार अनुकूलित केले जातील, जे वास्तविक युद्धक्षेत्रातील आव्हानांना व्यावहारिक, आघाडीचे उपाय प्रदान करतील.

■ ■ ■

**लोकार्थ**

## शासकीय जमिनीचे बनावट कागदपत्रे

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :**
शासकीय जमीन बळकावण्यासाठी भूमी अभिलेख विभागाचे बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी माजी नगरसेवक कमलेश चौधरी यांच्याविरुद्ध सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कमलेश चौधरी यांनी फुटाळा तलाव व त्याच्या पाणलोट क्षेत्रावर बेकायदेशीर अतिक्रमण केले आहे.

आता त्यांनी सिटी सर्व्हे कार्यालय क्रमांक ३, भूमी अभिलेख विभागाचा बनावट दस्तऐवज तयार करून मौजा तेलंगखेडी येथील ४३.८७ लाख चौरस फुट शासकीय जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी सदर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सिटी सर्व्हे कार्यालय क्रमांक ३ यांच्या तक्रारीवरून करण्यात आली आहे. २० जून २०२५ रोजी सदर पोलीस ठाण्यात कमलेश चौधरी विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. यापूर्वी अन्याय निवारण मंचच्या अध्यक्षा ज्वाला जांबुवंतराव धोटे यांनी कमलेश, त्याची आई मीना आणि भाऊ मुकेश यांनी सादर केलेल्या बनावट दस्तऐवजांविरोधात सिटी सर्व्हे कार्यालयात २९ मे २०२५ रोजी लेखी तक्रार केली होती.

## २४ जून २०२५ रोजी खुला होणार एलेनबेरी इंडस्ट्रीयल गॅसेसचा आयपिओ



एलेनबेरी इंडस्ट्रियल गॅसेस लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी रु. २ दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ३८० ते रु. ४०० असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.

कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, २४ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २६ जून २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ३७ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३७ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ ४०० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यू आणि पद्म कुमार अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या इक्विटी शेअर्स आणि वरुण अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या विक्रीसाठी ऑफरचा समावेश आहे.

नवीन इश्यूमधून मिळणारे २१० कोटी रुपयांचे उत्पन्न कंपनीने घेतलेल्या काही थकित कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्वपेमेंटसाठी वापरले जाईल; २२० टीपीडी क्षमतेच्या उलुबेरिया-II प्लांटमध्ये एअर सेपरेशन युनिटची स्थापना करण्यासाठी १०४.५० कोटी रुपये; आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरले जाईल.

■ ■ ■

## टाइमझोनचा सर्वात मोठा फ्लॅगशिप व्हेन्यू इन ऑर्बिट मॉलमध्ये

टाइमझोन या ऑस्ट्रेलियातील फॅमिली आणि सोशल एंटरटेनमेंट क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँडने भारतात आपल्या सर्वात मोठ्या, सर्वात आकर्षक आणि अनुभव-आधारित फ्लॅगशिप व्हेन्यू इनऑर्बिट मॉल, मालाड येथे सुरू केला आहे.

2 दशकांपूर्वी या ब्रँडने याच ठिकाणी पहिला व्हेन्यू सुरु करत भारतात पदार्पण केले होते. पहिल्या व दुसऱ्या मजल्यांवर 24,626 चौरस फूट क्षेत्रफळात असलेले हे नवीन ठिकाण खेळ, खाद्यजत्रा आणि अविस्मरणीय समारंभांसाठी मुंबईतील एक हब म्हणून तयार झाले आहे. टाइमझोनचा फ्लॅगशिप व्हेन्यू अनुभवात्मक मनोरंजनात एक नवा मानक स्थापित करण्यासाठी डिझाइन केलेला आहे. सर्व वयोगटातील अभ्यागत एका उत्साही आणि जोशपूर्ण वातावरणात प्रवेश करतील, जिथे त्यांना मजा करता येईल आणि एकत्रितपणे आनंदी क्षण घालवता येतील.

टाइमझोन कॅफे हा भारतातील पहिलाच इन-व्हेन्यू कन्सेप्ट म्हणून सुरू झाला आहे. या ठिकाणी जीभेची व पोटाची भूक आणि तहान भागवणारा मेन्यू सादर करण्यात येतो. या ठिकाणी सर्व वयोगटांचा विचार करून फ्यूजन-प्रेरित 26 पदार्थ उपलब्ध करून देण्यात येतात. त्याचप्रमाणे कॅफेच्या समकालीन प्लेटिंग स्टाइलमुळे कुटुंबीय आणि मित्रांसमवेत गप्पांचा फड रंगतो.

जॅपनीज मोइतो मॅजिक व काश्मिरी रोझ पल्पी लिची कूलर यासारख्या खास हाताने तयार केलेल्या मॉकटेल्सपासून ते थिक शेक, किड-फ्रेंडली क्रिस्पी कॅरेमल आणि स्थानिक चव असलेली शिकंजी या ठिकाणी उपलब्ध आहे. कॉफीच्या चाहत्यांसाठी ताजी ब्रू केलेली कॉफी टर्किश कॉफी व ब्लॅक फॉरेस्ट पर्यायांसह एका खास ढंगात सादर केली जाते

■ ■ ■




## सायबर सुरक्षा क्षेत्रात भारताचे निर्णायक पाऊल

भारतातील सायबर सुरक्षेच्या वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर सायबर इंडिया एक्स्पो 2025 चे यशस्वी आयोजन बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई येथे करण्यात आले.

मिडिया फुसन द्वारे आयोजित या दोन दिवसीय कार्यक्रमात धोरणनिमार्ते, तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, स्टार्टअप्स आणि उद्योजक एकत्र आले.भारत सध्या जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सायबर हल्ल्यांचा बळी ठरत असून, यावेळी १०० हून अधिक आंतरराष्ट्रीय आणि भारतीय कंपन्यांनी भाग घेतला.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# कार बुक करीत बकऱ्या चोरी

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :**
वाहतूक कोंडी, ड्रायव्हिंगची कटकट आणि पार्किंगची डोकेदुखी टाळण्यासाठी नागपूरकर ओला-उबेर कार बुकिंगला फ्रेंडली झाले आहेत. ज्यांना दूरवरचे अंतर गाठायचे आहे, ते झूम कार बूक करीत सोयीचा मार्ग निवडतात. आजवर हे एकीवात होते. मात्र कारची बुकींग करून बकऱ्या चोरून नेण्याचा अफलातून प्रकार समोर आला आहे.

बकऱ्यांची चोरी करण्यासाठी एका टोळीन चक्क झूम कारची बुकिंग करीत ग्रामीण भागातून २२ बकऱ्या चोरल्याचे पाहून पोलिसही भांबावून गेले.

जावेद खान अश्फाक खान (वय ३२, वाईट चर्च, पलोटी नगर गोरेवाडा), अभिषेक योगेश तागडे (वय २२, सुरेंद्रगड, सेमिनरी हिल्स), उस्मान खान अकबर खान उर्फ इरफान (वय २१, बरकते रजा मस्जिद, कामगार नगर), अक्षय मनोज पंचलवार ( वय २६, इंगोले लेआऊट गोधनी), बाबू उर्फ मायकल गुड्डू (वय १८, रा. ढोरे लेआऊ, मानकापूर), तुषार अनिल शर्मा,( रा. मानकापूर), भुऱ्या उर्फ प्रकाश माहुरे ( ४०, रा. चंद्रकला नगर, तांडापेठ) अशी या अफलातून शक्कल लढविणाऱ्या बकऱ्या चोरांच्या टोळीतल्या सदस्यांची नावे आहेत. चोरट्यांनी यातील काही बकऱ्या भुऱ्या उर्फ प्रकाश माहुरे याला विकल्या आहेत.

जलालखेडा पोलिसांनी या आठही जणांवर गुन्हे दाखल करीत त्यांना अटक केली असून त्यांनी चोरीत वापरलेली महिंद्रा बोलेरो (एम. एच. २१, सी. २१३२) , मारुती सुझुकी एक्सप्रेसो (एम. एच. ४९, बी. डब्ल्यू ७२६४) ह ६ भ्रमणदूरध्वनी, रोख ८० हजार असा ९ लाख ३३ हजारांचा माल हस्तगत केला. याप्रकरणी तपास सुरू आहे.

## वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

■ **महासागर प्रतिनिधी वणी / यवतमाळ, दि. २२ :**
अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना वणी मुकुटबन मार्गावरील साईलिला नगरी जवळील राज डिलक्स बियरबार जवळ घडली. अमर रतन करसे (वय ४५) वर्ष रा. सेवानगर असे या अपघातात ठार झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे.

अमर करसे हे झरीजामणी ग्रामीण रुग्णालयात कर्मचारी म्हणून कार्यरत असल्याचे समजते. रुग्णालयातील रात्रपाळीतील कर्तव्य आटपून ते सेवानगर येथे आपल्या घरी परतत असताना वणी मुकुटबन मार्गावरील साईलिला नगरी जवळील राज डिलक्स बियरबार जवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# उपराजधानीत पुन्हा एका उड्डाणपुलाची भर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
नितीन गडकरी यांनी केंद्रात रस्ते व परिवहन खात्याचा कारभार सांभाळल्यापासून देशभरात रस्ते बांधणीला वेग आला आहे. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यत रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, बोगदे उभारण्यात येत आहेत. नागपुरातही मोठ्या संख्येने उड्डाणपूल बांधण्यात येत आहेत.

अमरावती महामार्गावरील ब्लॅक स्पॉट संपवणे आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मे २०२१ मध्ये दोन उड्डाणपूल बांधण्याचे काम हाती घेतले होते. त्यातील वाडी पोलिस स्टेशन ते गुरुद्वारा (१.९५ किमी) उड्डाणपूल सुरू झाला आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) ते नागपूर विद्यापीठ कॅम्पसपर्यंतचे (२.८५ किमी) काम अंतिम टप्प्यात आले आहे. १५ ऑगस्टपूर्वी हा उड्डाणपूल सुरू होणार आहे.

प्रारंभी ३१ ऑगस्ट २०२४ मुदत होती. ती वाढवून आता १ जुलै २०२५ झाली असताना



अद्यापही काम न झाल्याने आता नवीन मुहूर्त पुढे आला आहे. गडकरी यांच्या पुढाकाराने प्रादेशिक परिवहन कार्यालयापासून तर वाडी पोलिस ठाण्यापर्यंतच्या ५ कि.मी. अंतरावर दोन उड्डाणपूल बांधण्यास प्रारंभ झाला.

अमरावती महामार्गावरील वाडी नाका ते वाडी पोलिस ठाण्यापर्यंतच्या सुमारे अडीच किमीचा उड्डाणपूल सुरू झाला. अमरावती महामार्गावरील उड्डाणपूल प्रकल्पात, फुटाळा तलाव चौक, विद्यापीठ कॅम्पस ते आरटीओ पर्यंतच्या पुलाचे काम रेंगाळले आहे. आरटीओ कार्यालयासमोरील जुन्या नाल्यावर पूल बांधण्याचे काम केले जात आहे. याशिवाय आरटीओ ते बोले पेट्रोल पंपपर्यंत कॉंक्रिट रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पहिल्या टप्प्यात प्रादेशिक परिवहन कार्यालय ते विद्यापीठ कॅम्पसपर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम हाती घेण्यात आले होते. मात्र अनेक अडचणीमुळे हा मार्ग तयार करण्यासाठी विलंब झाला आहे. सध्या नाल्याचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी जुलै २०२५ पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे.

एकूण ४७८ कोटींच्या दोन उड्डाणपुलाला अतिरिक्त कालावधी लागल्याने प्रकल्पाचा खर्च वाढला आहे. आरटीओ कार्यालय ते रवीनगर चौकापर्यंतची झाडे तोडण्याची परवानगी उशिरा मिळाल्याने बांधकामाला उशीर झाला होता.

# देवाभाऊ पुढचे १०० वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा : नितेश राणे



**मुंबई :** आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यामुळे, देवाभाऊ पुढचे 100 वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा, असा सल्ला भाजप नेते व मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी कोळी बांधवांना दिला आहे. वेसावा खाडीजवळ स्थानिक मच्छीमारांची भेट घेऊन राणेंनी चर्चा केली. यावेळी त्यांनी हे विधान केले आहे. नितेश राणे म्हणाले, मी राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून आलेलो आहे. आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यामुळे, देवाभाऊ पुढचे 100 वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा, असा सल्ला त्यांनी कोळी बांधवांना दिला. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वतुर्ळात पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. पुढे बोलताना नितेश राणे म्हणाले, मत्स्य व्यवसायाला कृषी चा दर्जा मिळावा ही मागणी वषार्नुवर्ष आहे. राज्यात महायुतीचे सरकार आले आणि पहिल्या 100 दिवसात मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. आपण आधी सरकार म्हणून मदत मागायला जायचो तेव्हा अधिकारी हात आकडते घ्यायचे, तुटपुंजी मदत द्यायचे. पण, डहाणूमध्ये 1 कोटी 89 लाख रुपयांचे नुकसान झाले. त्यावेळी मी मदत पुनर्वसन मंत्र्यांकडे गेलो आणि नुकसान जास्तीत जास्त भरून देण्याचे ठरविले. जर आधीच्या अनुषंगाने मदत केली तर मच्छिमारांचा अपमान आहे. मी मुख्यमंत्र्यांना सांगितले त्यांनी आदेश दिले आणि आता 100 टक्के नुकसान भरपाई देण्याचे ठरविले. मी गुजरातवरुन थेट तुमचे आशीर्वाद घ्यायला आलो आहे. आता कोणीतीही चिंता करू नका जास्तीत जास्त नुकसान भरपाई देऊ. आम्ही ड्रोनने पाहणी करत आहोत, जेणेकरून एलईडी वाल्यांच्या ढुंगणाला आग लागेल. जर कोणताही अधिकारी कोणाकडूनही वजन घेत असेल तर त्याला असा जिल्हा देईल की पुन्हा मासे दिसणार नाहीत.

# अपर परिवहन आयुक्तांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करा

## रोहित पवारांनी पाठवले फडणवीसांना पत्र



**मुंबई :** अपर परिवहन आयुक्तांवरील भ्रष्टाचाराचे पुरावे देऊन गेल्या अधिवेशनात आवाज उठवूनही चौकशी का होत नाही, असे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे. पुरावे म्हणून कागदपत्रे पाठवत असून प्रभारी अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर यांच्यावरील आरोपाची सखोल चौकशीची मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. शासकीय अधिकाऱ्यास पदोन्नती देताना त्यांची सचोटी निःसंशय चांगली असणे आवश्यक आहे. मात्र, कळसकर यांची सचोटी संशयास्पद असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. रडार कॅमेरा घोटाळा, एचएसआरपी नंबर प्लेट घोटाळा, जीपीआरएस किट घोटाळ्यांसह अनेक आरोप त्यांच्यावर आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाचा दाखला देत अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात फौजदारी आरोपाचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असताना पदोन्नती देण्यात प्रतिबंध आहे. अशा वेळी अधिकाऱ्यांची विभागीय पदोन्नती समितीने केलेले मूल्यमापन आणि दिलेली प्रतवारी सीलबंद पाकिटात ठेवण्याची तरतूद आहे. त्यामुळे न्यायालयात प्रलंबित प्रकरण फौजदारी असल्याने कळसकर पदोन्नतीस पात्र ठरत नसल्याचा आरोप पवार यांनी या पत्रातून केला.

# क्षमतेप्रमाणे संधी दिली जात नाही : भास्कर जाधव



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा आमदार भास्कर जाधव यांनी अलीकडेच राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले असून, त्याचबरोबर त्यांना पक्षात डावलले जात असल्याची भावना व्यक्त केली आहे. क्षमतेप्रमाणे संधी दिली जात नाही, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली. तसेच शरद पवार यांची साथ सोडणे हे कधीकधी चुकीचे वाटते, असेही वक्तव्य त्यांनी केले होते. तसेच संजय राऊत यांनी देखील भास्कर जाधव यांनी खंत व्यक्त केली असून पक्षप्रमुख दखल घेतील असे म्हटले आहे. भास्कर जाधव म्हणाले, शरद पवार यांची साथ सोडली, त्यामुळे मला काहीतरी चुकल्यासारखे वाटते, असे अजिबात नाही. तसे स्पष्टीकरण मी दिलेले आहे. मी शरद पवार यांना सोडल्याचा निर्णय चुकीचा होता, हे मी स्पष्टपणे बोललो. पण मला त्याची खंत वाटते असे अजिबात नाही. मला मंत्रिपद मिळायला पाहिजे होते, मी तेव्हा बोललो. मी आजही बोलेन. उद्याही बोलेन. मला मंत्रिपद का मिळायला नको, हे मला कोणी सांगायला हवे. मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून काय रडत बसायचा का? उलट लढायचं. मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून मी जे फुटून गेले त्यांच्याबरोबरही मी गेलो नाही. मी लढत आहे. संजय राऊत म्हणाले, भास्कर जाधव काय बोलले. हे त्यांचे वक्तव्य मी ऐकलेले नाही.

# आगामी निवडणुकीसाठी ओबीसींनी एकत्रित यावे : हेमंत पाटील



**मुंबई :** राज्यात गेल्या काही काळापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे.अशात ओबीसी तसेच राज्यातील उपेक्षित वगार्साठी लढणाऱ्या संघटना,पक्षांनी एकत्रित येऊन निवडणूक लढवावी, असे आवाहन इंडिया अगेन्स्ट करप्शन चे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी रविवारी (ता.२२) केले. ओबीसी एकजुटीचे आवाहन करीत पाटील यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नवा सहभाग, नव्या अपेक्षा व्यक्त केल्या. राज्यातील ओबीसी समाज, तसेच उपेक्षित आणि मागासवर्गीय घटकांनी यंदाच्या स्थानिक निवडणुकांमध्ये आपले नेतृत्व सक्षमपणे उभे करावे. हे आवाहन कुठलाही राजकीय पक्ष किंवा सरकार विरोधात नसून, समाजहितासाठी सकारात्मक भूमिका बजावणाऱ्या नेतृत्वाची गरज ओळखून केले असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. राज्यात ओबीसी समाजाची लोकसंख्या ५० टक्क्यांहून अधिक आहे.परंतु विधानसभेपासून ते स्थानिक स्वराज्य संस्था पातळीपर्यंत त्यांचे राजकीय प्रतिनिधित्व तुलनेने कमी आहे. हे चित्र बदलण्यासाठी विविध समाजघटकांनी संघटित होणे गरजेचे असल्याचे पाटील म्हणाले. विचारधारेवर आधारित, पारदर्शक आणि जनतेच्या प्रश्नांशी बांधिलकी ठेवणाऱ्या नेतृत्वाने पुढे यावे.समाजाने आता फक्त मतदानापुरता नव्हे, तर खंबीर नेतृत्व घडविण्याच्या दिशेनेही विचार करावा,असे आवाहन पाटील यांनी केले. राज्यातील सध्याची राजकीय परिस्थितीही बदलती आहे. विविध पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्यासंदर्भात चाचपणी करीत आहेत. अशावेळी ओबीसी नेतृत्वाने एकत्र येऊन स्वतंत्र आघाडी तयार केली, तर नवीन राजकीय समीकरण तयार होतील. येत्या काळात ओबीसींच्या राजकीय एकीकरणाची दिशा ठरवण्यासाठी हे आवाहन असल्याचे पाटील पाटील म्हणाले.

# हिंगोली जिल्ह्यातील वादळी वाऱ्यामुळे १५७७ हेक्टरचे नुकसान

## मदतीसाठी लागणार ५.७७ कोटी रुपये, शासनाकडे अहवाल सादर

■ **महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. २२ :**

हिंगोली जिल्ह्यातील वसमत व कळमनुरी तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे तब्बल 1577 हेक्टर क्षेत्राच्या केळी व पपई पिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले असून या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 5.77 कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सासनाकडे सादर करण्यात आला आहे.



हिंगोली जिल्ह्यातील वसमत व कळमनुरी तालुक्यात केळीचे पिक घेतले जाते. यावर्षी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून केळीचे पिक काढणीसाठी आले असतांनाच ता. 9 जून रोजी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बागाच उध्वस्त झाल्या आहेत.

यामध्ये प्रामुख्याने कळमनुरी तालुक्यातील डिग्रस बुद्रूक, डोंगरकडा, सालापूर, रेडगाव, वडगाव, जवळापांचाळ, भाटेगाव यासह परिसरातील गावांचा समावेश आहे. तर वसमत तालुक्यातील कुरूंदा, गिरगाव यासह परिसरातील गावांचा समावेश आहे. दरम्यान, वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तातडीने अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या होत्या.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार जीवककुमार कांबळे, शारदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाने पंचनामे सुरु केले होते. यामध्ये कळमनुरी तालुक्यात 1049 हेक्टर वरील फळबागांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले असून वसमत तालुक्यात 528 हेक्टरवरील फळबागांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या संदर्भातील अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 5.77 कोटी रुपयांचा निधी लागणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत नुकसानीची माहिती शासनाकडे सादर केली आहे. आता नुकसानीच्या मदतीसाठी निधी कधी उपलब्ध होणार याची प्रतिक्षा शेतकऱ्यांना लागली आहे.

# कोकण, घाटमाथ्यावर अतिमुसळधार पावसाचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

मागील काही दिवस संपूर्ण राज्यात मुसळधार पाऊस कोसळल्यानंतर आता काही भागात पावसाचा जोर ओसरला आहे. कोकण तसेच घाटमाथ्यावर आज अतिमुसळधार पावसाचा इशारा (ऑरेंज अलर्ट) देण्यात आला आहे. दरम्यान, उर्वरित भागात पावसाचा जोर कमी राहणार आहे.

गेल्या आठवड्यात नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी वाटचाल केल्यानंतर संपूर्ण राज्यात पावसाचा जोर वाढला होता. काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर पावसाचा जोर ओसरला आहे. आज कोकण आणि घाटमाथ्यावर अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याचबरोबर विदर्भातही काही भागात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, कोकण आणि घाटमाथ्यावर पाऊस अधूनमधून कोसळत आहे. उर्वरित भागात मात्र पावसाने उघडीप दिली आहे. रायगड, रत्नागिरी, पुणे या भागात आज अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. तर मुंबई, ठाणे, सिंधुदुर्ग , सातारा आणि कोल्हापूर परिसरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी देशाचा बहुतांश भाग व्यापला आहे. मोसमी वाऱ्यांनी शुक्रवारी (२० जून) मध्य प्रदेश, बिहार आणि उत्तर प्रदेश व्यापून, पश्चिम उत्तर प्रदेशचा आणखी काही भाग , उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशचा बहुतांश भाग आणि जम्मू काश्मीरच्या काही भागात प्रगती केली. त्यानंतर शनिवारी मोसमी वारे एकाच जागी होती.

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात यंदा मोसमी पावसाच्या सुरुवातीच्या टप्प्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. कोकणात १ ते २० जून या कालावधीत सरासरीच्या ३७ टक्के जास्त पाऊस झाला आहे.

तर मध्य महाराष्ट्रात सरासरीच्या ३८ टक्के जास्त पाऊस झाला आहे.कोकणात २० जूनपर्यंत ५३४.३ मिमी, तर मध्य महाराष्ट्रात १२८.९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. साधारण या कालावधीत कोकणात ३९१ मिमी, तर मध्य महाराष्ट्रात ९३.३ मिमी पाऊस पडणे अपेक्षित असते. यंदा राज्यात मोसमी पाऊस लवकर दाखल झाला. त्यानंतर पावसाचा जोर प्रामुख्याने कोकणात सर्वाधिक होता.

## पालखी सोहळ्यात महिलांच्या दागिन्यांची चोरी

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :**

पुण्यातील बोपोडी चौक आणि खडकी परिसरात पालखी सोहळ्यादरम्यान महिलांच्या दागिन्यांची चोरी झाली आहे. श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी आलेल्या एका ६८ वर्षीय महिलेने खडकी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदवली आहे. दर्शनासाठी जमलेल्या गदीर्चा फायदा घेत चोरट्यांनी तक्रारदार महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबवले. याच सोहळ्यात आणखी एका महिलेच्या दागिन्यांची चोरी झाली. अशा घटना टाळण्यासाठी पोलिसांनी साध्या वेशातील कर्मचा?यांचा बंदोबस्त पालखी मार्गावर तैनात केला आहे. पालखी मुक्कामाच्या ठिकाणीही पोलिसांची गस्त सुरू आहे. औषध विक्री दुकानाचे दरवाजा उचकटून चोरट्यांनी गल्लूयातील एक लाख २८ हजारांची रक्कम चोरून नेल्याची घटना कर्वे रस्त्यावर घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तीन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्वे रस्त्यावरील गरवारे महाविद्यालय परिसरात पुनमचंद मेडीकल शॉप हे औषध विक्री दुकान आहे.

# ८ वर्षाच्या मुलीचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकाला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

गृहपाठ देण्याच्या बहाण्याने ८ वर्षाच्या मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी ५४ वर्षीय शिक्षकाला कांजुरमार्ग पोलिसांनी अटक केली. आरोपी नवी मुंबईतील रहिवासी असून त्याच्याविरोधात विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण(पोक्सो) कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरोधात यापूर्वी अशा प्रकारच्या कोणत्याही तक्रारी नसल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून कांजुरमार्ग पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७५ व पोक्सो कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार शुक्रवारी हा प्रकार घडला. शुक्रवारी सायंकाळी पीडित मुलगी घरी परतली असता ती रडू लागली. तिच्या आईने तिला त्याबाबत विचारले असता गणिताच्या तासाला शिक्षकांनी स्वाध्याय व गणिताचे प्रश्न सोडवण्याच्या बहाण्याने पीडित मुलीशी अश्लील कृत्य केल्याचे तीने सांगितले.

अखेर मुलीच्या आईने याप्रकरणी स्थानिक कांजूरमार्ग पोलिसांकडे तक्रार केली. त्यानुसार पोलिसांनी प्रकणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपी शिक्षकाला शनिवारी याप्रकरणी अटक करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

मुंबईत अल्पवयीन मुले व मुली यांच्याविरोधात घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मुंबईत २०२४ मध्ये बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्या अंतर्गत १३४१ गुन्ह्यांची नोंद झाली होती. २०२३ पोक्सो कायद्या अंतर्गत ११०८ गुन्ह्यांची नोंद झाली होती. २०२४ मध्ये मुंबईत पोक्सो कायद्या अंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये ६०९ बलात्कार, ६६७ विनयभंग व ३५ छेडछाड-अश्लील शेरेबाजी केल्याच्या घटनांचा समावेश आहे. २०२३ मध्ये अल्पवयीन मुलींवरील गुन्ह्यांतील ९९ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले होते. २०२४ मध्ये या प्रमाणात घट झाली असून २०२४ मध्ये हे प्रमाण ९६ टक्के होते. विनयभंग व छेडछाड-अश्लील शेरेबाजी गुन्ह्यांच्या उकल होण्याच्या प्रमाणही अनुक्रमे १०० टक्क्यांवरून ९७ टक्के व ९६ टक्क्यांवरून ९१ टक्क्यांपर्यंत घटले.

# मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठा २६.८४ टक्के

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठ्यात गेल्या आठवड्यातील पावसामुळे चांगलीच वाढ झाली आहे. सातही धरणात मिळून २६.८४ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या तीन वषार्तील जून महिन्यातील हा सर्वाधिक साठा आहे. पाणीसाठ्यात चांगली वाढ झाल्यामुळे राखीव साठ्याचा वापर बंद करण्यात आला आहे.



मुंबई शहर आणि उपनगरात तसेच आसपासच्या जिल्ह्यात गेल्या आठवड्यात चांगला पाऊस पडल्यामुळे दोन तीन दिवसातच मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठ्यात १८ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एरव्ही जून महिन्यात पाणीकपातीची वेळ येत असली तरी यंदा जून महिन्यात मुंबई महापालिकेची पाणी पुरवठ्याची चिंता मिटली आहे.

गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत यावर्षी पाणीसाठा चांगलाच वाढला आहे. गेल्यावर्षी याच दिवशी पाणीसाठा अत्यंत खालावला होता व साडे पाच टक्क्यांवर गेला होता. तर त्याच्या आधीच्यावर्षी हाच पाणीसाठा सात टक्के होता. त्या तुलनेत यंदा धरणात तिप्पट चौपट पाणीसाठा जमा झाला आहे.

गेल्या सोमवारी १७ जूनपासून चांगला पाऊस पडल्यामुळे मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणसाठ्यात ही वाढ झाली आहे. सोमवारी सकाळी ८.६० टक्के असलेला पाणीसाठा आठवड्या भरातच २६ टक्क्यांच्या पुढे गेला आहे. खालावलेल्या पाणीसाठ्यात भरघोस वाढ झाल्यामुळे मुंबईकरांसह पालिका प्रशासनाला देखील दिलासा मिळाला आहे. गेल्या काही वर्षांपासून पाऊस खूप लांबत चालला होता. जून महिन्यात पाऊसच पडत नसल्यामुळे धरणांतील पाणी तळ गाठू लागत. त्यामुळे राखीव साठ्याचा वापर करणे, पाणी कपात करणे हे उपाय मुंबई महापालिका प्रशासनाला करावे लागत होते.

पावसाला पुरेशी सुरूवात होत नाही तोपर्यंत अक्षरशः पाणीपाणी करावे लागत होते. यंदा मात्र पावसाला लवकर सुरुवात झाल्यामुळे धरणांत पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या आठवड्यात मुंबई महापालिकेने उर्ध्व वैतरणा धरणातून पाणी उचलण्यास सुरुवात केली होती मात्र पाऊस चांगला पडू लागल्यामुळे राखीव साठ्याचा वापर बंद करण्यात आल्याची माहिती जल अभियंता पुरुषोत्तम माळवदे यांनी दिली.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार आणि तुळशी सातही धरणात मिळून ३ लाख ८८ हजार ५२३ दशलक्षलीटर म्हणजेच २६,८४ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे.

# पुण्यात शिंदे गटाकडून उद्धव ठाकरेंवर व्यंगचित्रातून निशाणा

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :**

मुंबईत १९ जून २०२५ रोजी ठाकरे गटाचा आणि शिंदे गटाचा ५९ वा शिवसेनेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतेवेळी महायुती सरकार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केल्याचे पाहण्यास मिळाले.




त्यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, नाना पाटेकर एका चित्रपटात गुंडा समोर उभे राहून म्हणतात, कम ऑन किल मी, त्या प्रमाणे मी ही गद्दारासमोर उभे राहून म्हणतो, कम ऑन किल मी, असेल हिंमत तर या अंगावर, पण अंगावर येणार असाल तर येताना रुग्णवाहिका घेऊन या, कारण सरळ याल पण जाताना आडवे होऊन जाल अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली होती.

ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोन्ही नेत्यांमधील आरोप प्रत्यारोपांदरम्यान शिवसेनेचे पुणे शहर प्रमुख नाना भानगिरे यांनी उद्धव ठाकरे यांना व्यंगचित्राच्या माध्यमातून लक्ष करणारे फ्लेक्स शहरातील अनेक ठिकाणी लावले आहे.

त्या फ्लेक्सबाजी बाबत सांगायचे झाल्यास, ते बोलण्यात व्यस्त आहेत, आम्ही कामात मग्न आहोत.आशा आशयाचा मजकूर आणि त्याच्या खाली उद्धव ठाकरे यांचे व्यंगचित्र रेखाटण्यात आले आहे. उद्धव ठाकरे यांच्या हातामध्ये कुबडी तर दुसऱ्या हातामध्ये काँग्रेसचा ऑक्सिजन सिलेंडर, त्यावर काँग्रेस पक्षाचे चिन्ह दाखविण्यात आले आहे. तसेच त्याच्या वरील बाजूला come of...kill me आशा आशयाचा मजकूर लिहिण्यात आला आहे. तर त्याचाच बाजूला एकनाथ शिंदे हे खांद्यावर शिवसेनेचे चिन्ह असलेली भगवी पताका हाती घेऊन चालताना दाखविण्यात आले आहे.

तर त्याचाच बाजूला एकनाथ शिंदे हे रुग्णालयातील जखमीशी संवाद साधताना फोटो दाखविण्यात आले आहे. तर या एकूणच फ्लेक्स बाजीची पुणे शहराच्या राजकीय वतुर्ळात चांगलीच चर्चा रंगू लागली आहे. आता फ्लेक्सबाजीला ठाकरे गटाकडून काय प्रत्युत्तर येते हे पाहणे जरुरीचे ठरणार आहे.

## सासूच्या छळामुळे उच्चशिक्षित महिलेची आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २२ :**

सासूकडून हुंड्यासाठी होणाऱ्या छळामुळे उच्चशिक्षित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर परिसरातील हांडेवाडी भागात घडली. याप्रकरणी सासूविरुद्ध काळेपडळ पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीपिका प्रमोद जाधव (वय २९) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत दीपिकाच्या वडिलांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सासू द्वारका नामदेव जाधव (रा. सातवनगर, हांडेवाडी रस्ता) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपिका आणि प्रमोद जाधव यांचा आठ वर्षांपूर्वी विवाह झाला होता. दीपिकाने कृषीविषयक पदवी मिळवली आहे. विवाहानंतर ती एका खासगी कंपनीत नोकरी करत होती. तिचा पती शासकीय कार्यालयात लिपिक आहे. त्यांना एक मुलगा आहे. विवाहानंतर सासू द्वारका हिने दीपिकाला हुंड्यासाठी त्रास देण्यास सुरूवात केली. विवाहात हुंडा कमी दिल्याचे सांगून तिला टोमणे मारण्यात आले. तिचा शारिरिक आणि मानसिक छळ केला. तिच्याकडे पैशांची मागणी करण्यात आली.

छळ असह्य झाल्यने दीपिकाने शुक्रवारी (२० जून ) राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली, असे तिच्या वडिलांनी दिलेल्या फियार्दीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी घटनास्थळी भेट दिली. सहायक पोलीस निरीक्षक विलास सुतार तपास करत आहेत.

# पैठण येथून माहेश्वरी सत्संग मंडळ दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

■ **महासागर प्रतिनिधी, पैठण, दि. २२ :**

पैठण येथून माहेश्वरी सत्संग मंडळ व वै. ह भ प श्रीकृष्णदास महाराज लोहिया यांच्या प्रेरणेतून पैठण ते पंढरपूर दिंडीला मागील तिन वर्षांपासून सुरुवात करण्यात आली संत एकनाथ महाराज पालखी दिंडी सोहळ्या बरोबरच ही माहेश्वरी सत्संग मंडळाची दिंडी सामील होते. दिंडीचा पहिला मुक्काम माहेश्वरी भक्तनिवास पैठण व दुसरा मुक्काम हादगाव येथे आणि पुढील सर्व मुक्काम संत एकनाथ महाराज पालखी दिंडी सोहळ्या बरोबर पंढरपूरला पोहोचणार आहे.

या दिंडी बरोबर महिला वारकरी भाविकांची सर्व सोय सुविधा करण्यात आली आहे कारण पंढरपूरच्या वारीत पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना अनेक अडचणींना समोरे जावे लागते अशा अडचणी लक्षात घेता माहेश्वरी सत्संग दिंडीने आपल्या दिंडी सोबत तीन लाख रुपये खर्च करून सहा पोर्टेबल टॉयलेट त्यामध्ये तीन इंडियन व तीन वेस्टरन अशा पोर्टेबल टॉयलेट ट्रॅक्टर ट्रॉलीवर बसविले आहेत तसेच दहा बाय दहाची महिलांसाठी स्नानगृहाचे टेंट व रात्री वारकरी भाविकांना झोपण्यासाठी स्लीपर कोच लक्झरी बस, दिंडी सोहळ्यासोबत डॉक्टरची टीम व त्यांच्यासोबत चार लाखाची औषधी यामध्ये बाम, पाय व गुडघेदुखी वरील औषधी व ट्यूब, स्प्रे, ताप, थंडी, खोकला, सर्दी आधी दुखण्याच्या औषधी सर्व वारक?यांना पिण्यासाठी आरोच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

माहेश्वरी सत्संग मंडळाची दिंडी प्रमुख विजयकुमार लोहिया, अध्यक्ष हभप श्रीनाथ महाराज गोसावी, विणेकरी हभप गोरख जनार्दन अंबाडे महाराज, दिंडी यशस्वी करण्यासाठी जयनारायण लोहिया, निवृत्ती लोळगे, गोपाल लोहिया, राजेंद्र झवर , महेश दायमा यांनी परिश्रम घेतले दिंडीमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी व महिला वारकरी सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांसाठी पैसा नाही, पण साखर कारखान्यासाठी ५०० कोटी?

## अर्थमंत्री अजित पवारांवर संजय राऊतांचा घणाघात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

सरकारला शेतकऱ्यांची कर्जमाफी करता येत नाही. लाडक्या बहीणींना तुम्हाला नीट पैसे देता येत नाही, पण मला माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन करा, मी 500 कोटी 24 तासांमध्ये घेऊन येतो हे राज्याचे अर्थमंत्री सांगत आहे, असे म्हणत ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी महायुतीवर निशाणा साधला आहे.



संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार हे राष्ट्रीय नेते आहेत आणि अजून गावातूनच फिरत आहे. हे ह्या राज्याचे दुर्दैव आहेकी असे नेते या राज्याला मिळाले, असा टोलाही राऊतांनी लगावला आहे. 500 कोटी हा काही लहान आकडा नाही, तुम्ही कुणाच्या तिजोरीतील पैसे लुटणार आहात? असा सवाल राऊतांनी केली आहे. अजित पवारांकडे राज्यातील इतर कोणत्याही कामाला द्यायला पैसे नाही. ठणठण गोपाळा, पण माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा जर मी चेअरमन झालो तर 24 तासांमध्ये 500 कोटी रुपये सरकारकडून घेऊन येईल, असे अजित पवार म्हणाले आहेत, असा म्हणत ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी महायुतीवर टीकास्त्र डागले आहे. संजय राऊत म्हणाले की, भास्कर जाधव यांचे वक्तव्य मी काही ऐकले नाही. ते आमचे मित्र आणि जवळचे सहकारी आहेत. वर्धापन दिनानिमित्त ज्या मोजक्या लोकांनी पक्षाच्या मंचावर भाषण केलेल त्यातील एक भास्कर जाधव हे देखील होते. त्यांनी त्यांच्या भावना मांडल्या असतील तर पक्षप्रमुख त्यांची दखल घेतील.

# १५ दिवसांतच प्रधानमंत्री सडक योजनेचा रस्त्याला तडे

## गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह, भ्रष्टाचाराचा संशय



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.२२)–** चांदूर बाजार तालुक्यातील जगन्नाथपूर ते मेघनाथपूर या तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत नव्याने बांधकाम करण्यात आले. मात्र, केवळ १५ दिवसांतच रस्त्यावर मोठे तडे दिसू लागल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, या कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह आणि आर्थिक भ्रष्टाचाराचा संशय उपस्थित करण्यात आला आहे.

नुकत्याच पूर्ण झालेल्या रस्त्यावर इतक्या कमी कालावधीत मोठाले तडे गेल्याने गावक?यांनी कंत्राटदार आणि संबधित अभियंत्यांविरोधात निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. गुणवत्तेचा अभाव, निकृष्ट साहित्याचा वापर आणि अधिका?यांचे दुर्लक्ष यामुळे हा रस्ता काही दिवसांतच खराब झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर विविध विकासकामे सुरू असूनही, प्रशासन किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा देखरेखीचा अभाव असल्याचे चित्र दिसून येत आहे. लाखो रुपयांचा निधी मंजूर होत असतानाही रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याने, सरकारी निधीचा अपव्यय होत असल्याचे गावक?यांचे म्हणणे आहे. गावक?यांनी स्पष्टपणे सांगितले की, या रस्त्याचे अजून लोकार्पणही झालेले नाही, तरीही तो खराब होतो, ही गोष्ट अतिशय गंभीर आहे. त्यामुळे थर्ड पार्टी ऑडिट व चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली जात आहे. याबाबत लोकप्रतिनिधींनी मौन बाळगले असून, त्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

### केवळ निधी वाया जातोय?

या घटनेमुळे चांदूर बाजार तालुक्यातील इतर विकासकामांचीदेखील चौकशी होण्याची मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासन आणि शासनाने यावर तातडीने पावले उचलून दोषींवर कारवाई केली, तरच जनतेचा सरकारी यंत्रणेवरील विश्वास टिकून राहील. अन्यथा, अशा निकृष्ट कामांमुळे केवळ निधी वाया जात नाही, तर सामान्य जनतेचा जीवही धोक्यात येऊ शकतो.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना प्रधानमंत्री सडक योजनेचे अभियंता राहुल जवंजाळ म्हणाले की, संबंधित रस्त्यावर क्रॅक निर्माण झाल्याचे लक्षात आले आहे. लवकरच दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येईल आणि वेळेत पूर्ण केले जाईल.



# मतदान पर्यवेक्षक वसीम फरहत यांचा नवी दिल्लीत राष्ट्रीय सन्मान



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.२२) –** बडनेरा ३७ विधानसभा मतदारसंघ अंतर्गत भातकुली तहसील येथे कार्यरत असलेले मतदान पर्यवेक्षक अधिकारी वसीम फरहत यांचा नवी दिल्लीत राष्ट्रीय पातळीवर सन्मान करण्यात आला. भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था, नवी दिल्ली येथे १२ व १३ जून रोजी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात त्यांचा गौरव करण्यात आला.

या दोन दिवसीय प्रशिक्षणात महाराष्ट्रसह आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा राज्यांतील जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक अधिकारी आणि बीएलओ अधिकारी सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून एकूण १३२ अधिकारी या प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. अमरावती जिल्ह्यातून बडनेरा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना वसीम फरहत यांनी अत्यंत प्रभावी सहभाग नोंदवला.

वसीम फरहत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुलभ आणि विश्वासार्ह ठेवण्यासाठी केंद्रस्तरावरील मतदान अधिकारी सतत अद्ययावत राहणे आवश्यक आहे. निवडणूक व्यवस्थापन ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून, लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी एक महत्त्वाचा भाग आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमात अमरावतीचे तत्कालीन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारत निवडणूक आयोगाचे आयुक्त डॉ. विवेक जोशी यांनी भूषवले. निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी मास्टर ट्रेनर म्हणून उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. वसीम फरहत यांचा सन्मान महाराष्ट्र राज्याचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दुल यांच्या हस्ते करण्यात आला. आपल्या यशाचे श्रेय वसीम फरहत यांनी उपजिल्हाधिकारी जाधव साहेब, जिल्हा उप निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, तहसीलदार डॉ. अजित कुमार येले, नायब तहसीलदार वाढोणकर आणि अशोककुमार कळीवकर यांना दिले. त्यांच्या या गौरवाबद्दल उर्दू शिक्षक संघटना व महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अमरावतीच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.



# समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मातृशक्तीच्या हस्ते गौरव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२२) –** वीरशैव लिंगायत बहुउद्देशीय सेवा संस्था, अमरावतीच्या वतीने २०२५ मध्ये दहावी व बारावीच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे या सोहळ्यात गुणगौरव समाजातील मातृशक्तीच्या हस्ते करण्यात आला, यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.


या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माधुरी मेंडसे यांनी भूषवले. त्यांच्यासह विजया गुढे, संजीवनी भोगांवकर, शारदा गव्हाणे, अश्विनी कुर्हे, सुरेखा चोंढीकर, अल्का जीवरकर, किरण काळे, पल्लवी धाके आणि भारती कुर्हेकर या मान्यवर महिलांनी विद्यार्थ्यांना सन्मानित केले. कार्यक्रमाची सुरुवात कविता बरमकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. संचालन सविता गुढे यांनी केले तर आभार प्रदर्शन मीनल काडोदे यांनी व्यक्त केले. या सोहळ्यास संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, समन्वयक, समाजातील मान्यवर, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या यशाला दाद देताना उपस्थित मातृशक्तीने शैक्षणिक प्रगतीसाठी मार्गदर्शन केले व समाजाच्या प्रगतीत महिलांचा वाटा वाढवण्याचा संदेश दिला. आजच्या युगात ज्ञान, विज्ञान, संगणक, प्रशासकीय सेवा आणि लष्कर यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांचे सक्रीय योगदान दिसत आहे. त्यामुळे वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने आयोजित मातृशक्तीच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला. कार्यक्रमातून समाजात शिक्षणाची महती व महिलांचा सशक्त सहभाग अधोरेखित झाला.

# युवक काँग्रेसने शहरात राबविले स्वच्छता अभियान

### सायंस्कोर मैदान ते काँग्रेस भवन रस्त्यांची स्वच्छता

### नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२२) –** शहरातील वाढती अस्वच्छता, ठिकठिकाणी साचलेला कचरा आणि मनपाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेली आरोग्यधोक्याची स्थिती याच्या विरोधात अमरावती युवक काँग्रेसने गांधीगिरी पद्धतीने 'स्वच्छता अभियान' राबवत सशक्त जनआंदोलनाचा प्रारंभ केला आहे. जननायक राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त १९ जूनपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत २२ जून रोजी रुक्मिणी नगर येथील सायंस्कोर मैदान ते काँग्रेस भवन रस्त्यापर्यत विशेष सफाई मोहीम राबवण्यात आली.

शहरातील ऐतिहासिक आणि वर्दळीच्या या भागात मोठ्या प्रमाणावर कचरा साचला होता. युवक काँग्रेसने या भागातील अस्वच्छतेबाबत आवाज उठवल्यानंतर अखेर मनपा प्रशासनाने यंत्रणा कार्यान्वित केली. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेत कचरा उचलून परिसर स्वच्छ केला. या उपक्रमात स्थानिक नागरिकांनीही सहभाग घेत युवक काँग्रेसच्या या उपक्रमाचे कौतुक केले. या अभियानावेळी अनेक मान्यवर आणि काँग्रेस नेते उपस्थित होते. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी महापौर मिलिंद चिमोटे, विलास इंगोले, अशोकराव डोंगरे, प्रदेश काँग्रेस सचिव किशोर बोरकर, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, तसेच माजी नगरसेवक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात समीर जवंजाळ, अनिकेत देशमुख, सागर कलाने, योगेश बुंदेले, नितीन काळे, संकेत साहू, आकाश धुराटकर यांसारख्या युवक काँग्रेस आणि एनएसयूआयच्या कार्यकर्त्यांनी देखील मोलाचे योगदान दिले. स्वच्छतेच्या या मोहिमेत प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात जनजागृती घडवून आणण्यात आली. युवक काँग्रेसने स्पष्ट इशारा दिला की, जर वेळेत मनपा प्रशासनाने स्वच्छतेबाबत उपाययोजना केल्या नाहीत, तर आंदोलन तीव्र करण्यात येईल. या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण झाली असून, युवक काँग्रेसने घेतलेली ही जबाबदारी निश्चितच स्तुत्य आहे. युवकांनी घेतलेला पुढाकार आणि गांधीगिरी पद्धतीची भूमिका स्वच्छ आणि सुशोभीकरणाकडे नेणारी दिशा दाखवत असल्याचे नागरिकांनी म्हटले.

# श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबाचे विश्वस्तपदी प्रविण कुकडकर यांची नियुक्ती



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे (दि.२२) –** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आणि कापुराची यात्रा म्हणून ओळख असलेल्या सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे दि.२१/६/२०२५ रोजी विश्वस्त मंडळाची सामान्य सभा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. संस्थानचे विश्वस्त स्व. अनिल बेलसरे यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पदावर प्रविण नानाजी कुकडकर यांची बहुमताने निवड करण्यात आली.

या निवडीमुळे ग्रामस्थ आणि संस्थान भक्तांतून समाधान व्यक्त होत आहे. नियुक्ती प्रसंगी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्नील चौधरी उपस्थित होते. नवीन विश्वस्त प्रविण कुकडकर यांचे पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. त्यांच्या सहभागामुळे संस्थानच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात नवा उत्साह आणि गती निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चांदूर रेल्वे शहरात आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

## नगर परिषद, पतंजली योगपीठ, सहजयोग यांचा स्तुत्य उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,(दि.२२)–** चांदूर रेल्वे नगर परिषद, पतंजली योगपीठ आणि लोकमत सखी मंच यांच्या संयुक्त विद्यामानाने २१ जुन रोजी सकाळी ६:०० वाजता हुतात्मा स्मारक येथे अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिके सादर करून योग दिन साजरा करण्यात आला.

' एक पृथ्वी आरोग्यासाठी योग ' हे या वर्षीच्या घोषवाक्यनुसार एक पृथ्वी, एक आरोग्य यासाठी योग या संकल्पनेवर आधारित यंदाचा दिन कल्याणकारी एकात्मिक दृष्टिकोन देणारा ठरणार आहे. 'सर्वे सन्तु निरामयः ' (सर्व रोगमुक्त होऊ देत) या भारतीय नीति तत्त्वातून मानव आणि ग्रहांच्या आरोग्याच्या परस्–परसंबंधावर यामध्ये भर दिला आहे…योग शिक्षिका सोनोने यांनी योग साधनेचे महत्व विषद करत उपस्थित नागरिकांना योगासना चे प्रशिक्षण दिल्या गेले..नगर परिषद चांदुर रेल्वेचे मुख्याधिकारी विकास खंडारे हे आजच्या योगा दिवसाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते.माजी जी. प. शाळेच्या माजी शिक्षिका कुंभारे यांनी सुद्धा उपस्थिताना मोलाचे मार्गदर्शन केले. नंदा वाधवानी, बच्चू वानरे, पप्पू भालेराव, तसेच लोकमत सखीमंच च्या विभाग प्रतिनिधी सुलोचना राऊत, सुषमा पातूर्डे, लता बागडे, करुणा जावरकर, मंगला मेंढे, पूजा नारेपाल, तसेच पतंजली च्या योग शिक्षिका सुनंदा सोनोने, संध्या साबळे, कुंभारे, धनश्री श्रीराव हे मान्यवर आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार लता बागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नगर परिषदचे मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे यांच्या मार्गदर्शात नगर परिषदेतील कर्मचारी आशिष कु?हाडे, जितेंद्र कर्से, कीर्ती जावडे, शुभम कांबळे, संगीता इमले, श्वेता डोंगरे, शहर समन्वयक पल्लवी जामोदकार, श्यामल नदरधने, देविका वनवे, प्रजा लाकडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी उज्वला पटले, उमेश इंगोले, सागर हटवार, विशाल सूरकर, संजय वानखेडे, मनीष कनोजे, अनंता वानखेडे, राजेश शिर्के, मयूर घोडेस्वार, अमोल कडू, नीरज दुबे सहकार्यानी पार पडला.

# विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.२२)–** विजेचा जोरदार धक्का बसून एका २३ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गाडगेनगर हद्दीतील अभिनव कॉलनी परिसरात घडली. शेख वसिम शेख आझिम (वय २३, रा. आजरानगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. वसिम कामानिमित्त अभिनव कॉलनीमधील एका खासगी रुग्णालयात गेला होता. तेथे त्याच्याकडून विद्युत विभागाशी संबंधित काम सुरू होते. यावेळी त्याला अचानक विजेचा धक्का बसला. यात तो गंभीर जखमी झाला. तातडीने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. वसिम नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी असून तो हल्ली कामासाठी शेगाव नाका परिसरात जात होता. त्याचा मृत्यू झाल्याने कुटुंबियांसह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# वरुड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा





**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.२२) –** कृषी उत्पन्न बाजार समिती आणि योगेश्वर योगा साधना ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने वरुड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात २१ जून २०२५ रोजी आंतराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार नरेशचंद्र उर्फ बाबासाहेब ठाकरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून मोशी विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंदु यावलकर उपस्थित होते. १५ ते २१ जून दरम्यान योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शेकडो पुरुष व महिलांनी सक्रीय सहभाग नोंदविला. योग शिक्षक अशोक घोरमाडे यांनी उपस्थितांना योगाचे धडे दिले. त्यांनी योगासने व प्राणायामाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, ङ्गयोगासने केवळ शारीरिक नव्हे तर मानसिक आरोग्यासाठीही अत्यंत लाभदायक आहेत. योगामुळे शरीराच्या प्रत्येक स्नायूंचा व्यायाम होतो आणि नियमित योगामुळे आजार दूर होतात.ङ्घ त्यांनी सर्वांना नियमितपणे पहाटे उठून योग करण्याचा संदेश दिला. या वेळी मंचावर माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे, आमदार उमेश यावलकर, डॉ. राजेंद्र राजुरिया, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र (बबलू) पावडे, डॉ. विजय देशमुख, डॉ. मीना बंदे, डॉ. कविता देशमुख, महेंद्र देशमुख, संचालक राजेश गांधी, बाळू पाटील, नितीन खेरडे, तारेश देशमुख, महेश बोरकुटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्व प्रमुख पाहुण्यांनी योग दिनाच्या महत्त्वावर भाष्य करत नियमित योग साधनेचे फायदे सांगितले. या निमित्ताने योग शिक्षक अशोक घोरमाडे यांचा माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि ज्येष्ठ योगसाधक उषा वायकुळ व बाबाराव जाणे यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश देशमुख, प्रमोद देऊळकर, डॉ. आशिष डहाने, डॉ. आनंद झामडे, राजु चांडक, संदीप धोटे, विजय जिचकार, महेंद्र राऊत, उद्धव फुटाणे, सुनील काळे, पंकज अनासाने, नितीन अगदकर, रामचंद्र राऊत, सर्वेश कवडे, रामचंद्र गेडाम, अजय राठी, नंदकिशोर बोडखे, सुरेश सालोडे, विजेण खंडेलवाल, सचिन वायकुळ, निलेश मगरदे, महेंद्र खापरे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन एलआयसी चे विकास अधिकारी प्रमोद देऊळकर यांनी केले, तर प्राचार्य संदीप धोटे यांनी औपचारिक आभार मानले.

# जन्म-मृत्यू दाखला वाटप प्रक्रिया अद्यापही ठप्प

## खासदार वानखडे यांची त्वरीत कार्यवाहीची मागणी | किरीट सोमय्या यांच्या आरोपांनंतर प्रशासन साशंक

### शेकडो नागरिक अडचणीत




**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर/ अमरावती, (दि.२२) –** अमरावती जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांमध्ये नागरिकांना जन्म व मृत्यू प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी लावलेले बनावट प्रमाणपत्रनिर्मितीचे गंभीर आरोप. या आरोपांनंतर महाराष्ट्र सरकारने नायब तहसीलदारांमार्फत वितरित करण्यात आलेली सर्व जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे रद्द केली होती. जरी शासनाने यासंदर्भात स्पष्ट आदेश काढले असले तरीही जिल्हास्तरावर अद्याप प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया सुरु झालेली नाही. परिणामी, हजारो नागरिक शासकीय कामकाज, शाळा प्रवेश, पेन्शन, विमा, वारसा हक्क यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांअभावी अडचणीत सापडले आहेत. या गंभीर विषयाची दखल घेत अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी जिल्हाधिका?यांना पत्र लिहून ही प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.


त्यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, शासनाचे स्पष्ट आदेश असूनही अनेक तहसील कार्यालयांमध्ये ही प्रक्रिया पूर्णतः बंद आहे आणि त्यामुळे सामान्य जनतेवर अन्याय होत आहे. खासदार वानखडे यांनी हेही स्पष्ट केले की, किरीट सोमय्या यांनी लावलेल्या आरोपांमध्ये बांगलादेशी व पाकिस्तानी नागरिकांना बनावट प्रमाणपत्र दिल्याचे म्हटले होते, मात्र तपासामध्ये अशा कोणत्याही प्रकारचा एकही ठोस पुरावा सापडलेला नाही. कोणत्याही विदेशी नागरिकाला महाराष्ट्रात वैध अथवा अवैध मार्गाने जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्र मिळाल्याचे उदाहरण आढळलेले नाही. त्यामुळे ठोस पुराव्यांशिवाय संपूर्ण प्रक्रिया थांबवणे म्हणजे जनतेवर अन्याय होय.

### नागरिकांची पायपीट

प्राप्त माहितीनुसार, अनेक तहसील कार्यालयांमध्ये आजही प्रमाणपत्र वाटप बंद आहे. त्यामुळे शासकीय योजनांचे लाभ, बँक व्यवहार, शाळांतील प्रवेश प्रक्रिया, पासपोर्ट काढणे इत्यादी महत्त्वाच्या सेवा खोळंबल्या आहेत. विशेषतः ग्रामीण व मागास भागातील नागरिक तहसील कार्यालयांचे फेरे मारत आहेत, मात्र त्यांना कोणतेही स्पष्ट उत्तर मिळत नाही. खासदार बळवंत वानखडे यांनी मुख्यमंत्री, राज्याचे बालविकास मंत्री तसेच जिल्हाधिका?यांना विनंती केली आहे की, ही प्रक्रिया त्वरित सुरु करून नागरिकांना दिलासा द्यावा. ही प्रशासनाची निष्क्रियता केवळ नागरिकांसाठी त्रासदायक ठरत नाही, तर शासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करते, असे त्यांनी नमूद केले. आता प्रशासन आणि शासन यावर किती लवकर कार्यवाही करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन ही प्रक्रिया पूर्ववत सुरु केल्यास हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# सावंगा विठोबा नगरीत 'चंदन-उटी' उत्सवाचे भक्तिभावात आयोजन





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,(दि.२२) –** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथे अमावस्या निमित्त 'चंदन-उटी उत्सव' भक्तिभावात संपन्न होणार आहे. श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने दिनांक २५ जून २०२५, बुधवार रोजी दुपारी ४.३० वाजता या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

अलीकडेच गुढीपाडवा ते रामनवमी दरम्यान झालेल्या यात्रोत्सवात लाखो भाविकांनी हजेरी लावून शेकडो क्विंटल कापुर जाळत आपल्या मनोकामना मांडल्या होत्या. त्यानंतर आता पुन्हा एक भक्तीपूर्ण पर्वणी 'चंदन-उटी उत्सवाच्या' निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे. यावेळी संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी आदींची उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमानंतर बाहेरगावाहून आलेल्या भाविकांसाठी महाप्रसाद (अन्नदान) समितीच्या माध्यमातून अन्नदानाचा आयोजन करण्यात आले आहे. संस्थानच्या वतीने सर्व भक्तांना तन, मन आणि धनाने सहभाग घेऊन या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वारी : परंपरा, विज्ञान आणि माणुसकीचा संगम

पंढरपूरची वारी ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी अध्यात्मिक चळवळ आहे. हजारो वारकरी, स्त्री-पुरुष, बालक-वृद्ध, गरीब-श्रीमंत अशा विविध थरांतील लोक पंढरपूरच्या दिशेने टाळ, मृदुंगाच्या गजरात, 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषात, विठ्ठलनामाच्या गजरात पायी चालत एकत्र येतात. ही यात्रा केवळ एक धार्मिक परंपरा म्हणून नाही तर ती विज्ञान, आरोग्य, सामाजिक समतेचा संदेश देणारी आणि माणुसकीच्या शिक्षणाची शाळा आहे.

-----------------

आपण आधुनिक युगात विज्ञानावर भर देतो, आणि श्रद्धा-परंपरांकडे संशयाने पाहतो. पण वारी ही परंपरा केवळ श्रद्धेची फलश्रुती नाही. संतांनी वारीच्या माध्यमातून लोकजीवनात चालण्याची सवय निर्माण केली.

पायी चालण्याने होणारा व्यायाम, शारीरिक आरोग्य वाढवतो. एकेका दिवशी २० ते ३० किलोमीटर चालल्याने शरीरातील चयापचय क्रिया सुधारतात, फुफ्फुसे, हृदय मजबूत होते. अनेकदा आधुनिक वैद्यकीय शास्त्रदेखील पायी चालण्याचा आग्रह धरते. संतांनी ही गोष्ट शतकांपूर्वी ओळखली होती.

आजच्या यंत्रयुगात लोक फार कमी चालतात. स्थूलपणा, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार यांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. या आजारांवर चालण्याइतका प्रभावी आणि सहज उपाय नाही. पण कोणी 'चाल' म्हणाले तर ईगो अडथळा ठरतो. म्हणूनच संतांनी 'वारी' सारख्या सामाजिक अध्यात्मिक चळवळीद्वारे पायी चालण्याला धार्मिक अधिष्ठान दिलं. हेच त्यांचं द्रष्टेपण!




**वारी म्हणजे माणुसकीचा झरा**

वारीत सहभागी झाल्यावर मनात एक विलक्षण शांतता येते. अहंकार गळून पडतो. 'मी कोणीतरी खास आहे' ही भावना आपोआप विरते. कारण वारीत कोणी मोठा, लहान, श्रीमंत, गरीब नसतो. सगळे एकाच पंक्तीत उभे असतात. एकमेकांना 'माऊली' म्हणत हाक मारतात. हे संबोधनच दुसऱ्यामधील देवत्वाची जाणीव करून देतं.

वारीत माणसं एकमेकांशी बोलतात, एकमेकांचं दुःख समजून घेतात, अन्न, पाणी, निवारा शेअर करतात. इथे परस्पर सहकार्य, सेवा, सहानुभूती आणि एकोपा हाच धर्म असतो. ही सगळी शिकवण कोणत्याही विद्यापीठात मिळत नाही. वारी म्हणजे माणुसकीची शाळा आहे.

**वारीतून सामाजिक समतेचा संदेश**

वारीमध्ये कोणाचं वंश, जात, वर्ग, धर्म विचारात घेतला जात नाही. इथे प्रत्येक माणूस फक्त वारकरी असतो. टाळ, चिपळ्या, अभंग आणि विठ्ठलनाम हेच त्याचं ओळखपत्र. ही समता संतांनी स्वखुशीने नाही, तर जनतेला समजावून, जगवून, प्रत्यक्ष कृतीतून रुजवली आहे.

आजही हजारो माणसं विठ्ठलाच्या नामात एकरूप होऊन पंढरपूरकडे जातात. त्यांना एकाच गोष्टीचा ध्यास असतो झ्र ₹विठ्ठलाचं दर्शन, आणि माणूस म्हणून जगणं.₹ यासाठी कोणालाही वेगळं वाटत नाही, कोणी मागे रहात नाही. ही खरी धर्मनिरपेक्षता आणि मानवतावाद आहे.

**वारी आणि नैतिक अधिष्ठान**

वारीमध्ये शिस्त, संयम, त्याग आणि सहनशीलतेचं शिक्षण आपोआप मिळतं. वारीच्या काळात अनेक वारकरी नियमाने उपवास करतात, साधी राहणी ठेवतात, सेवा करतात. अनेक तरुण अल्कोहोल, तंबाखू, व्यसने सोडून या प्रवासात सहभागी होतात. एक नवीन सुरुवात करण्याचा संकल्प करतात.

वारी म्हणजे केवळ चालणं नाही, ती म्हणजे आपले दोष, अहंकार, मोह, मत्सर यांना गळून टाकण्याची प्रक्रिया आहे. विठ्ठलाचं दर्शन घेण्यापूर्वी आपलं अंतरंग शुद्ध करणं ही खरी तयारी असते. म्हणूनच वारी जीवन बदलते.

**वारी टिकली पाहिजे**

वारी ही परंपरा, श्रद्धा आणि शारीरिक आरोग्य यांचा अद्भुत संगम आहे. तिचं स्वरूप टिकवणं, वाढवणं हे प्रत्येक सुजाण नागरिकाचं कर्तव्य आहे. संत नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, चोखामेळा, बहिणाबाई, सावता माळी यांचं जीवनच वारीमय होतं. त्यांचं कार्य आजही चालू ठेवणारे अनेक वारकरी, कीर्तनकार, साधू, सेवेकरी समाजात कार्यरत आहेत. त्यांचं योगदान हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा आहे.

आज वारीवर अंधश्रद्धा किंवा जुनाट परंपरा म्हणून टीका होते. पण ही टीका करणाऱ्यांनी प्रत्यक्ष वारीत सहभागी होऊन अनुभव घ्यावा, मग समजेल झ्र वारी काय असते!

वारीच्या निमित्ताने भक्ती, विज्ञान, समता, आरोग्य, माणुसकी, एकात्मता, शिस्त, अहिंसा झ्र हे सगळे गुण एकत्र येतात. ही केवळ महाराष्ट्राची नव्हे तर भारताचीही अनोखी सांस्कृतिक देणगी आहे. शेवटी एकच....

चला वारीला, जपा माणुसकीला!

माझं स्पष्ट मत आहे की, प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी वारी केलीच पाहिजे. ती केवळ पंढरपूर दर्शनासाठी नव्हे, तर स्वतःला ओळखण्यासाठी. आपल्यातील अहंकार झटकण्यासाठी, माणसातला माणूस जागवण्यासाठी. वारी केल्यावर माणूस अधिक नम्र होतो, सहृदयी होतो, समाजाभिमुख होतो. म्हणूनच ही परंपरा विज्ञानाच्या कसोटीवरही खरी ठरते आणि अध्यात्मिक दृष्टिकोनानेही उन्नत करणारी असते. जय हरि! राम कृष्ण हरि!

-----------------

■ गजानन हरणे
समाजसेवक, वारकरी,
निर्भय बनो जन आंदोलन,
जि. प. नगर खडकी, अकोला.
९८२२९४२६२३
लेखक हे स्वत: पाच वर्षापासून पायी वारी करीत आहेत.

■ ■ ■

# युवकांनो कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवा...

आजकालचे युवक आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी पूर्णपणे विसरून गेले आहेत. आणि नको त्या फालतू छंदात वेळ वाया घालवत आहेत. त्यांना स्वतःच्या कर्तव्याची जान आणि जबाबदारीचे भान जराही राहिले नाही. आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य काय आहेत? आणि आपण सध्या काय करत आहोत? याचा त्यांना विसर पडला आहे. म्हणूनच ते भरकटत आहेत.

दारू, सिगारेट व गांजा या जीवघेण्या व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेत आहेत आणि स्वतःच मृत्यूला जवळ करत आहेत. व्यसनी तरुणांचा देश ही भारताची नवी ओळख जगासमोर आली आहे. आपल्या भारतात मिसरूड न फुटलेले अगदी पाच ते सहा वर्षांची मुले देखील व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. मग हे युवक कशाला कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवतील?

शिक्षणाच्या नावाखाली आपल्या वडिलांकडून भरपूर पैसा मागवतात मात्र तो पैसा ढाब्यावर जाऊन मौज मजा करण्यात लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून मवाली पोरांसोबत टवाळक्या करत फिरत आहेत. वाईट व्यसनाने नुसते बरबटून गेले आहेत.

खरे तर युवकांनी तरुणपणात खूप खूप शिक्षण शिकून आपले जीवन ध्येय गाठायला हवे. शिक्षणाच्या जोरावर एखादी नोकरी काबीज करायला हवी. आई-वडिलांचे, गावकऱ्यांचे व समाज बांधवांचे स्वप्न साकार करायला हवे. नंतर सामाजिक बांधिलकी म्हणून किंवा सामाजिक कर्तव्य व जबाबदारी म्हणून युवकांनी स्वतः शिक्षित होऊन इतरांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगावे, जेणेकरून ते युवक शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला प्रगतीपथावर नेऊ शकतील.

युवकांनी पर्यावरणाचे महत्त्व ओळखून काळजी घेणे हे देखील खूप महत्त्वाचे काम आहे. त्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाची सुरक्षा करण्यासाठी सतत प्रयत्नशील असायला हवे. युवकांनी समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा उभारायला हवा. समाजातील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी अटोकाट प्रयत्न करायला हवेत.

युवकांनी आपल्या कला आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी व देशासाठी करावा. युवकांनी एक जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या विकासात सक्रियपणे सहभाग नोंदवावा. युवकांनी समाजाला दिशा देण्यासाठी उत्तम नेतृत्वाची भूमिका पार पाडावी. तसेच नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा आणि समाजाला प्रेरित करावे.

गोरगरीब, वंचित, उपेक्षित व तळागाळातील युवकांच्या शिक्षणाला थोडाफार हातभार लावावा. त्यांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी. आणि त्यांना सुद्धा आपल्या बरोबरीला आणून त्यांच्या जीवनात आनंदाची व चैतन्याची मंगलमय पहाट आणावी. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावावा.? अनाथांना व वृद्धांना आश्रमात जाऊन कपडे, भेटवस्तू व अन्नदान वाटप करावे. आपल्या आई वडिलांना सुखाचे व आनंदाचे क्षण दाखवावेत. त्यांना कष्टाची कामे करू देऊ नयेत. उतारवयात त्यांची अधिक काळजी घ्यावी. पत्नीचे ऐकून त्यांना अंतर देऊ नये. त्यांची हेळसांड करू नये.

आजकाल शिकून नोकरीला लागलेले काही महाभाग पत्नीचे ऐकून आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत आहेत. त्यांना घाण घाण शिव्या देऊन घराबाहेर काढत आहेत. युवकांनो आई-वडिलांसोबत असे अमानुष प्रकार न करता, त्यांना गद्दार न होता आणि त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता न दाखवता त्यांना खूप खूप जीव लावूया, त्यांना अगदी आनंदात व मजेत ठेवून त्यांना सुखाचे दिवस दाखवूया. कारण आई-वडिलांनी आपल्यासाठी खस्ता खाऊन व प्रसंगी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला उच्च शिक्षण शिकवलेले असते. त्यांच्या जीवावरच तर आपला उच्च शिक्षणाचा डोलारा उभा असतो. हे आपण कधीच विसरता कामा नये. त्यांनी कष्ट करून आपल्या शिक्षणाला पैसा लावलेला असतो. आपण नोकरीला लागेपर्यंत त्यांना एकदिवस सुध्दा सुखाची झोप लागत नसते. मग आपण आई-वडिलांना सुखात ठेवणे व म्हातारपणात त्यांचे योग्य पालन पोषण करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी असते. हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवायला हवे.

आजकाल नोकरीला लागलेले युवक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी विसरून, आई-वडिलांना गावी ठेवून नोकरीच्या ठिकाणी स्थायिक होतात आणि तिकडेच पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. तिकडच्याच दुनियेत बायको लेकरांसोबत रममान होतात. समाज बांधवांना व आई-वडिलांना मदत करायची असते हे विसरून जातात. नेमके हेच डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित नव्हते.

डॉ. बाबासाहेब म्हणायचे की, लावलेला एक दिवा हजारो दिव्यांना प्रज्वलित करू शकतो. म्हणजे एक नोकरीला लागलेला समाज बांधव आपल्या हजारो बांधवांना आपल्या बरोबरीला आणू शकतो पण आजकालच्या लोकांची मानसिकता फार गढूळ झाली आहे. त्यांना वाटत आहे की, माझ्यासारखा उच्चपदस्थ अधिकारी दुसरा कोणीच होऊ नये, समाजात मलाच अधिक मान मिळावा, मीच भरपूर पैसा व संपत्ती कमवावी आणि इतरांनी फक्त माज्याकडे बघत राहावे. साहेब, साहेब करत माज्या मागे पुढे फिरावे असे आजकालच्या नोकरदारांना वाटते.

आजकालचे नोकरदार स्वार्थी व मतलबी झाले आहेत. त्यांना फक्त आपलेच भले व्हावे वाटत आहे. आणि इतरांचे वाटोळे व्हावे वाटत आहे. आपल्या महापुरुषांनी जर स्वतःचा स्वार्थ पाहिला असता तर ते आज खूप श्रीमंत झाले असते पण आज आपण कुठे असतो? कोणाच्या तरी दावणीलाच बांधलेले गुलाम असतो ना...याचा एकदा विचार करून बघा.

आपले महामानव स्वतः शिकले, मोठे झाले आणि समाजालाही मोठे केले आणि आपल्यालाही खूप खूप शिकून मोठे व्हा आणि आपल्याबरोबर समाज बांधवांनाही मोठे करा असे सांगून गेले. मग माझा आजच्या नोकरदारांना प्रश्न आहे की, आपण नोकरीला लागल्यावर किती लोकांना आपल्या बरोबरीला आणले? किती समाज बांधवांचा उद्धार केला? महापुरुषांच्या नावाचा डंका आजही संपूर्ण जगभर गाजत आहे. हे केवळ त्यांनी केलेल्या कार्यामुळेच! हे आजच्या नोकरदारांनी मनोमन ध्यानात ठेवावे.

आज या महापुरुषांना जाऊन कित्येक वर्षे झाली आहेत, तरी हे महामानव अख्या जगाच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आपण देखील स्वतःबरोबरच समाजाचा आणि देशाचा विचार केला तर नक्कीच आपण देखील मेल्यानंतर सुध्दा लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहाल. कारण बांधवांनो मेल्यावर आपल्याला काहीच सोबत घेऊन जायचे नाही, जसे रिकाम्या हाताने आलोय तसेच एकदिवस रिकाम्या हातानेच जावे लागणार आहे... म्हणून जीवनात असे काहीतरी ऐतिहासिक व अलौकिक कार्य करा की, मेल्यानंतरही तुमचे नाव एक चांगला व्यक्ती म्हणून पंचक्रोशीत आदराने निघत राहील...

--------------

■ बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे
खंडाळी, ता.अहमदपूर. जि. लातूर.
7498715661

■ ■ ■

# कृषी हीच नवी करिअर क्रांती
## एआय आणि स्टार्टअप्सच्या युगात नवा दृष्टिकोन

१२ वी नंतर उएल, खएए आणि ठएएल यांचे निकाल लागलेत. अनेक विद्यार्थ्यांनी आपापले लक्ष्य ठरवले आहे, तर काही अजूनही विचारात आहेत.. पुढे काय? इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट या पारंपरिक मार्गापेक्षा वेगळा आणि सशक्त पर्याय म्हणजे कृषी क्षेत्र. होय! कृषी आता केवळ शेतात राबणं एवढंच उरलेलं नाही; हे क्षेत्र आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन आणि उद्योजकतेच्या संधींनी भरलेलं आहे.



ऋषिकेश गजानन कोकाटे
पुणे.

**कृषी क्षेत्र का निवडावे?**

भारत हा कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रसारख्या राज्यात तर कृषी हा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा केंद्रबिंदू आहे. बदलत्या हवामान, जागतिकीकरण आणि अन्न सुरक्षा या पार्श्वभूमीवर सक्षम, तंत्रस्नेही आणि दूरदृष्टी असलेल्या कृषी व्यावसायिकांची मोठी गरज आहे.

**१२ वी नंतर कृषी क्षेत्रातील अभ्यासक्रमः**

१. B.Sc. Agriculture **(कृषी पदवी) :**

**४ वर्षांचा अभ्यासक्रम:**

हा अभ्यासक्रम शेती विज्ञान, मृदविज्ञान, बियाणे तंत्रज्ञान, पिक उत्पादन, कृषी अर्थशास्त्र, कीड व्यवस्थापन, सिंचन व जलसंधारण, अन्न प्रक्रिया आदी विषय शिकवतो.

२. B.Sc. Horticulture / Forestry / Animal Husbandry / Dairy Technology / Agri-Biotechnology :

शेतीची विविध रूपं आणि शाखा समजून घेण्यासाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त आहेत.

**३. डिप्लोमा कोसेर्स :**

१२ वी नंतर थोड्या कालावधीचे (१-२ वर्ष) अभ्यासक्रम झ्र कृषी पत्रकारिता, कृषी विपणन, अन्न प्रक्रिया, शेती यंत्रसामग्री, ऑर्गेनिक फार्मिंग

४. B.Tech in Agricultural Engineering:

हे इंजिनिअरिंग आणि शेतीचे संयोजन आहे. सिंचन, यंत्रसामग्री, तंत्रज्ञान यावर भर दिला जातो.

पुढील संधी आणि करिअर मार्ग :

१. सरकारी नोकऱ्या (MPSC, IBPS-AFO, कृषि अधिकारी) :

शासन दरबारी कृषी पदवीधारकांना अनेक संधी आहेत. तालुका कृषी अधिकारी, कृषी विस्तार अधिकारी, बँकांमध्ये कृषी अधिकारी इत्यादी.

२. कृषी संशोधन आणि शिक्षणः

M.Sc. Agriculture U Ph.D. ICAR, कृषि विद्यापीठे, KVKs यामध्ये संशोधक व प्राध्यापक म्हणून काम करता येते.

**३. उद्योजकता**

(Agri-Entrepreneurship):

सेंद्रिय शेती, हरितगृह शेती, अन्न प्रक्रिया यामध्ये स्वतःचा व्यवसाय सुरू करता येतो. शासनाकडून अनुदान, कर्ज आणि प्रशिक्षणही उपलब्ध असते.

४. कृषी स्टार्टअप्स आणि Agri-Tech:

ड्रोन टेक्नॉलॉजी, IoT आधारित शेती, e-Mandi, कृषी डेटा अ?नालिटिक्स, ॲप आधारित सेवा यामध्ये आधुनिक स्टार्टअप्स उभे करता येतात.

**५. खाजगी क्षेत्रात संधी :**

बी-बियाणे कंपन्या, अन्न प्रक्रिया उद्योग, खत-किटकनाशके उत्पादक कंपन्या, बँका, विमा कंपन्यांमध्ये कृषी सल्लागार, फील्ड ऑफिसर इ. पदांवर काम करता येते.

**कृषी हे भविष्य घडवणारे क्षेत्र!**

कृषी म्हणजे फक्त शेतात नांगर चालवणं नव्हे, तर एक शाश्वत, विज्ञानाधिष्ठित आणि उद्योजकीय क्षेत्र आहे. जागतिक लोकसंख्या वाढ, अन्न सुरक्षा, हवामान बदल, पाण्याचे दुर्भिक्ष्य हे मुद्दे लक्षात घेतले, तर कृषी हीच 'फ्युचर इंडस्ट्री' आहे.

या क्षेत्रात काम करताना तुम्ही समाज, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था या तिन्ही पातळ्यांवर सकारात्मक प्रभाव पाडू शकता. त्यामुळे कृषी क्षेत्र हे केवळ करिअर नव्हे, तर एक जीवनधर्म ठरू शकतो.

**आधुनिक शेतीकडे वळावे**

**नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने क्रांती घडवावी**

आजच्या पिढीतील कृषी पदवीधरांनी केवळ खासगी कृषी कंपन्यांमध्ये नोकरी करण्यापुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या ज्ञानाचा खरा उपयोग हा स्वतःच्या शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादनक्षमता वाढवण्यात, अन्नप्रक्रिया उद्योग सुरू करण्यात, किंवा कृषी स्टार्टअप्स उभारण्यात आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), ड्रोन टेक्नॉलॉजी, स्मार्ट सेंसर्स, IoT बेस्ड सिंचन प्रणाली, मृदा आरोग्य विश्लेषण, कृषी डेटा अ?नालिटिक्स इत्यादी अत्याधुनिक साधनांचा उपयोग करून शेती अधिक शास्त्रीय, अचूक आणि नफ्याची करता येते. कृषी पदवीधारकांनी जॉब सीकर न राहता जॉब क्रिएटर बनण्याचे ध्येय ठेवले पाहिजे.

ग्रामीण भागात कृषी-आधारित स्टार्टअप्स उभे राहिल्यास केवळ स्वतःचं भवितव्य नाही तर इतर शेतकऱ्यांनाही नव्याची दिशा मिळेल. त्यामुळे कृषी पदवीधर हे ग्रामीण परिवर्तनाचे खरे शिल्पकार ठरू शकतात.

जिथे माती आहे, तिथे संपत्ती आहे;
जिथे बी आहे, तिथे भविष्यातील बीज आहे!

आजचा तरुण विचारशील आहे. तो केवळ नोकर नको म्हणतोय, तर निमार्ता व्हायचं ठरवत आहे. कृषी क्षेत्र त्यासाठी सर्वोत्तम व्यासपीठ देऊ शकतं.

■ ■ ■

**: लेखक परिचय :**

ऋषिकेश गजानन कोकाटे हे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर, ताथवडे, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक (कृषी विभाग) म्हणून कार्यरत आहेत. ते कृषी सुवर्णपदक विजेते असून, निंदण व्यवस्थापन (Weed MaQagement) या क्षेत्रात त्यांचे विशेष संशोधन आहे. त्यांनी आपल्या कार्यकाळात Emerging Scientist Award, राष्ट्रीय प्रतिष्ठा पुरस्कार, डॉ. एम. एस. स्वामिनाथन पुरस्कार, तसेच oung Researcher Award या राष्ट्रीय पातळीवरील मान्यतांचा सन्मान मिळवला आहे. कृषी शिक्षणासोबतच, ते विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन करत असून, आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि कृषी उद्योजकतेकडे विद्यार्थ्यांनी वळावे यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत.

# आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धमार्ची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले.

हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

**वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!**

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ■ ■ ■

# तुम्ही पण अशीच चपाती भाजता का? वाढेल कॅन्सरचा धोका.. बदला सवय..



भारतातील प्रत्येक घरात दररोज चपाती ही शक्यतो खाल्लीच जाते. चपात्या किंवा फुलके बनवण्यासाठी बऱ्याच घरात एक पद्धत वापरली जाते ती म्हणजे चपाती तव्यावर अर्धी भाजायची आणि नंतर थेट गॅसच्या आचेवर ठेवून ती फुगवणे. फुललेल्या चपात्या किंवा रोटी खायलाही गरम गरम छान लागतात. पण तुम्हाला हे जाणूव आश्चर्य वाटेल की चपाती भाजण्याची ही पद्धत कॅन्सरचा धोका वाढवू शकते. नक्की कोणत्या अशा चपाती भाजण्याच्या पद्धती आहेत ज्यामुळे कॅन्सर होण्याचे धोके असतात.

काही संशोधनातून असे दिसून आले आहे की उच्च तापमानावर रोटी भाजल्याने काही हानिकारक रसायने तयार होतात, जसे की HCA (हेटेरोसायक्लिक अमाइन्स) आणि ढअलृ (पॉलीसायक्लिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स), ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो.

एनव्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार नैसर्गिक वायूच्या चुली कार्बन मोनोऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड सारखे धोकादायक वायू आणि WHO च्या मानकांपेक्षा जास्त सूक्ष्म कण उत्सर्जित करतात. या वायूंचा श्वसनाचे आजार , हृदयरोग आणि कर्करोग यासारख्या समस्यांशी संबंध असू शकतो .

पोषण आणि कर्करोग या दुसऱ्या अभ्यासात असे म्हटले आहे की उच्च तापमानावर स्वयंपाक केल्याने कर्करोग निर्माण करणारी रसायने तयार होऊ शकतात.

थेट आगीवर स्वयंपाक करणे कर्करोगाशी जोडले जाऊ शकत नाही. निश्चितच काही रसायने डीएनएला नुकसान पोहोचवू शकतात, परंतु शरीरात स्वतःला बरे करण्याची क्षमता असते. जर कोणी असे अन्न जास्त काळ खाल्ले तरच त्याचा परिणाम होऊ शकतो. ते अधूनमधून खाल्ल्याने कोणतेही मोठे नुकसान होत नाही.

एचसीए, पीएएच आणि ॲक्रिलामाइड सारखी रसायने विशेषतः जेव्हा स्टार्च आणि मांस शिजवले जातात तेव्हा तयार होतात. त्यांचा कर्करोगाशी थेट संबंध नाही, परंतु खबरदारी म्हणून आपण कोळशावर किंवा गावच्या जन्या पद्धतींच्या चुलींवर स्वयंपाक करणे टाळले पाहिजे.

बहुतेक लोक भाकरी किंवा चपाती तव्यावर कमी आणि जास्त वेळ थेट गॅसवर ठेवून भाजतात. असे केल्याने चपाती आतून कच्ची राहते. कच्ची चपाती खाल्ल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवू शकतात.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### कॉन्ट्रॅक्ट भरती

मजुरांचे होते आर्थिक शोषण
कॉन्ट्रॅक्टर घेतो कापून कमिशन
सेवेची नसते मुळीच शाश्वती
लटकती तलवार डोक्यावरती..

कॉन्ट्रॅक्ट बेसवर केली भरती
शासनाला नसते धास्ती
आधी काम मग दाम
शेवटी भाऊ रामराम..


हमारी मांगे पुरी कर लो
कदाचित शासन कदरले
म्हणुन कॉन्ट्रॅक्ट भरतीला
झुकते माप असावे दिले.. !

## उबाठा सेनेची अगतिकता...

# कोणी युती करताय का युती?

एकनाथ शिंदे यांनी तीन वर्षांपूर्वी बंडाचा झेंडा फडकवल्यापासून उबाठा सेनेची सतत घसरण व अधोगती बघायला मिळत आहे. राहुल गांधी व शरद पवार यांच्या मदतीने उद्धव ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळवले. पण अडीच वर्षांतच त्यांना एककल्ली वागणुकीमुळे सर्वोच्चपदावरून पायउतार व्हावे लागले. राज्याची सत्ता गेली. पक्षाचे नाव, चिन्हही गेले आणि देशातील सर्वांत श्रीमंत असलेल्या मुंबई महापालिकेतील सत्तेलाही ग्रहण लागले. मुंबई महापालिकेवर अविभाजित शिवसेनेने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईने पंचवीस-तीस वर्षे सत्ता उपभोगली. पण शिवसेनाप्रमुखांच्या हयातीनंतर पक्षाला मोठी गळती लागली. चार महिन्यांवर राज्यात महापालिका, जिपच्या निवडणुका अपेक्षित आहेत. वाट्टेल ते करून मुंबई महापालिकेची सत्ता कशी मिळवायची, या प्रश्नाने उबाठा सेनेतील नेत्यांची व पक्षप्रमुखांची झोप उडाली आहे. उबाठा सेनेतील बहुतेक सर्व दिग्गज नेते शिवसेनेत किंवा भाजपात गेले आहेत. शिल्लक सेनेला बरोबर घेऊन पुन्हा सत्ता मिळवता येणार नाही, याची उद्धव ठाकरे यांना पूर्ण जाणीव आहे, म्हणूनच राज ठाकरे यांच्या मनसेने महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेशी युती करावी म्हणून त्यांना आळवणी करण्याची पाळी उद्धव यांच्यावर आली आहे.

गेले दोन-तीन महिने उबाठा सेनेकडून मनसेचे लक्ष वेधण्यासाठी सतत प्रयत्न केले जात आहेत. उबाठा सेनेच्या मुखपत्रातून उद्धव व राज एकत्र असलेले छायाचित्र प्रसिद्ध करून जणू दोघे बंधू आता मनाने एकत्र आलेले आहेत, अशी हूल उठविण्यात आली. राज ठाकरे यांनी वेगळा पक्ष स्थापन केल्यापासून कधी नव्हे ते उद्धव यांना त्यांची राजकीय गरज भासू लागली आहे. उबाठा सेनेच्या सैनिकांनाही उद्धव - राज एकत्र येणार, म्हणून पक्षातून मधाचे बोट लावण्यात आले आहे. दि. १९ जूनला शिवसेना पक्षाचे दोन वर्धापन दिन मुंबईत साजरे झाले. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा वर्धापन दिन शीव येथील षण्मुखानंद सभागृहात, तर एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा वरळी डोममध्ये साजरा झाला. या दोन्ही मेळाव्यात मनसेची संभाव्य युती हा कळीचा मुद्दा राहिला. महापालिका निवडणुकीत राज ठाकरे कुणाबरोबर जाणार की स्वबळावरच लढणार? हे अद्याप गूढ आहे. ते स्वत: या विषयावर काहीच बोलत नाहीत. पण युतीचा मुद्दा निघाला की त्यांचे शिलेदार इतकी वर्षे उद्धव ठाकरे यांनी मनसेला कशी वागणूक दिली असा प्रश्न विचारून अनेक उदाहरणांचा पाढा उगाळतात. उबाठा सेना व मनसे यांच्या युतीच्या चर्चेला उधाण आले असतानाच मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई पश्चिम उपनगरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये भेट घेतली आणि उबाठा सेनेबरोबर युतीच्या चर्चेला तडा गेला. षण्मुखानंद सभागृहातील मेळव्यात उद्धव ठाकरे यांनी मनसेबरोबर युतीच्या मुद्द्यावर बोलताना जे महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आहे, तेच होईल असे वक्तव्य केले. या विषयावर निर्णय घेण्यास आम्ही सक्षम आहोत, इतरांनी त्याची चिंता करू नये, असेही त्यांनी बोलून दाखवले. उबाठा सेना व मनसे युतीविषयी भाजपाचे नेते बोलताना, दोन्ही भाऊ एकत्र येत असतील तर ते चांगलेच आहे, अशी भूमिका मांडताना दिसतात. पण त्यांना नक्की ठाऊक आहे, हे दोघे बंधू एकत्र येण्याची शक्यता कमी आहे. उद्धव यांच्याकडून राज ठाकरे एकदा नव्हे तर अनेकदा कमालीचे दुखावले गेले आहेत, हे त्यांना कधीही विसरता येणार नाही. अविभाजित शिवसेनेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असताना पक्षात राज यांचे महत्त्व वाढता कामा नये, याची दक्षता उद्धव यांनी नेहमीच घेतली होती. निर्णय प्रक्रियेत राज यांना डावलण्यात येत होते. उमेदवार निवडताना राज यांच्या शिफारसीला किमत दिली जात नव्हती. राज यांनी स्वत:चा वेगळा राजकीय पक्ष स्थापन केला, त्यामागे अनेक कारणे आहेत. पण उद्धव यांनी आपल्या भावाची कदर कधीच केली नाही. राज ठाकरे यांनी आपला स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यापासून उद्धव व राज यांच्यात कधीच सुमधुर संबंध नाहीत. एवढेच नव्हे तर शिवसेनाप्रमुख हयात असताही ते नव्हते. उद्धव यांनी पक्षात सर्वकाही हातात घेतल्यापासून दोघा भावांमध्ये दुरावा आहे. शिवसेनाप्रमुखांच्या अंत्ययात्रेतही राज यांना अवमानकारक वागणूक मिळाली होती हे कसे विसरता येईल?



महाराष्ट्रनामा

सुकृत खांडेकर

०९५९४२२४०००

sukritforyou@gmail.com

उबाठा सेनेला युतीसाठी घाई झाली असली तरी मध्यस्थ कोण आहे, एवढा परिपक्व, विश्वासू व दोघांनाही मान्य होईल असा नेता दोन्ही पक्षांत नाही. युती झाली तर बॉस कोण? जागा वाटप कसे होणार? दोघांची मदार मराठी मतांवर. मग माघार कोण घेणार? गेल्या वीस वर्षांत दोन्ही पक्षांत नवीन नेतृत्व निर्माण झालेले नाही. दोन्ही पक्षप्रमुख हेच दोन्ही पक्षांत सुप्रीम आहेत व त्यांच्याभोवतीच सारा पक्ष फिरताना दिसतो आहे. जरी दोन्ही पक्ष युती करायला तयार झाले तरी भाजपा त्यांना एकत्र येऊ देईल का? हा सर्वांत मोठा व कळीचा मुद्दा आहे.

राज्यात व केंद्रात भाजपा सत्तेवर आल्यापासून मराठी माणसाची अवस्था वाईट झाली आहे. मराठी माणूस, मराठी भाषा व मराठी अस्मिता यांची गळचेपी चालू आहे. महाराष्ट्राला अवमानास्पद वागणूक मिळत आहे म्हणून मराठी माणसासाठी व महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव व राज यांनी एकत्र यावे अशी भावनिक मोहीम चालवली जात आहे. आमच्या वादांपेक्षा मराठी माणूस व महाराष्ट्र हित मोठे आहे असेही उबाठा सेनेने आवाहन केले आहे. ठाकरे बंधूच मराठी माणसाला वाचवू शकतील असे सांगण्यात आहे. पण या भावनिक जाळ्यात मनसे अडकणार नाही किंवा मनसेची तशी मानसिकता नाही असे आजचे तरी चित्र आहे.

मनसेबरोबर युती व्हावी यासाठी उबाठा सेना अगतिक झाली आहे. उबाठा सेनेला खूप घाई झाली आहे. एकनाथ शिंदे यांच्यात शब्दांत सांगायचे तर उबाठा सेना लाचार झाली आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार म्हणून राज्यात काही ठिकाणी पोस्टर्सही झळकले. मनसे सैनिकांच्या बरोबर उबाठा सेनेच्या सैनिकांच्या भेटी-गाठी वाढल्या आहेत. मनसे नेते भेटल्यावर उबाठा सेनेचे पदाधिकारी गळाभेटी घेत आहेत. पण हे सर्व एकतर्फी चालू आहे असे दिसते. एकीकडे भाजपा हा महाराष्ट्र व मराठी विरोधी आहे असे चित्र निर्माण करायचे व दुसरीकडे मराठी माणसाला वाचविण्यासाठी ठाकरे बंधूंनी युती करणे गरजेचे आहे असे सांगायचे अशी दुहेरी प्रचार मोहीम उबाठा सेनेकडून चालू आहे. मात्र उबाठा सेनेच्या आवाहनाला मनसेचा प्रतिसाद थंड आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई - विरार, मीरा - भाईंदर, अंबरनाथ तसेच पुणे, पिंपरी - चिंचवड, छ. संभाजी नगर, नाशिक अशा प्रमुख महापालिकांमध्ये मराठी मतांचे विभाजन होऊ नये यासाठी उबाठा सेना मनसेला बरोबर घेण्यासाठी उतावीळ झाली आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना, उद्धव ठाकरे यांची उबाठा सेना आणि राज ठाकरे यांची मनसे असे तिन्ही पक्षांत मराठी मताचे विभाजन झाले, तर उबाठा सेनेचे सर्वाधिक नुकसान होणार आहे. भाजपा, काँग्रेसकडेही मराठी मतांचा टक्का आहे हे विसरून चालणार नाही. मराठी मतदारांची एकगठ्ठा मते एकाच पक्षाकडे अशी स्थिती नाही. भाजपाला मराठी मतांबरोबरच अमराठी मतांचा मोठा लाभ मिळतो ही या पक्षाची मोठी जमेची बाजू आहे. राज ठाकरे यांच्या संपर्कात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जसे आहेत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीयमंत्री व खासदार नारायण राणे, भाजपाचे अनेक नेते नियमित असतात. तसे उबाठा सेनेतून राज यांच्या संपर्कात उघडपणे कोण असते? आता महापालिका निवडणुकीसाठी उबाठा सेनेला एकदम राज ठाकरे यांच्या पक्षाची गरज भासू लागली यामध्ये स्वार्थाशिवाय दुसरे काय असू शकते

सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे काँग्रेसबरोबर गेले, मुख्यमंत्री झाले. तेव्हा निर्णय घेताना त्यांनी मतदारांना, पक्षातील पदाधिकाऱ्यांना किंवा शिवसैनिकांना कोणाला विश्वासात घेतले होते? तेव्हा मतदारांना विचारले होते का? तेव्हा राज ठाकरे यांना बोलावून चर्चा केली होती का, मनसेला काय वाटते अशी विचारणा केली होती का? शिवसेना पक्ष व चिन्ह हातातून गेले. फूट पडली. जेमतेम २० आमदार निवडून आले म्हणून उद्धव यांना राज यांची आठवण होते आहे का? चारच महिन्यांपूर्वी मनसेच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनाप्रमुखांचे फोटो लावले म्हणून उबाठा सेनेच्या नेत्यांनी व प्रवक्त्यांनी आक्षेप घेतला होता, मग आता एकदम मनसेची उबाठा सेनेला उचकी का लागते आहे? खरी शिवसेना कोणती हे एकनाथ शिंदे यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दाखवून दिले आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुन्हा एकदा मुंबईत येऊन ठणकावून सांगितले, यातच उबाठा सेनेने आपले भविष्य काय आहे हे समजून घ्यावे... कम ऑन किल मी... असे आवेशात आव्हान द्यायचे, अंगावर यायचे तर येताना ॲम्ब्युलन्स घेऊन या असे सांगताना, जाताना आडवे होऊन जाल अशी भाषा वापरायची, मग एवढी ताकद आहे, तर मनसेने युती करावी यासाठी अगतिकता कशासाठी? ७६ हजार कोटींचे बजेट असलेल्या मुंबई महापालिकेची निवडणूक ही उबाठा सेनेच्या अस्तित्वाची लढाई आहे म्हणूनच कोणी युती करताय का युती? असे विचारण्याची पाळी आली आहे...

## अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वानाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या हृदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावात त्यांचा झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भगवानराव तर आईचे नाव सोनाबाई असे होते. त्यांना दोन मोठे भाऊ होते. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई भाऊही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जनमलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल - उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. जून रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंड देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

श्याम बसप्पा ठाणेदार

दौंड जिल्हा पुणे

९९२२५४६२९५



## राशीभविष्य

**मेष :** आज चांगल्या कामात अडथळे येऊ शकतील. पण थोडे प्रयत्न केल्यास परिस्थिती अनुकूल होऊ लागेल. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. पूर्वी प्रलंबित असलेले काही काम पूर्ण होतील.

**वृषभ :** आजचा दिवस चढ-उतारांनी भरलेला असेल. पूर्ण होत आलेल्या कामात बरेच अडथळे येतील. पण हळूहळू परिस्थिती अनुकूल होईल. तुमच्या भावनांना योग्य दिशा द्या. गायन क्षेत्रात सक्रियता वाढेल.

**मिथुन :** काही व्यावसायिक सहकार्यामुळे तुमच्या व्यवसायाला गती मिळेल. तुम्हाला तुमच्या वडिलांकडून पाठिंबा आणि साथ मिळेल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल.

**कर्क :** आज दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक धावपळ होईल. तुम्हाला सामाजिक कार्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी मिळेल.

**सिंह :** एखाद्या काही महत्त्वाच्या कामात अनावश्यक विलंब होऊ शकतो. तुम्ही व्यवसायात अत्यंत व्यस्त राहाल. सामाजिक कामात तुमची भूमिका महत्त्वाची असेल. प्रकृतीकडे लक्ष पुरविणे गरजेचे आहे

**कन्या :** कोणत्याही वादात पडू नका. अन्यथा तुम्ही अनावश्यक समस्यांमध्ये अडकू शकता. वाईट सवयी सोडून द्या. प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमाने काम करा. यश नक्की मिळेल.

**तुळ :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना नोकर, वाहन इत्यादी सुविधा मिळतील. आज बँकेत जमा असलेल्या भांडवलाची रक्कम वाढेल. खूप महत्त्वाचे काम यशस्वी होईल.

**वृश्चिक :** नातेवाईकांशी परस्पर मतभेद निर्माण होऊ शकतात. धार्मिक कार्यात रस वाढेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील. व्यवसायातील तुमच्या समजूतदारपणामुळे मोठ्या नुकसानापासून वाचाल.

**धनु :** विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील अडथळे दूर होतील. तुम्हाला व्यावसायिक मित्राचा पाठिंबा आणि संगत मिळेल. चित्रकला कामात सहभागी असलेल्या लोकांना लक्षणीय यश आणि आदर मिळेल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी नफा आणि प्रगतीचा असेल. तुम्ही आधीच नियोजित केलेल्या कामांमध्ये यशस्वी व्हाल. विरोधकांपासून सावध रहा. तुमच्या योजना उघड करू नका.

**कुंभ :** व्यवसायात तुम्हाला कुटुंबातील सदस्याचा पाठिंबा आणि साथ मिळेल. नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडे तिकडे भटकंती करावी लागेल. तुम्हाला शारीरिक श्रम करावे लागू शकतात.

**मीन :** सामाजिक कार्यात रस वाढेल. तुमचे वर्तन लवचिक बनवण्याचा प्रयत्न करा. कामाच्या ठिकाणी गोंधळ निर्माण होऊ देऊ नका. जमीन, इमारत, वाहन यांच्याशी संबंधित कामात तुम्हाला अधिक रस असेल.

## मुलाखत : जलक्षेत्रातील तांत्रिकतेच्या बाबत सुज्ञ असणे आवश्यक

आज महाराष्ट्र राज्य भीषण दुष्काळाच्या उंबरठ्यावर आहे किंबहुना आपण अगोदरच नो रिटर्न मर्यादा ओलांडली आहे. महाराष्ट्र दुष्काळमुक्त व्हायला हवा या दृष्टीने अनेकजण प्रयत्न करत आहेत. परंतु तरीसुद्धा जलसाक्षरता दृष्टीने आपण बाल्यावस्थेतच आहोत. तज्ञ, प्रशासन आणि लोकसहभाग यात कधी नव्हे एवढी मोठी दरी निर्माण झाली आहे. या सगळ्यात दुष्काळमुक्तीसाठी झटणारे म्हणून जे कोणी भूजल वैज्ञानिक आहेत यात सुरेश खानापूरकर, उपेंद्रदादा धोंडे अशी मोजकीच नावे आढळतात. यावितिरिक्त महाराष्ट्रात केंद्रीय भूजल विभाग आणि भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा मधील भूजल वैज्ञानिक आणि काही खाजगी भूजल वैज्ञानिक सातत्याने प्रयत्नरत आहेतही परंतु ते कदाचित कायदे-नियमांच्या बंधनांमुळे प्रसिद्धीझोतात नसतात. महाराष्ट्राचे जलक्षेत्र अनेक सेलिब्रिटी आणि काही प्रसिद्ध जल महापुरुष वगैरे लोकांनीच व्यापलेले दिसते. मुळात महाराष्ट्राचे जलधोरण म्हणून आपण कुठे चुकत आहोत का? याचे आत्मपरीक्षण होत आहे असे काही दिसत नाही. या सगळ्या परिस्थितीकडे भूजल वैज्ञानिक म्हणून आपण कसे पाहतो या विषयावर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भूजल वैज्ञानिक उपेंद्रदादा धोंडे यांच्याशी केलेली ही चर्चा.

**१. महाराष्ट्र गेल्यावर्षी मुबलक पाऊस पडून देखील या उन्हाळ्यात ग्रामीण व शहरी भागात पाण्याची वानवाच का ?**

ज्या प्रमाणामध्ये पावसाच्या पाण्याचे भूजलात रूपांतर व्हायला हवे त्या प्रमाणात ते होत नाही. कारण आपले प्रयत्न तांत्रिक दृष्टीने योग्य नाहीत. महाराष्ट्राची जल निरक्षरता हे खरं तर एक मोठे आव्हान आहे. महाराष्ट्रातील जलक्षेत्रात स्वयंघोषित खड्डेखोरांनी धुमाकूळ माजवला आहे आणि यावर कुणाचेही नियंत्रण नाही. प्रशासन व लोकप्रतिनिधी देखील खड्डेखोरांचे समर्थन करताहेत. कुठलीही शैक्षणिक तांत्रिक पात्रता नसलेल्या लोकांना शासन समर्थन-प्रोत्साहन देत आहे. शिवाय सरकारी भूजल वैज्ञानिक देखील समोर येऊन बोलत नाहीत कारण त्यांना कुणाचीही नाराजी ओढवून घ्यायची नाही. म्हणूनच महाराष्ट्राचे जलक्षेत्र हे स्वयंभू जलतज्ञांच्या हवाली करणे हेच खरे दुष्काळाचे कारण आहे.

**२. जलतारा सारख्या प्रकल्पाबाबत आपले मत काय ? हा प्रकल्प नेमका फायदेशीर आहे का ? कसा ?**

दरवेळी कुणीतरी उठतो आणि काहीतरी संकल्पना मांडतो. सदरच्या संकल्पनेची प्रसिद्धीमाध्यमं आणि प्रशासन-लोकप्रतिनिधी मार्फत प्रसिद्धी करवून घेतो आणि लोकांना आकर्षित केले जाते. हे करत असताना तज्ञांना मात्र जाणीवपूर्वक दूर ठेवले जाते कारण ते अशा गोष्टीतला फोलपणा उघड करत असतात. दर दोन-चार वर्षांनी अशी कुठली तरी संकल्पना येते प्रसिद्ध होते आणि कालौघात विरून जाते. त्याच्या यशापयशाचे कसलेही मूल्यमापन होत नाही, अथवा कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चित केली जात नाही. उदाहरणार्थ जलतारा व शोषखड्डा यात तसा विशेष काही फरक नाही. ही संरचना फक्त उथळ जलधराला काही अंशी रिचार्ज करणारी योजना आहे. यातून दुष्काळमुक्तीचे स्वप्न पाहणे म्हणजे मूर्खपणा आहे. शोषखड्डा, मैजिक पिट ईत्यादी नावाने हि संरचना पुर्वीपासूनच आहे. परंतु ती आजवर बहूप्रचलित होऊ शकली नाही कारण त्याची मर्यादित यशस्वीता. डासमुक्त परिसरासाठी शोषखड्डा हि संकल्पना निर्माण झाली होती आणि सोबतच यात निश्चितपणे काही प्रमाणात उथळ जलधर हा खात्रीनं रिचार्ज होतो यामुळे तिला पुनर्भरण संरचना देखील मानले गेले. परंतु या संरचनेची व्याप्तीच अत्यंत मर्यादित असल्याने, अर्थात संरचनेसाठी येणारा खर्च आणि तुलनेत फायदा याचे प्रमाण व्यस्त असल्याने, याची फार काही यशस्वीता आढळली नाही त्यामुळे हि योजना तशी उपयुक्त व सुलभ असूनही लोकप्रिय होऊ शकली नाही. म्हणूनच फक्त प्रसिद्धीचा ढोल वाजवत कोणत्याही योजनेला लोकप्रिय करण्याचे तंत्र दिर्घकाळ टिकत नसते, लवकरच लोकांना त्यातला फोलपणा समजतो परंतु दुर्दैवाने तोवर लोकांचे मोठे नुकसान होऊन गेलेले असते. अर्थात जसा शासनाला जाब विचारला जातो तसा जाब या स्वयंघोषित जल महापुरुषांना विचारला जात नाही.

**३. शेतीत सिंचन व्यवस्था मजबूत करण्यासाठी जल संधारण म्हणून नेमकं काय केलं पाहिजे ? शेतकऱ्यांनी वैयक्तिक लाभासाठी काय केलं पाहिजे ?**

तज्ञांच्या सल्लयाने गावस्तरावर जल आराखडा तयार करून त्रिस्तरीय पुनर्भरणाचे नियोजन केले पाहिजे. यात वैयक्तिक पातळीवर करण्याच्या पद्धती, सामूहिक पातळीवरील उपक्रम आणि शासकीय मदतीने, अशा प्रकारे कामांचे नेमकेपणाने वर्गीकरण केले पाहिजे. सहज जलबोध अभियानात आपण हे वर्गीकरण केले आहे. याशिवाय केंद्रीय भूजल विभाग तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यामध्ये तज्ञ प्रशिक्षित भूजल वैज्ञानिक आहेत त्यांच्या तज्ञतेचा योग्य वापर केला गेला पाहिजे. जसे सामान्य माणसाला जलसंधारणासाठी भूजल वैज्ञानिकाचे महत्त्व समजले पाहिजे तसेच ते सेलिब्रिटी व लोकप्रतिनिधींना देखील कळले पाहिजे.

**४. शेततळे योजना हि महाराष्ट्रात खूप लोकप्रिय होताना दिसत आहे पण खरंच ती फायदेशीर आहे का ?**

होय, शेततळे हे निश्चित उपयुक्त आहे पण जर ते भूजलाचा उपसा करून भरले जात असेल तर मात्र ते मोठ्या प्रमाणात धोकेदायक ठरते. कोणत्याही पाणलोटात एका निश्चित संख्येपेक्षा जास्त शेततळी करणे धोकेदायक आहे. शेततळ्यापेक्षाही अधिक उपयुक्त असलेले पाझर तलाव दिवसेंदिवस नष्ट होत आहेत यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी आपल्या हद्दीत लहान आकाराचे पाझर तलाव ज्याला आम्ही भैरव कुंड असे नाव दिले आहे अशा प्रकारचे लहान लहान तलाव निर्माण केले पाहिजेत तेच खऱ्या अर्थाने परिसराला दुष्काळमुक्त करू शकतात. या विषयावर अधिक माहितीसाठी लोकांनी प्रशिक्षित भूजल वैज्ञानिकास संपर्क साधला पाहिजे.

**५. सरकारी भूजल वैज्ञानिक म्हणून तुमचे पुढील जलक्षेत्रातील उद्दिष्ट काय ? महाराष्ट्रातील जलक्षेत्रासाठी तुम्ही काय उपाय सांगाल ?**

केंद्रीय भूजल विभागाची काम करण्याची निश्चित पद्धती आहे. यामध्ये संशोधन आणि जलधरांचे व्यवस्थापन मोजमाप या गोष्टी महत्त्वाच्या असतात. परंतु केंद्रीय भूजल विभागाच्या मार्फत उपभोक्त्यांसाठी थेट योजना नसतात. थोडक्यात केंद्रीय भूजल विभागाचे काम म्हणजे राज्याच्या जलधरांची नेमकी स्थिती सांगणे आणि त्यावर उपाय सुचवणे हे आहे. खरंतर राज्य सरकारांनी कोणत्याही प्रकारची जलसंधारण योजना राबविण्यापूर्वी केंद्रीय भूजल विभागाचा, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा या विभागातील तज्ञ भूजल वैज्ञानिकांचा सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे. केंद्रीय भूजल विभागाच्या ध्येयधोरणांचा, तांत्रिक माहितीचा लोकांना अधिकाधिक परिचय व्हावा आणि महाराष्ट्राच्या जलसाक्षरतेसाठी त्याचा फायदा व्हावा यासाठी आपल्या कूवतीनुसार जास्तीत जास्त प्रयत्न करणे प्रत्येक भूजल वैज्ञानिकाचे कर्तव्य आहे ते मी माझ्या परीने पार पाडत राहीलच. या सोबतच मी विषयतज्ञ म्हणून आणि सहज जलबोध अभियानाची भुमिका म्हणून लोकांपर्यंत जलक्षेत्रातील तांत्रिकता नेमकेपणाने पोहोचविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करील.

**मयुर बाळकृष्ण बागुल.**

**राज्य समन्वयक सहज जलबोध अभियान, महाराष्ट्र**

**चलभाषा ९०९६२१०६६९**

## ज्याठिकाणी श्रद्धा विश्वास आस्था असेल त्याठिकाणी मार्ग मिळतो : आचार्यश्री सुवीरसागरजी गुरुदेव

**नागपूर, २१ जून :** ज्याठिकाणी श्रद्धा, विश्वास, आस्था असेल त्याठिकाणी मार्ग मिळतो असे उदबोधन जैन आचार्यश्री सुवीरसागरजी गुरुदेवांनी बाहुबलीनगर येथील श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिराच्या वेदी शिलान्यास कार्यक्रमात दिले.

कार्यक्रमात दीप प्रज्वलन भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय महामंत्री संतोष जैन पेंढारी, श्री पार्श्वोदय तीर्थ नागठाणाचे अध्यक्ष डॉ. अरविंद भागवतकर, दिलीप राखे, सतीश जैन पेंढारी, पवन कान्हीवाडा, राकेश पाटणी, पंकज बोहरा, जितेंद्र तोरावत, किशोर मेंढे, हुकुमचंद सेठी, उल्हास क्षीरसागर, अशोक लाड, नितीन महाजन, अरुण पाटोदी, सुनील जैन पेंढारी, महेंद्र जैन, प्रशांत मानेकर, शशिकांत बानाईत, माजी उपमहापौर मनीषा कोठे, प्रा. उमेशचंद्र सरोदय, श्रीकांत मानेकर, सुधीर सिनगारे यांनी केले.

सकाळी जिनेंद्र भगवंताचा अभिषेक, पूजन, वास्तू विधान संपन्न झाले. शांतीधारा पदमा अरविंद कहाते यांनी केली. प्रतिष्ठाचार्य पं. संदीप जैन दौंड यांच्या मार्गदर्शनात पूजन विधी संपन्न झाला. संगीतकार शुभांगी जैन अमरावती यांनी सुमधुर आवाजात पूजनाची प्रस्तुती सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन नखाते यांनी केले. वेदीचा शिलान्यास डॉ. चंद्रनाथ जिवंधरजी भागवतकर यांनी केला. समृद्धी दर्यापूरकर, प्रमोद राखे, उल्हास जैन यांचे सहकार्य प्राप्त झाले. प्रथम कुर्म शीला जगदीश, विनोद, सोनासाव, आरती, येशू गिल्लरकर परिवाराने केली. आठ शीला डॉ. प्रांजली सावरकर, वर्षा राजेंद्र बंड, माधुरी जैन, जयंत सोईतकर, दीपिका व दिवाकर मांडवेकर, प्रकाश पळसापूरे, रिना राजेंद्र पिंजरकर, नितीन नखाते यांनी स्थापित केल्या.

नवग्रह पूजन अतिशय दीपेश जैन, आरोही सावरकर, कु. नित्या दर्यापूरकर, हर्ष भुसारी, सोहम मखे, आर्या सारंग कस्तुरे, शौर्य महात्मे, पवन दिलीप राखे, देवांश शहाकार, शर्वरी प्रमोद भागवतकर, अभिजीत जुननकर, विवान प्रणय राखे, मनस्वी मांडवगडे, आरना सागर तुपकर, समीक्षा उमेश मचाले, स्वर्णिमा जितेंद्र जैन, मिताली रोशन भुसारी, तीर्थ्या मुकेश पळसापूरे, अमूल्या अतुल येळवटकर, अधीर हितेश गडेकर यांनी पूजन केले.

आमदार कृष्णा खोपडे यांनी वेदी शिलान्यास कार्यक्रमात उपस्थित राहून आचार्यश्री सुवीरसागरजी गुरूदेवांचा आशीर्वाद घेतला आणि ते म्हणाले मंदिराचे काम पूर्ण होताच याठिकाणी एक शेड टाकून देण्यात येईल.

## आज का अंदाज

सोमवार २३ जून २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ७ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| २४५ | २४८ | १६० | २२८ | २४६ | २५८ | १६९ | ८९० |
| ५६० | ३४७ | २५० | ३७८ | ३९० | ७८० | ३३० | ७०० |
| ४८९ | ४४६ | ३४० | ४७७ | ३५७ | ३५७ | २४० | ४४९ |
| १० | ४० | ७२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७३ |
| १९ | ४९ | ७३ | ८३ | २९ | ५१ | ६४ | ७४ |
| १६ | ४६ | ७५ | ८५ | २१ | ५९ | ६३ | ७८ |


**२३ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६८ | ९८ |
| २७ | ३७ | ६४ | ९४ |
| २० | ३० | ६५ | ९५ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## शब्दकोडे क्रमांक २१४४



**आडवे शब्द :-**


१) बातमी
४) बगल
६) जाणून-बुजून, हटकून
८) अधिक महिना
१०) लिंबू, साखर पाण्याचे पेय
१२) तुकडा, चावा
१३) पिता
१४) वेदना
१५) पत्र
१७) पृथ्वी
१९) एक आदिवासी जमात
२१) कुबेराचा सेवक
२२) एकाद्याच्या वतीने घातलेली भीड
२५) हाण! मार!
२७) धपाटा
२८) ओलसर हवा
३०) मर्यादा हद्द
३२) कोलकाताचे विमानतळ
३४) बारीक -सारीक
३६) आपले राष्ट्रगीत
३९) मान्यतेचा शब्द
४०) टिंगल
४१) **** कमीज एक पोषाख
४२) सत्ता
४४) दोरा
४६) प्रामाणिक
४७) रत्न
४९) फांदी तुटतानाचा आवाज
५१) धोका
५३) साल
५६) अवघड, कडक (इं.)
५७) कमीतकमी
६०) माफ
६१) संगीतातील एक राग
६२) जोखड
६३) चामखीळ
६४) त्वरा
६५) बशीचा जोडीदार
६७) चाबूक
६९) थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
७२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
७३) दुर्गंधी येऊ लागलेला
७५) बारीक खांब
७६) युद्ध
७७) गीत
७८) दही घुसळण्याचे साधन
७९) पोलीस

**उभे शब्द :-**

१) वाळा
२) भरभराट
३) घासणे (इं)
५) दुष्ट माणूस
६) गुमान, मुकाट्याने
७) टप्प्याटप्पा घेत घेत
८) मध
९) गुरुजी
११) सिद्धता
१६) झाडाभोवतीचा कट्टा
१८) चीर, भेग, फट
१९) मंगळवेढ्यात जन्मलेली एक स्त्री संत
२०) तलवार
२३) कलंक
२४) घोडा, गाढवाची विष्ठा
२६) फूल, पुष्प
२९) अतिशय मऊ, मुलायम कापड प्रकार
३१) विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
३२) पानासकट कोवळी फांदी
३३) समुद्रकिनारा
३५) पुरुष
३७) बाज विणण्याची कापडी पट्टी
३८) नूतन
४१) नवऱ्याची दुसरी पत्नी
४३) सरसकट
४४) भीती, वचक, दरारा
४५) गवंड्याकडील दोरीचे एक साधन
४६) शर्करा
४८) मवाळ धोरण
५०) शाहीराजवळचे चर्मवाद्य
५२) जबरदस्तीने लावलेला विवाह
५४) लोकर (इं.)
५५) मध्यस्थ
५८) लज्जास्पद
५९) स्थान, जागृत
६३) अंत:करण
६६) वारा
६८) मच्छर
६९) सटवाई, दुष्ट स्त्री
७०) छोटी विश्रांती
७१) मृत्यु नसलेला
७४) हात
७६) सदोदित, नेहमी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# नव्या आशेने शेतात उतरलेल्या बळीराजाला दमदार पावसाची प्रतीक्षा



## मोठी मढीमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

### पतंजली महिला योग समिती आणि लोकजागर परिवाराच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,(दि.२२) –** येथील मोठी मढी येथील महिला योग वर्ग, माळीपुरा आणि पतंजली महिला योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. 'करो योग, रहो निरोग' या घोषवाक्याखाली योग दिनाचे आयोजन करण्यात आले. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योग हा अत्यंत महत्त्वाचा आहे. योगाच्या माध्यमातून अनेक आजारांवर नियंत्रण ठेवता येते, असे मत याप्रसंगी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन डॉ. संगीता गोविंद मेण (पतंजली महिला जिल्हा संघटन मंत्री, योग शिक्षिका – लोकजागर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मोठी मढी महिला योग साधक मैत्रिणींनी उत्साहाने आयोजनात भाग घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रांजली महेंद्र धमाले आणि मिना दिलीप अंबुलकर यांनी दीपप्रज्वलन करून केले. योग प्रोटोकॉलचे सत्र डॉ. संगीता मेण यांनी घेतले. यावेळी स्व. गोविंद मेण यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. योगसाधिका विजया अवतने यांनी एक सुंदर कविता सादर केली आणि मेण यांना भेट दिली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयाताई हरणे, उज्वला लाडोळे, वनिता चांदुरकर, निता मोगरे, अनु हिवरे, ममता गोबरे, सुषमा अडगोकार, सुनंदा अडगोकार, अस्लेषा नाथे, वंदना नाथे, शोभा थोरात, वैशाली नवले, वंदना नवले, दिपा मेण, रेखा झापर्डे, भारती लोळे, मेघा लोळे, वनीता घटाळे, अश्विनी अडगोकार, सोनु सातपुते, जयश्री झाडे, काळे काकू, ढोले, सरिता हाडोळे, अनिता सोनपरोते, निर्मला सुने, विजया अवतने, मंगला अडगोकार, प्रणीता हरणे, संध्या टाक, सविता काळे, सुभद्रा काळे, कृतिका अवतने, विजया देवळे आणि छोटे बालयोगी आर्दीनी सहभाग घेतला. कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## ■ पावसाची दांडी वाढविताहे चिंता ■

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.२२)–** निसर्गाच्या अवकृपेचा वारंवार सामना करत, बळीराजा पुन्हा नव्या आशेने आणि धीराने शेतात उतरला आहे. मृग नक्षत्र लागून आठवडा उलटूनही अजूनही दमदार पावसाची सर जमिनीवर आली नसल्याने शेतक?यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. पावसाच्या प्रतीक्षेत शेतजमिनीची मशागत, बियाण्यांची जमवाजमव व पूर्वपावसाळी कामे सुरू असतानाच उकाड्याची तीव्रता आणि बाष्पयुक्त हवामानाने बळीराजाला अधिक चिंतेत टाकले आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून असमान पावसामुळे शेतीचं गणित कोलमडले आहे. हवामान चक्र बिघडल्यामुळे पेरण्या वेळेवर होतातच असं नाही. सिंचनाच्या साधनांची वानवा असलेल्या अमरावती जिल्ह्यात बहुतांश शेतकरी अजूनही निसर्गाच्या कृपेवर अवलंबून आहेत. त्यातच बियाण्यांच्या दरात वाढ झाल्याने शेतकऱ्यांची उसनवारी वाढली आहे. रात्रंदिवस घाम गाळणारा बळीराजा, फक्त धान्य नव्हे तर संपूर्ण देशाचा पोशिंदा आहे. तरीही पावसावर असलेल्या अवलंबनामुळे दरवर्षी त्याच्या आयुष्यात नव्या संकटांची भर पडते.

यंदा तरी वरुणराजा प्रसन्न होईल, या आशेने शेतकरी देवपुजेला, नवसाला आणि मनोमन प्रार्थनेला सुरुवात केली आहे. झभरू दे यंदा मृगाचं आभाळ, नावाचा तुझ्या गजर करीना, हे साकडे त्याच्या मनात सातत्याने घुमत आहे. मान्सूनचे संकेत मिळाले असले तरी दमदार पावसाची प्रतीक्षा अद्याप अपूर्ण आहे. उशिरा येणारा पाऊस पेरण्या लांबवतो आणि नफा कमी करतो. तरीही बळीराजाचा निर्धार कमी होत नाही. अशा कठीण परिस्थितीतही तो नव्या हंगामासाठी सज्ज झाला आहे. यंदाचा खरिप हंगाम भरघोस होवो आणि बळीराजाच्या जीवनात समृद्धी येवो, हीच सर्वांची मनःपूर्वक अपेक्षा आहे.

### शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता

मृग नक्षत्र लागून आठवडा उलटला, दमदार पावसाचा अजूनही अत्तापर्यंत मागमूस नाही. बाष्पयुक्त हवामानामुळे उकाडा वाढला, आणि शेतक:यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. बियाण्यांचे वाढलेल्या दरामूळे बळीराजाची चिंता वाढवणारे ठरत आहे.



## पैशांच्या वादातून महिलेला मारहाण

**अमरावती :** पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादात एका महिलेला मारहाण करून, तिला शिविगाळ करण्यात आली. या घटनेची तक्रार महिलेने २१ जून रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी जिहान, लकी, एसान, अवेद व एका महिलेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

## निरोगी जीवनासाठी योग, व्यायाम आणि आहाराचा समतोल महत्त्वाचा : जीवन फसाटे

### मोर्शीत ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

**महासागर प्रतिनिधी**

**मोशी,(दि.२२) –** फिटनेस ही एक दीर्घकालीन आणि सातत्याने पाळण्याची प्रक्रिया आहे. केवळ आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून एका दिवसापुरते योगासने करून आरोग्य टिकवता येत नाही, असे प्रतिपादन वेलनेस कोच जीवन फसाटे यांनी केले. स्व. भाई मंगळे योगा गुप नेर पिंगळाई आणि जीएम वेलनेस अँड वर्क फ्रॉम होम सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, नेर पिंगळाई येथे आयोजित ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते.



कार्यक्रमाचे नियोजन वेलनेस कोच सुनील डेहनकर यांनी केले होते. प्रमुख पाहुणे म्हणून वेलनेस कोच माधुरी देशमुख व डॉ. राजेंद्र करवा यांची उपस्थिती होती. जीवन फसाटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, झजर औषधमुक्त जीवन जगायचे असेल, तर योगा, मेडिटेशन आणि संतुलित आहार हे तितकेच महत्त्वाचे आहेत. आहारच आपले औषध आहे. योग्य जीवनशैली आणि मानसिक, आध्यात्मिक, शारीरिक संतुलन राखणे गरजेचे आहे.

वेलनेस कोच माधुरी देशमुख यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांना योग, व्यायाम व आहाराचे महत्त्व सांगितले. झयोग दिन म्हणजे केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नव्हे, तर तो रोजच्या दिनचर्येचा भाग असावा, असे त्या म्हणाल्या. डॉ. राजेंद्र करवा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आजच्या बदललेल्या जीवनशैलीमुळे आरोग्य धोक्यात आले आहे. योग्य आहार आणि व्यायामाशिवाय आपण निरोगी राहू शकत नाही. आपण स्वतःचे डॉक्टर बनणे गरजेचे आहे. या कार्यक्रमात वेलनेस कोच सुनील डेहनकर यांनी त्यांच्या वैयक्तिक अनुभवातून आरोग्यदृष्ट्या झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती दिली. कार्यक्रमाला प्रीती माहुलकर, खैरकर, विजय खंडारकर, खुशाल नेरकर, गीतांजली नेरकर, मोहन नीगोट, ज्योती चोपकर, नीता शेगोकार, रजनी रघुवंशी, ममता म्हात्रे, व इतर गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनता विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, (दि.२२) –** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे दिनांक १२ जून, शनिवार रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. योग ही भारताची प्राचीन परंपरा असून, तिचा मूळ उगम भारतात झाला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी योग अत्यावश्यक ठरतो. ग्रामीण भागातही योगाचे महत्त्व पोहोचवणे ही काळाची गरज बनली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक विनोद मुगल यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. त्यांनी उपस्थितांना योग दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, योग केवळ व्यायाम नसून तो मन, शरीर आणि आत्म्याचे एकत्रित आरोग्य टिकवण्याचे साधन आहे.झ त्यानंतर पर्यवेक्षक गजेंद्र अवघड व शारीरिक शिक्षक रितेश खुळसाम यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून विद्यार्थ्यांना योग्य तंत्र समजावून सांगितले. सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान तसेच विविध आसनांचे प्रात्यक्षिक यावेळी सादर करण्यात आले. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. निसर्गरम्य वातावरणात, शिस्तबद्धतेने पार पडलेल्या या उपक्रमामुळे सहभागी सर्वांना मानसिक व शारीरिक ऊर्जा मिळाली. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण केली असून, नियमित योगाभ्यास करण्याची प्रेरणाही दिली.

## योग हे आरोग्य, आत्मिक समृद्धीसाठी एक पाऊल – केतन खिरकर

### श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुजी,(दि.२२) –** आयुष मंत्रालयाच्या 'योग कनेक्ट' उपक्रमांतर्गत श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक केतन खिरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, झयोग म्हणजे केवळ व्यायाम नाही तर आरोग्य आणि आत्मिक समृद्धीकडे जाणारे एक सकारात्मक पाऊल आहे. दररोज योग केल्याने शरीर निरोगी राहते तसेच मनाची एकाग्रता वाढते. कार्यक्रमात योगासनांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, प्राणायाम, ध्यान व विविध योग क्रिया सादर केल्या. या उपक्रमात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा देखील उत्स्फूर्त सहभाग होता. निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे सहभागी सर्वांना



मानसिक आणि शारीरिक ताजेतवानेपणा लाभला. या प्रसंगी विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक विपिन हंतोडकर, सारिका वाठ, अनंता मोहोड, मयुरी लोखंडे, श्रद्धा गोळे, भास्कर चव्हाण, धम्मपाल आठवले व अश्वघोष अभ्यंकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे नियोजन सुयोग्य रीतीने करण्यात आले होते.

# मोर्शीत विविध ठिकाणी योग दिवस साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**मोशी,(दि.२३)– तालुक्यात विविध ठिकाणी योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मोशी आयटीआय, रिद्धपूर भाजप मंडल, श्रीमती आर.सी. हायस्कूल आणि शिवाजी शाळेत योगा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व लोकांना समजाविण्यात आले. शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी सहभागी होऊन योगाचे फायदे अनुभवले. योग दिनाने लोकांमध्ये ताजेतवानेपण आणि ताण कमी करण्याची क्षमता विकसित केली. यामुळे समुदायातील आरोग्य सुधारण्यास मदत होईल, असे स्पष्ट झाले. योगाचे महत्त्व वाढवण्याचे काम प्रत्येक संस्थेने केले, हे प्रशंसनीय आहे.**




## भाजपाच्या मोर्शी ग्रामीण रिद्धपूर मंडल तर्फे योग दिन

भारतीय जनता पार्टी मोर्शी ग्रामीण मंडला तर्फे रिध्दपूर येथे २१ जून रोजी 'ग्रंथ श्रुती –स्मृती भवन' येथे योग दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून योगासनाचा सराव योग प्रशिक्षक निलेश गव्हांदे रिध्दपूर यांनी करवून घेतला. सुमारे एक तास योगाचे विविध आसने यावेळी त्यांनी मार्गदर्शनासह शिकवले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. येथील महंत श्री गोपीराज बाबा, महंत श्री परसराज बाबा, भाजपा मंडल अध्यक्ष उमेश कोंडे, जि.प चे माजी सभापती तात्यासाहेब मेश्राम, शरदचंद्र बिडकर, विलास आघाडे, रविंद्र हिस्ळकर, आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सुनील गवळी यांनी केले. यावेळी प्रामुख्याने ज्ञानेश्वर श्रीराव, संतोष सोनोने, विनायक ढेवले, मनोज वानखडे, अमोल यावलकर, सोपान ढोमणे, संजय पोहोकार, जयप्रकाश गजभिये, दिनेश वानखडे, बंशीधर पंजाबी, अमोल हिवराळे, गणेश पाटेकर, सुरेश पुनासे, रणजित सिनकर, गजानन ढगे, दाऊ पोहोकार, सौरभ पोहोकार व आशय मेश्राम यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## शासकीय आयटीआय मध्ये योगासनाचे धडे

श्री गोविंद प्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोशी जिल्हा अमरावती. येथे दिनांक २१ जून २०२५ रोजी संस्थेचे प्राचार्य कमल किशोर फुटाणे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना द्वारा जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.योग प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षक म्हणून तानसेन निकम उपस्थित होते.त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांना शिबिरामध्ये प्राणायाम, कपाल भारती, ध्यान साधना,ताडासन, श्वासासन, मकरासन इत्यादी आसनाचे प्रशिक्षण देऊन महत्व पटवून दिले. तर संस्थेचे प्राचार्य के. डी. फुटाणे यांनी मानवी जीवन जगताना योगासनाचे काय महत्त्व आहे व योगासन केल्यामुळे त्याचा मानवी जीवनात कसा उपयोग होतो याबद्दल अमूल्य मार्गदर्शन केले. या कार्यक्रमांमध्ये संस्थेतील १८० प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे गटनिदेशक तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी एस. ए.अंभोरे यांनी



केले. कार्यक्रमाकरिता संस्थेतील कर्मचारी श्रीकांत गावंडे,सुरेंद्र सावरकर,जयकुमार भालेराव, शंतनू खैरकर, प्रलोभ वांगे, रवींद्र गाडगे, सागर राऊत, सौरभ काटोलकर, गजानन भातुकुलकर, दिनेश पचारे, सागर तंतरपाळे, अमित बोडखे, राकेश वर्मा, वैभव मोथरकर, प्रांजली बिडकर, वैष्णवी फरतोडे, जेतल डेबे उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## अंबाडा येथे ग्रामविकास विद्यालयात योग दिन साजरा

ग्रामविकास विद्यालय अंबाडा येथे अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. दिनांक २१ जून २०२५ ला अंबाडा येथील ग्रामविकास माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे प्राचार्य अविनाश साळकर यांचे नेतृत्वात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश लोकांना योगाच्या फायद्यांबद्दल जागरूक करणे आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात, अनेक लोक शारीरिक आणि मानसिक ताणतणावाशी झुंजत आहेत, अशा परिस्थितीत योग करणे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. यामुळे अनेक



प्रकारचे आजार रोखता येतात, शरीर सक्रिय राहते आणि ताण कमी होतो असे प्राचार्य अविनाश साळकर यांनी सांगितले.यामध्ये विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर जे गेडाम यांनी योगाचे प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन केले. याकरिता विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी सुद्धा प्रत्यक्ष योगा व प्राणायाम केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचालन व आभार प्रदर्शन विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक श्रीकांत केंडे यांनी केले.

## करो योग रहो निरोग–योगगुरू नामदेवराव सातपुते

**मोर्शी–** अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून श्रीमती आर.सी.हायस्कूल लोणी येथील भव्य प्रांगणावर योग व प्राणायाम तसेच यावर्षीच्या नवीन ' एक पृथ्वी एक आरोग्य ' या घोषवाक्य नुसार योगगुरु नामदेवराव कृष्णाजी सातपुते,मोर्शी यांच्या मार्गदर्शनपर कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आलेले होते. याच पवित्र दिनाचे औचित्य साधुन 'सहजयोग सामुहिकता ' लोणी यांचे वतीने उपस्थित शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांना आत्मसाक्षात्कार देण्यात आला. याप्रसंगी सहजयोगी प्रदीप आगरकर यांनी आत्मसाक्षात्कार म्हणजे काय? व मानवी जीवनात सहज योगाचे महत्व या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी योगगुरु एन के सातपुते यांनी योग प्राणायमाचे सध्याच्या जीवनपद्धतीत महत्त्व काय? तसेच गुळवेल सारख्या महत्त्वपूर्ण औषधी वनस्पती व इतरही औषधी वनस्पतींचे फायदे व महत्व उपस्थितांना समजून




सांगितले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक एस व्ही खोडे यांनी योगगुरु सातपुते यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच 'सहजयोग सामूहिकतेतील प्रतिनिधी सहजयोगी प्रदीप आगरकर यांचा सुद्धा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक एस व्ही खोडे यांनी सर्व सहजयोगी व गावातील प्रतिष्ठित नागरिक या सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी सहजयोगी गजानन बेलसरे, आशिष वानखडे, किशोर खोडे, दीपक पोहरकर, गौरव




चिंचमलापुरे, अनिता बेलसरे, वंदना दोड, सौ रुपाली बहातकर तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे पर्यवेक्षक व्ही एच चिमोटे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले. मानवाच्या कल्याण गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## शिवाजी शाळेत – एक पृथ्वी एक आरोग्य या संकल्पनेवर योग दिन

स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला.यावर्षीच्या 'एक पृथ्वी एक आरोग्य' या संकल्पनेवर आधारित योग दिनाच्या आयोजनातून वैयक्तिक तसेच पर्यावरणीय आरोग्य यामधील परस्–परसंबंध अधोरेखित करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन शाळेच्या एनसीसी विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. योग सत्राचे मार्गदर्शन शाळेचे अनुभवी योग प्रशिक्षक अतुल वैद्य यांनी केले. योग अभ्यासक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांनी योगाचा शारीरिक व मासिक आरोग्यावरील सकारात्मक परिणामांविषयी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी दररोजच्या जीवनशैलीत योगाचा समावेश करावा असे आवाहन केले.

याप्रसंगी शाळेची उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर,पर्यवेक्षक उद्धव गिद, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक अजय हिवसे,विजय तारापुरे,एनसीसी अधिकारी पवन भागवत, ज्येष्ठ शिक्षक एस.आर.ठाकरे, राजेश मुंगसे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विशेष परिश्रम घेतले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कॅलिडोस्कोप

# साबणात ब्लेड?



मध्य प्रदेशमधील ग्वाल्हेर येथील एका कुटुंबाने एका नामांकित साबण निर्मिती करणाऱ्या कंपनीच्या उत्पादनासंदर्भात गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. या कुटुंबाने विकत घेतलेल्या दहा रुपयांच्या साबणामध्ये ब्लेड सापडले. अंघोळीदरम्यान या कुटुंबातील एका चिमुकल्याने हा साबण गालावर घासल्याने त्याच्या गालाला साबणामधील ब्लेडमुळे इजा झाली. हा प्रकार समोर आल्याननंतर जखमी मुलाच्या वडिलांनी राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन क्रमांक १९१५ वर कॉल करून अधिकृतरित्या कंपनीसंदर्भात तक्रार नोंदवली आहे. जखमी झालेल्या मुलाचे नाव अंश असे आहे. आपल्या मित्रांसोबत खेळून घरी आल्यानंतर हातपाय आणि तोंड धुण्यासाठी बाथरुममध्ये गेलेल्या अंशने साबण चेहऱ्यावर घासण्यास सुरुवात केली तेव्हा त्याला गालातून रक्त येत असल्याचे जाणवले. त्यानंतर नीट पाहिले असता साबणात काहीतरी असल्याचे त्याला दिसले. तोपर्यंत त्याचा गाल रक्ताने माखला होता.

एका बाजूने चेहरा रक्तबंबाळ झाल्याने घाबरलेल्या अंशने बाथरुममधूनच आरडाओरडा सुरू केला. मुलाचा आवाज ऐकून धावत बाथरुममध्ये आलेले अंशचे वडील अंगद सिंह तोमर यांना साबणात ब्लेड दिसल्यानंतर नेमके काय घडले याचा अंदाज आला. त्यांनी मुलाला धीर देत बाथरुमबाहेर काढत त्याच्या गालावर झालेल्या जखमेवर प्रथमोपचार केले. त्यांनी ग्राहक हेल्पलाइन क्रमांकावर घडलेल्या प्रकाराची माहिती देत अधिकृत तक्रार दाखल केली.

**मुलाच्या जीवाला होता धोका**

पॅकेजिंगदरम्यान ब्लेड साबणात अडकले अथवा स्थानिक दुकानामध्ये साबणाशी काही छेडछाड केल्याने हा प्रकार घडला याबद्दलची कोणतीही माहिती अद्याप उपलब्ध होऊ शकली नाही. बाहोदपूरमधील आनंद नगर येथे राहणाऱ्या सिंह कुटुंबाने स्थानिक किरणामालाच्या दुकानातून खरेदी केलेल्या साबणामध्ये अशाप्रकारे ब्लेड आढळून आल्याने अंगद सिंह यांनी स्वत: या दुकानात जाऊन तक्रार केली. त्या वेळी दुकानदारालाही सारा प्रकार ऐकून धक्का बसला. त्याने या ब्लेड असणाऱ्या साबणाच्या जागी दुसरा साबण दिला; मात्र घरी गेल्यानंतर अंगद यांनी हा साबण पाण्यात टाकून चाचपणी केली असता त्यामध्येही ब्लेड आढळून आले. अंगद यांनी १९१५ या राष्ट्रीय ग्राहक तक्रार हेल्पलाइन क्रमांकावर कॉल केला. या प्रकारामुळे माझ्या मुलाचा जीवही जाऊ शकला असता, असे अंगद यांनी तक्रारीत म्हटले आहे.

**न्यायालयात जाण्याचा इशारा**

ऑनलाइन माध्यमातून तक्रार करताना त्यांनी साबणाच्या फोटोसहीत इतर माहितीही दिली आहे. या प्रकरणात संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर आपण न्यायालयात हे प्रकरण घेऊन जाऊ, असा इशारा अंगद यांनी दिला आहे.

**कंपनीचे म्हणणे**


साबणात रेझर ब्लेड आढळल्याच्या कथित प्रकरणांबद्दल आम्हाला मीडिया रिपोर्ट्समधून माहिती मिळाली आहे, असे कंपनीने यासंदर्भात जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. या दाव्याची सत्यता पडताळण्यासाठी कंपनी चौकशी करत आहे. आजपर्यंत, आम्हाला कोणत्याही ग्राहकाकडून कोणतीही औपचारिक तक्रार किंवा अशाप्रकारच्या घटनेची सूचना मिळालेली नाही किंवा कोणत्याही व्यक्तीने आमच्याशी थेट संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला नाही. आमच्या सर्व साबणाच्या कव्हरवर आमचे ग्राहक सेवा संपर्क तपशील छापलेले असतानाही आमच्याकडे कोणीही अधिकृत तक्रार नोंदवलेली नाही. त्यामुळेच आम्ही सध्या आरोपाच्या सत्यतेवर भाष्य करू शकत नाही. सध्या तरी प्रथम दर्शनी हे बनावट उत्पादनांचे प्रकरण किंवा ब्रँडची प्रतिष्ठा खराब करण्याच्या उद्देशाने चालवलेल्या दुर्दैवी मोहीमेचा भाग असल्याचे दिसत आहे.

**साबण विक्रेत्याच्याही संपर्कात**

आम्ही तक्रारदाराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहोत. तथापि, आमच्याकडे त्यांचे संपर्क तपशील नाहीत. याव्यतिरिक्त, आम्ही ज्या घाऊक विक्रेत्याकडून साबण खरेदी केला होता, त्यांच्याशी संपर्क साधला आहे आणि चाचणीसाठी नमुने गोळा केले आहेत. आम्ही माध्यमांना विनंती करतो, की त्यांच्याकडे असलेली कोणतीही संबंधित माहिती देऊन आम्हाला मदत करावी, विशेषतः त्यांनी दावा करणाऱ्या व्यक्तीची मुलाखत घेतली असल्याने आम्हाला यामध्ये सहकार्य करावे, असे कंपनीने कंपनीने निवेदनात म्हटले आहे.

# आशियातील श्रीमंत गाव

भारतातल्या एका गावातील बहुतेक लोकसंख्या अनिवासी भारतीय आहे. हे गाव आशियातील सर्वात श्रीमंत गाव आहे. टुमदार घरे, डोंगर अन् विकसित असे हे गाव असून तिथे १७ बँका, शॉपिंग मॉल आणि थिएटरदेखील आहे. देशातील श्रीमंत गावांच्या यादीत हे गाव अव्वलस्थानी आहे. या ठिकाणचे लोक आजही



शेती करतात, पण या लोकांची बँकातील रक्कम ऐकून आवाक होण्याची वेळ येते. लोक परदेशातून पैसे कमवून गावातील बँकांमध्ये ट्रान्स्फर करतात. गुजरातमधील भूजमधील माधापूर या छोट्याशा गावाची ही एक वेगळी ओळख आहे. आशियातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून या गावाची ओळख निर्माण झाली आहे. फक्त ३२ हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील लोकांकडे सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मुदत ठेवी आहेत. हा एक विक्रम आहे. भारत सरकारनेही तो मान्य केला आहे.

**६५ टक्के लोक एनआरआय**

एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के एनआरआय लोकसंख्येमुळे माधापूर इतके समृद्ध आहे. हे एनआरआय प्रामुख्याने आफ्रिका, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आहेत. माधापूरमधील बँक खात्यात जमा झालेले पैसे वाया जात नाहीत. त्यामुळे गाव विकासाचे एक मॉडेल बनले आहे. या पैशाने चांगले रस्ते, तलाव, शाळा, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे आणि मंदिरे बांधण्यास मदत झाली आहे. या गावात एचडीएफसी, स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँक, ॲक्सिस, आयसीआयसीआय, युनियन बँक आणि प्रमुख खासगी बँका मिळून तब्बल १७ बँका आहेत.





# राजस्थानात विधवांचे गाव!

राजस्थानमधील एक गाव 'विधवांचे गाव' म्हणून ओळखले जाते. या गावाची गोष्ट फारच दुःखद आहे. राजस्थानमधील अनेक गावे सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत, पण याच राज्यात बुंदू हे ठिकाण रकीबपासून ८५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हदौती या भागात आहे. तिथे पुरुषांचा तारुण्यातच मृत्यू होतो. ४,५०० लोकसंख्या असलेले बुधपुरा हे बरार प्रदेशाचा भाग असल्याचे म्हटले जाते. त्या ठिकाणी अनेक खाणी आहेत आणि तिथले लोक या खाणींमध्ये काम करतात. याशिवाय तिथे बाहेरूनही लोक कामाच्या शोधात येतात आणि येथे स्थायिक होतात.

**खाणकामामुळे लोकांना टीबी**

सततच्या कामामुळे आणि दररोज उडणाऱ्या बारीक धुळीमुळे लोकांना टीबी होतो आणि तोही अशा प्रकारे, की ते थेट मृत्यूच्या दारात घेऊन जातो. गावात इतर कोणतेही काम नसल्याने तिथले पुरुष दगडाच्या खाणीत काम करतात आणि या दरम्यान दगडाची धूळ (सिलिका) हळूहळू त्यांच्या छातीत जमा होते आणि नंतर 'सिलिकोसिस'चे रूप धारण करते. 'सिलिकोसिस' किंवा टीबीमुळे त्यांची प्रकृती बिघडते. आजारी पडल्यावर गरिबीमुळे त्यांना योग्य उपचार मिळू शकत नाहीत आणि ते अगदी लहान वयातच मरण पावतात.

# केवळ स्टेशन वाचवण्यासाठी

उत्तर प्रदेशातल्या प्रयागराजमध्ये दयालपूर हे रेल्वे स्टेशन आहे. लोक इथे रोज येतात, तिकीट घेतात आणि घरी परत जातात. ट्रेनमध्ये चढतच नाहीत. या स्टेशनची कहाणी थोडी वेगळीच आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या आग्रहावरून १९५४ मध्ये या स्टेशनचे बांधकाम झाले, तेव्हा आजूबाजूच्या गावांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी हे स्टेशन खूप महत्त्वाचे होते.

अनेक गाड्या इथे थांबत असत, पण हळूहळू प्रवाशांची संख्या कमी झाली आणि २००६ मध्ये रेल्वेने तोटा होत असल्याचे सांगत हे स्टेशन बंद केले. रेल्वेच्या नियमांनुसार एखाद्या स्टेशनवर नियमितपणे ५० पेक्षा कमी तिकिटे विकली जात असतील तर असे स्टेशन बंद केले जाते. दयालपूर स्टेशनलाही हाच नियम लागू झाला आणि ते बंद करण्यात



आले. पण स्टेशन बंद झाल्यावर लोकांना त्याची खरी गरज जाणवू लागली. त्यांनी प्रयत्न केले आणि अखेर २०२० मध्ये रेल्वेने हे स्टेशन पुन्हा सुरू करण्यात आले. पण ते पुन्हा बंद होऊ नये यासाठी काय करायचे, हा प्रश्न होता.

स्टेशन वाचवण्यासाठी गावकऱ्यांनी एक मार्ग काढला. प्रवास करायचा नसेल तरी रोज कोणी ना कोणी स्टेशनवर जाऊन तिकीट खरेदी करायचे असे त्यांनी ठरवले. फक्त स्टेशन सुरू राहावे हीच लोकांची इच्छा आहे. आजही तिथले लोक महिन्याला सुमारे ७०० रुपयांची तिकिटे विकत घेतात, पण ट्रेनने जात नाहीत. स्टेशनवर फक्त एकच ट्रेन थांबते. एक दिवस इथे अधिक ट्रेन थांबतील अशी गावकऱ्यांना आशा आहे. चक्क वर्गणी गोळा करून ते रोज तिकीट खरेदी करतात.


# चष्मा घालाल तर...




सध्या चष्मा लागण्याचं प्रमाण बरंच वाढलं आहे. आजकाल लहानग्या मुलांनाही चष्मा लागतो. कॉम्प्युटरवर काम करणाऱ्यांना चष्मा लावाला लागतो. विविध कार्यालयांमध्ये कॉम्प्युटरला डोळे लावून बसलेल्यांच्या नाकावर चष्मा असतो. याला महिलाही अपवाद नाहीत. काही वर्षांपूर्वीपर्यंत चष्मा लावणं हे मागासपणाचं लक्षण मानलं जायचं. पण काळानुरुप यात बदल झाला. आता चष्मा लावणं स्टाईल स्टेटमेंट बनून गेलं आहे. पण जपानमधल्या कंपन्यांना महिला कर्मचाऱ्यांनी चष्मा लावणं रुचलेलं नाही. म्हणूनच महिलांनी चष्मा लावून कार्यालयात येऊ नये, असं फर्मान त्यांनी काढलं आहे. चष्मा लावल्यामुळे महिलांच्या सौंदर्यावर परिणाम होत असल्याचं कारण देत चष्मा लावायला बंदी घालण्यात आली आहे. पुरुष कर्मचारी अगदी आरामात चष्मा घालू शकतात. एअरलाईन्सपासून रेस्टॉरंटपर्यंत खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिला चष्मा घालून काम करू शकत नाहीत. या कंपन्या इथवर थांबलेल्या नाहीत तर काही कंपन्यांनी महिलांना मेक अप करून यायची सक्ती केली आहे. तसंच वजन कमी करण्याच्या सूचनाही केल्या आहेत. आपल्या कार्यालयातल्या महिला कर्मचारी आकर्षक दिसाव्यात, असं इथल्या कंपन्यांना वाटतं. अर्थात इथल्या महिलांनी या प्रकाराला विरोध करायला सुरुवात केली आहे. सोशल मीडियावरही विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यामुळे कंपन्या आपला हा निर्णय मागे घेणार का, याबाबत कुतुहल निर्माण झालं आहे.



# मिठाईत भरलीए हवा



भारतात तऱ्हेतऱ्हेच्या मिठाया मिळतात. या चविष्ट मिठाया बघितल्यावर कोणाच्याही तोंडाला पाणी सुटल्याशिवाय रहाणार नाही. भारतात मिठाई खाण्याचं प्रमाण जास्त असलं तरी जगभरातच वैविध्यपूर्ण मिष्टान्न तयार केली जातात. काहींचा आकार वेगळा असतो तर काहींचा प्रकार भन्नाट असतो. अशीच एक मिठाई सध्या चर्चेचा विषय ठरते आहे. ब्रिटनमधल्या शेफने जगातली सर्वात हलकी मिठाई तयार केली आहे. विशेष बाब म्हणजे ही मिठाई बनवण्यासाठी शास्त्रज्ञांची मदत घेण्यात आली आहे. या मिठाईचं वजन अवघं एक ग्रॅम आहे. आश्चर्य वाटण्याजोगी बाब म्हणजे या मिठाईच्या ९६ टक्के भागात हवा आहे. म्हणजे या मिठाईत फक्त चार टक्के घन पदार्थ आहेत. ही मिठाई बनवण्यासाठी एअरोजेलचा वापर करण्यात आला आहे. एअरोजेल हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ आहे. १९३१ मध्ये याचा शोध लावण्यात आला होता. एअरोजेलमध्ये ९५ ते ९९.८ टक्क्यांपर्यंत हवा असते. म्हणूनच हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ ठरतो. एअरोजेल विविध पदार्थांपासून तयार करता येतं. मात्र ही मिठाई बनवण्यासाठी अंड्याच्या पांढऱ्या भागापासून हायड्रोजेल निर्मिती करण्यात आली. यानंतर हायड्रोजेल कॅल्शियम क्लोराइड आणि पाण्यात बुडवून ठेवण्यात आली. काही काळानंतर ती एका साच्यात घालण्यात आली. ही मिठाई तयार करण्यासाठी बरीच मोठी प्रक्रिया करावी लागली. अखेर सगळ्यांच्या मेहनतीला यश आलं आणि जगातली सर्वात हलकी मिठाई तयार झाली.

# खेकड्यासाठी मोजले ३२ लाख रुपये

मध्यंतरी एका खेकड्याचा लिलाव पार पडला. या खेकड्यावर कोट्यवधींची बोली लागली. अखेरीस हा खेकडा भारतीय चलनात ३२ लाख ६६ हजार रुपयांचा विकला गेला. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला. जपानच्या पश्चिमेकडे असणाऱ्या टोट्टरी परिसरात या खेकड्याचा लिलाव पार पडला. हा क्रस्टेशियन खेकडा आहे. तो फक्त बर्फात सापडतो. म्हणूनच तो खरेदी करण्यासाठी बरीच चढाओढ पहायला मिळते. थंडीच्या काळात जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर मासे खाल्ले जातात. या काळात माशांचा लिलाव केला जातो. जपानी लोक या लिलावात मासे खरेदी करतात. या लिलावादरम्यान ट्यूना हा मासा मुख्य आकर्षण ठरतो. जगातल्या या सर्वात महागड्या खेकड्याचं वजन १.२ किलो असून लांबी १४.६ सेंटीमीटर आहे. गेल्या वर्षीही एक खेकडा भारतीय चलनात तेरा लाख रुपयांना विकला गेला होता. हा एक विक्रमच होता. या विक्रमाची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली होती. मात्र आता ३२ लाख ६६ हजार रुपयांना विकल्या गेल्या खेकड्याने सर्व विक्रम मागे टाकले आहेत. हा जगातला सर्वात महागडा खेकडा ठरला आहे.



# मुलाचा मृत्यू, पित्याचा स्पृहणीय उपक्रम



मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातून एक हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. दुचाकी चालवताना हेल्मेट न घालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हादरवून सोडणारी घटना खंडवा जिल्ह्यातील पंधना विधानसभेतील गुराडिया गावात घडली. येथे एका वडिलांनी आपल्या मुलाला गमावले, पण त्यांनी उचललेल्या पावलाने संपूर्ण परिसराला विचार करायला भाग पाडले. काही दिवसांपूर्वी गावातील आनंद सिंह सावनेर या युवकाचे रस्ते अपघातात अकाली निधन झाले. दुचाकी चालवत असताना हा अपघात झाला. दुर्दैवाने त्याने हेल्मेट घातलेले नव्हते. ही बातमी गावात पसरताच वातावरण उदास झाले. संपूर्ण गावावर शोककळा पसरली. मुलाच्या अंत्यसंस्काराच्या काही दिवसांनी वडील मुकेश सावनेर यांनी घेतलेला निर्णय या दुःखद घटनेला जनजागृती मोहिमेत रूपांतरित करणारे उदाहरण ठरला.

**पूजा, अर्चा, विधीला फाटा**

सामान्यतः पारंपारिक पूजा-पाठ आणि श्रद्धांजली सभा दहाव्या दिवशी आयोजित केल्या जातात, पण याला बगल देत मुकेश सावनेर यांनी सामाजिक संदेश देण्याचे हे एक माध्यम बनवले. त्यांनी त्यांच्या मुलाच्या स्मरणार्थ गावकऱ्यांना आणि जवळच्या तरुणांना हेल्मेट वाटप करण्याचा निर्णय घेतला. आनंदने त्या दिवशी हेल्मेट घातले असते तर तो आज जिवंत असता, असा विचार करून आपण हे पाऊल उचलल्याचे ते सांगतात. इतर कोणालाही आपला मुलगा अशा प्रकारे गमवावा लागू नये. हे दुःख कधीच संपणार नाही, पण माझ्या मुलाच्या मृत्युमुळे दुसऱ्याचे प्राण वाचू शकतील, तर कदाचित त्याचा मृत्यू व्यर्थ जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

**हेल्मेट वाटप चर्चेचा विषय**

गावात आयोजित या अनोख्या श्रद्धांजली सभेत तरुणांची गर्दी जमली होती. सर्वांचे डोळे पाणावले होते. त्याच वेळी मुकेश सावनेर यांनी सर्वांना हेल्मेटचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी डझनभर तरुणांना हेल्मेट घालायला लावले आणि त्यांच्याकडून ते नेहमी घालणार असल्याचे वचन घेतले. यापुढे वाहन चालवताना नक्कीच हेल्मेट घालू, असे तरुणांनी या वेळी सांगितले. ही छोटीशी घटना तरुणांसाठी एक मोठा धडा बनली. एखाद्याच्या मृत्यूवर इतका अर्थपूर्ण सामाजिक संदेश पहिल्यांदाच पाहायला मिळाल्याचे स्थानिक सांगतात.

**वडिलांनी उचललेल्या पावलाचे कौतुक**

ही घटना फक्त गाव किंवा जिल्ह्यापुरती मर्यादित नव्हती, तर ही बातमी 'सोशल मीडिया'वरून व्हायरल झाली. लोक मुकेश सावनेर यांच्या या पावलाचे कौतुक करू लागले. अनेक सामाजिक संघटना आणि स्थानिक प्रशासनानेही त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. असे जागरूक नागरिकच समाजात बदल घडवू शकतात, असे मत व्यक्त केले जात आहे.

# खेळाडूंना सर्वतोपरी मदत करण्यास महाराष्ट्र शासन कटीबद्ध

## मुख्यमंत्री फडवणीस यांचे प्रतिपादन : मुख्यमंत्री चषक राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे थाटात उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
भारतात कुस्तीची प्राचीन परंपरा राहिली आहे. सध्या कुस्तीचे स्वरूप बदलले आहे. कुस्ती खेळाला अधिक व्यावसायिक आणि ग्लॅमरस बनवण्यासाठी संस्था, फाउंडेशन आणि कॉर्पोरेट क्षेत्राला जोडून घेण्याचा प्रयत्न करू, तसेच खेळाडूंना उत्कृष्ट प्रशिक्षण देण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आणण्याबरोबरच, आवश्यक पायाभूत सुविधा अद्यावत करण्यासोबतच खेळाडूंना सर्वतोपरी मदत करण्यास महाराष्ट्र शासन कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर महानगरपालिका व शहर कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात आयोजित १५ वर्षांखालील मुले व मुलींच्या मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धा २०२५ या स्पर्धेचे उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमात राज्याचे अर्थ व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, आमदार कृपाल तुमाने, शहर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी, भारतीय कुस्ती संघाचे अध्यक्ष संजयकुमार सिंग, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, भारतीय कुस्ती संघ कोषाध्यक्ष एस. पी. देसवाल, महाराष्ट्र कुस्तीगर संघ कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, विदर्भ कुस्तीगीर संघ कार्याध्यक्ष संजय तिरथकर, हिंदकेसरी योगेशजी दोडके, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, उपायुक्त विनोद जाधव, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर, आयोजन समितीचे उपाध्यक्ष दयाराम भोतमांगे प्रामुख्याने उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'प्रथम हनुमानाच्या मूर्तीला आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूतीर्ला माल्यार्पण केले. नंतर आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत पदक विजेता रोहीणी राणू देवबा यांच्या हस्ते मशाल पेटवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.





यावेळी फडणवीस म्हणाले की कुस्ती स्पर्धेकडे सरकारतर्फे लक्ष दिले जाईल.मुख्यमंत्र्यांनी खेळाचे आणि त्यात सहभागी होण्याचे महत्त्व पटवून दिले. छोट्या-छोट्या भागांमध्येही कुस्ती खेळली जाते, हा भारताचा वजूद आहे.

ज्या मुलांनी यात सहभाग घेतला आहे, त्यांच्यात खेळात सहभाग घेऊन संघर्ष करण्याची भावना उत्पन्न होते. खेळाडू हरण्याला घाबरत नाहीत, तर त्यातून पुन्हा संघर्ष करायला शिकतात, असे ते म्हणाले. या विचाराने खेळाडू आणि समाजालाही सकारात्मक संदेश मिळतो.



**अमित योगा ग्रुपतर्फे चित्तथरारक प्रात्यक्षिक**

मुख्यमंत्री कुस्ती चषक स्पर्धा मध्ये अमित योगा ग्रुपने योगाचे विविध मानवीय मनोरे व कठीण योगासनाचे चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रास्ताविक करताना आमदार संदीप जोशी यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्याच्या प्रयत्नात आम्ही असल्याचे सांगत मनपाच्या जागेवर एक लहान स्टेडियम तयार करण्याची मान्यता द्यावी अशी विनंती केली. रामदास तडस यांनी खेळाडूंचे मनोबल वाढविले. आशिष जयस्वाल यांनीही मार्गदर्शन केले. संचालन आर जे आमोद यांनी केले.

# कैद्याचा कारागृहात आकस्मिक मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २२ :**
तीन वर्षांपूर्वी एका तरुणाचा खून केल्या प्रकरणी आणि हत्येला प्रवृत्त करण्याच्या अत्यंत गंभीर गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या कैद्याचा अचानक बेशुद्ध पडून मृत्यू झाला. जिल्हा कारागृहाच्या आवारात ही घटना घडली.



मृत कैद्यांचे नाव गंगाधर निखारे (४२) असे आहे, तो पद्मा वॉर्ड, पवनी येथील रहिवासी आहे. हृदयविकाराच्या झटक्याने गंगाधरचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे.

तहसीलदार भंडारा यांच्या उपस्थितीत पंचनामा झाल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी नागपूरला पाठवण्यात आला. २० जूनला दुपारी ३.३५ वाजता तुरुंगाच्या बॅरेकसमोरील व्हरांड्यात चालत असताना तो बेशुद्ध पडला. जिल्हा कारागृह रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर त्याला तातडीने भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले.

घटनेच्या वेळी कर्तव्यावर असलेले तुरुंग कर्मचारी आनंद खर्चे यांच्या तक्रारीवरून भंडारा पोलिसांनी अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक पूनम कुंभारे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

तीन वर्षांपासून कारागृहात

सुमारे ३ वर्षांपूर्वी घडलेल्या एका खून प्रकरणात ३०२ (खून) आणि १०९ (खून करण्यास प्रवृत्त करणे) अंतर्गत गंगाधरला १० सप्टेंबर २०२२ रोजी न्यायालयाच्या आदेशाने भंडारा जिल्हा कारागृहात दाखल करण्यात आले होते. तेव्हापासून तो शिक्षा भोगत आहे. वाचनालयात स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या तरुणाचा देशी कट्ट्यातून गोळी झाडून गंगाधरने खून केला होता.

# मुख्यमंत्री शहरात असतानाच सापडले २४० ग्राम एमडी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
संत्रानगरी म्हणून ओळखले जाणारे नागपूर हे राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही शहर आहे. मात्र तेच शहरात तळ ठोकून असताना अंमली पदार्थांची वाहतूक होत असल्याने दिसून येते.

ड्रग्ज तस्करांच्या विरोधात पोलिस आयुक्त डॉ. रविंद्रकुमार सिंगल यांनी दोनच दिवसांपूर्वी मोठा गाजावाजा करीत ऑपरेशन थंडर हाती घेतले. या अंतर्गत पोलिस दल रेकॉर्ड वरील गुन्हेगारांचे समुपदेशनही करीत आहे. मात्र असे असतानाही मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची होणारी तस्करी देखील चर्चेचा विषय बनत चालली आहे.

शहर पोलिसांनी एकट्या इमामवाडातून २४० ग्राम मेफेड्रोन (एमडी) पावडर जप्त करीत चौघांना अटक केली. निलेश लक्ष्मण देशमुख, प्रणय उर्फ सुमित गोपाल गायधने, आशिष प्रकाश मडावी, शुभम उर्फ भुऱ्या राजेश तिडके अशी अटक चार तस्करांची नावे आहेत.

त्यांच्या कारची झडती घेतली असता पोलिसांना २४० ग्राम एमडी पावडर सापडले. विशेष म्हणजे हे सगळे तरुण वयोगटातील आहेत. यावरून तरुणाई किती मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांच्या विळख्यात गुरफटत चालल्याचे दिसते.

ऑपरेशन थंडर अंतर्गत नागपूर पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या महिनाभराच्या कालावधीत ३३६ तस्करांच्या मुसक्या आवळल्या. यातून पोलिसांनी आतापर्यंत एक किलो मेफेड्रोन (एमडी) आणि तब्बल २ किलो अफिम जप्त केले.

अंमली पदार्थ विरोधी पथकाने महिनाभरात १ कोटी ४० लाख १७ हजारांचे अंमली पदार्थ पकडले आहे. या तस्करीत पहिल्यांदा गुन्हा केलेल्या अल्पवयीन आणि तरुणांची संख्या अधिक असल्याची चिंता खुद्द पोलिस आयुक्त सिंगल यांनी व्यक्त केली होती.

महिनाभराच्या कालावधीत पोलिसांनी अटक केलेल्या एकूण ३३६ तस्करांपैकी जवळजवळ ७० टक्के म्हणजे २२६ जण हे अंमली पदाथार्चे सेवन करणारे तरुण आहेत. यातही मोठ्या संख्येने अल्पवयीन मुले आहेत. ही आकडेवारी तरुणाई किती गंभीरपणे व्यसनाधिनतेच्या विळख्या गुरफटत आहे, हे सांगणारी आहे.

# ठाकरेंच्या दोन माजी नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी नगरसेवक ईश्वर तायडे आणि माजी नगरसेविका आकांक्षा शेठ्ये यांनी आपल्या १०० हून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात भाजप जाहीर प्रवेश केला. मुंबई भाजपचे अध्यक्ष आणि राज्याचे मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी आमदार प्रविण दरेकर आणि मुंबई भाजपचे उपाध्यक्ष कमलाकर दळवी देखील उपस्थित होते.

यावेळी मंत्री शेलार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाने प्रेरित होऊन तसेच भारतीय जनता पक्षाच्या ध्येयधोरणांशी एकरूप होऊन काम करण्याची इच्छा व्यक्त करत शिवसेना उबाठा गटाचे माजी नगरसेवक ईश्वर तायडे आणि माजी नगरसेविका आकांक्षा शेठ्ये यांनी आपल्या १०० हून अधिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. याचा अर्थ त्यांनी उबाठाचे नेतृत्व नाकारले आहे. हा या नाटकाचा पहिला अंक आहे. लवकरच दुसरा आणि तिसरा व शेवटचा अंक तुम्हाला पाहायला मिळेल.



उबाठाची अवस्था धोकादायक आणि जीर्ण झाली आहे. त्यांनी मुंबई, मुंबईकर, हिंदुत्व, हिंदु सण उत्सव यांच्या विरोधात भूमिका घेतली त्यामुळे ते धोकादायक स्थितीत आहेत, तर त्यांना सोडून ज्या पद्धतीने पक्षाचे पदाधिकारी, आमदार, खासदार जात आहेत, त्यावर तो पक्ष जीर्ण अवस्थेत आहे, असे आशिष शेलार म्हणाले.

२०१७ च्या निवडणुकीत त्यावेळच्या शिवसेनेपेक्षा भाजपला फक्त दोन जागा कमी होत्या. आता भाजपमध्ये चार माजी नगरसेवकांनी प्रवेश केल्यानंतर भाजप नंबर १ चा पक्ष झालाच. शिवाय मूळ शिवसेनेतील ५० हून अधिक नगरसेवक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेले. त्यामुळे उबाठा सेना हा पक्ष अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे, अशी टीका शेलार यांनी केली.

## आत्मनिर्भर भारतासाठी आरआरपी इनोव्हेशन आणि ऑप्टिक्स बुल्गारियासोबत भागीदारी



भारताच्या आत्मनिर्भरता आणि स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या दृष्टिकोनाला अधोरेखित करणाऱ्या एका ऐतिहासिक पावलांनी वेगाने वाढणाऱ्या भारतीय इलेक्ट्रो-ऑप्टिक्स कंपनीने, प्रगत इलेक्ट्रो-ऑप्टिक्स सोल्यूशन्समधील जागतिक प्रणेते असलेल्या ऑप्टिक्स बुल्गारियासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.

२० जून रोजी औपचारिकरित्या संपन्न झालेला हा सामंजस्य करार, आरआरपी एस४ई इनोव्हेशन लि.साठी एक ऐतिहासिक क्षण आहे, जो अत्याधुनिक संरक्षण उत्पादनांच्या नवीन पिढीसाठी तंत्रज्ञान हस्तांतरण (टीओटी) साठी मार्ग मोकळा करतो, ज्यामध्ये अल्ट्रा लाइटवेट थर्मल साइट्स विस्तारित लांब पल्ल्याची देखरेख पद्धती समाविष्ट आहे. हँडहेल्ड थर्मल इमेजर्स (एचएचटीआय) ऑप्टिक्स बुल्गारियाने खोलवर कौशल्य आणले आहे. इन-हाऊस संशोधन आणि विकासाद्वारे त्यांच्या सर्व उत्पादन ऑफरमध्ये त्यांनी प्रभुत्व मिळवले असून त्यांच्या नवकल्पनांची युद्ध-चाचणी केली जाते. तसेच जागतिक स्तरावर त्यांचा आदर केला जातो.

या सहकार्याने कंपन्यांचे उद्दिष्ट अशा प्रगत थर्मल तंत्रज्ञानाचा वापर करणे आहे, जे या क्षेत्रात कधीही वापरले गेले नाही. स्पर्धात्मक किमतीत उच्च कार्यक्षमता प्रदान करतात.

३०० हून अधिक थर्मल साइट्स आधीच धोरणात्मक ठिकाणी तैनात आहेत. ऑप्टिक्सचे प्रमुख उत्पादन 'डायना' हे इलेक्ट्रो-ऑप्टिक्समध्ये गेम-चेंजर म्हणून ओळखले जाते. हे नवोपक्रम आता भारतीय गरजांनुसार अनुकूलित केले जातील, जे वास्तविक युद्धक्षेत्रातील आव्हानांना व्यावहारिक, आघाडीचे उपाय प्रदान करतील.

■ ■ ■

लोकार्थ

## २४ जून २०२५ रोजी खुला होणार एलेनबेरी इंडस्ट्रीयल गॅसेसचा आयपिओ



एलेनबेरी इंडस्ट्रियल गॅसेस लिमिटेडने त्यांच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी रु. २ दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ३८० ते रु. ४०० असा किंमतपट्टा निश्चित केला आहे.

कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ किंवा ऑफर) मंगळवार, २४ जून २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवार, २६ जून २०२५ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ३७ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३७ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ ४०० कोटी रुपयांपर्यंतच्या नवीन इश्यू आणि पद्म कुमार अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या इक्विटी शेअर्स आणि वरुण अग्रवाल यांच्या ५६,५६,५६५ पर्यंतच्या विक्रीसाठी ऑफरचा समावेश आहे.

नवीन इश्यूमधून मिळणारे २१० कोटी रुपयांचे उत्पन्न कंपनीने घेतलेल्या काही थकित कर्जांची पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्वपेमेंटसाठी वापरले जाईल; २२० टीपीडी क्षमतेच्या उलुबेरिया-II प्लांटमध्ये एअर सेपरेशन युनिटची स्थापना करण्यासाठी १०४.५० कोटी रुपये; आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरले जाईल.

■ ■ ■

## टाइमझोनचा सर्वात मोठा फ्लॅगशिप व्हेन्यू इन ऑर्बिट मॉलमध्ये

टाइमझोन या ऑस्ट्रेलियातील फॅमिली आणि सोशल एंटरटेनमेंट क्षेत्रातील अग्रगण्य ब्रँडने भारतात आपल्या सर्वात मोठ्या, सर्वात आकर्षक आणि अनुभव-आधारित फ्लॅगशिप व्हेन्यू इनऑर्बिट मॉल, मालाड येथे सुरू केला आहे.

2 दशकांपूर्वी या ब्रँडने याच ठिकाणी पहिला व्हेन्यू सुरु करत भारतात पदार्पण केले होते. पहिल्या व दुसऱ्या मजल्यांवर 24,626 चौरस फूट क्षेत्रफळात असलेले हे नवीन ठिकाण खेळ, खाद्यजत्रा आणि अविस्मरणीय समारंभांसाठी मुंबईतील एक हब म्हणून तयार झाले आहे. टाइमझोनचा फ्लॅगशिप व्हेन्यू अनुभवात्मक मनोरंजनात एक नवा मानक स्थापित करण्यासाठी डिझाइन केलेला आहे. सर्व वयोगटातील अभ्यागत एका उत्साही आणि जोशपूर्ण वातावरणात प्रवेश करतील, जिथे त्यांना मजा करता येईल आणि एकत्रितपणे आनंदी क्षण घालवता येतील.

टाइमझोन कॅफे हा भारतातील पहिलाच इन-व्हेन्यू कन्सेप्ट म्हणून सुरू झाला आहे. या ठिकाणी जीभेची व पोटाची भूक आणि तहान भागवणारा मेन्यू सादर करण्यात येतो. या ठिकाणी सर्व वयोगटांचा विचार करून फ्यूजन-प्रेरित 26 पदार्थ उपलब्ध करून देण्यात येतात. त्याचप्रमाणे कॅफेच्या समकालीन प्लेटिंग स्टाइलमुळे कुटुंबीय आणि मित्रांसमवेत गप्पांचा फड रंगतो.

जॅपनीज मोइतो मॅजिक व काश्मिरी रोझ पल्पी लिची कूलर यासारख्या खास हाताने तयार केलेल्या मॉकटेल्सपासून ते थिक शेक, किड-फ्रेंडली क्रिस्पी कॅरेमल आणि स्थानिक चव असलेली शिकंजी या ठिकाणी उपलब्ध आहे. कॉफीच्या चाहत्यांसाठी ताजी ब्रू केलेली कॉफी टर्किश कॉफी व ब्लॅक फॉरेस्ट पर्यायांसह एका खास ढंगात सादर केली जाते

■ ■ ■




## सायबर सुरक्षा क्षेत्रात भारताचे निर्णायक पाऊल

भारतातील सायबर सुरक्षेच्या वाढत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर सायबर इंडिया एक्स्पो 2025 चे यशस्वी आयोजन बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, मुंबई येथे करण्यात आले.

मिडिया फुसन द्वारे आयोजित या दोन दिवसीय कार्यक्रमात धोरणनिमार्ते, तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, स्टार्टअप्स आणि उद्योजक एकत्र आले.भारत सध्या जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक सायबर हल्ल्यांचा बळी ठरत असून, यावेळी १०० हून अधिक आंतरराष्ट्रीय आणि भारतीय कंपन्यांनी भाग घेतला.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## शासकीय जमिनीचे बनावट कागदपत्रे

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :**
शासकीय जमीन बळकावण्यासाठी भूमी अभिलेख विभागाचे बनावट कागदपत्रे तयार केल्याप्रकरणी माजी नगरसेवक कमलेश चौधरी यांच्याविरुद्ध सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कमलेश चौधरी यांनी फुटाळा तलाव व त्याच्या पाणलोट क्षेत्रावर बेकायदेशीर अतिक्रमण केले आहे.

आता त्यांनी सिटी सर्व्हे कार्यालय क्रमांक ३, भूमी अभिलेख विभागाचा बनावट दस्तऐवज तयार करून मौजा तेलंगखेडी येथील ४३.८७ लाख चौरस फुट शासकीय जमीन बळकावण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी सदर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सिटी सर्व्हे कार्यालय क्रमांक ३ यांच्या तक्रारीवरून करण्यात आली आहे. २० जून २०२५ रोजी सदर पोलीस ठाण्यात कमलेश चौधरी विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. यापूर्वी अन्याय निवारण मंचच्या अध्यक्षा ज्वाला जांबुवंतराव धोटे यांनी कमलेश, त्याची आई मीना आणि भाऊ मुकेश यांनी सादर केलेल्या बनावट दस्तऐवजांविरोधात सिटी सर्व्हे कार्यालयात २९ मे २०२५ रोजी लेखी तक्रार केली होती.

# कार बुक करीत बकऱ्या चोरी

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :**
वाहतूक कोंडी, ड्रायव्हिंगची कटकट आणि पार्किंगची डोकेदुखी टाळण्यासाठी नागपूरकर ओला-उबेर कार बुकिंगला फ्रेंडली झाले आहेत. ज्यांना दूरवरचे अंतर गाठायचे आहे, ते झूम कार बूक करीत सोयीचा मार्ग निवडतात. आजवर हे एकीवात होते. मात्र कारची बुकींग करून बकऱ्या चोरून नेण्याचा अफलातून प्रकार समोर आला आहे.

बकऱ्यांची चोरी करण्यासाठी एका टोळीन चक्क झूम कारची बुकिंग करीत ग्रामीण भागातून २२ बकऱ्या चोरल्याचे पाहून पोलिसही भांबावून गेले.

जावेद खान अश्फाक खान (वय ३२, वाईट चर्च, पलोटी नगर गोरेवाडा), अभिषेक योगेश तागडे (वय २२, सुरेंद्रगड, सेमिनरी हिल्स), उस्मान खान अकबर खान उर्फ इरफान (वय २१, बरकते रजा मस्जिद, कामगार नगर), अक्षय मनोज पंचलवार ( वय २६, इंगोले लेआऊट गोधनी), बाबू उर्फ मायकल गुड्डू (वय १८, रा. ढोरे लेआऊ, मानकापूर), तुषार अनिल शर्मा,( रा. मानकापूर), भुऱ्या उर्फ प्रकाश माहुरे ( ४०, रा. चंद्रकला नगर, तांडापेठ) अशी या अफलातून शक्कल लढविणाऱ्या बकऱ्या चोरांच्या टोळीतल्या सदस्यांची नावे आहेत. चोरट्यांनी यातील काही बकऱ्या भुऱ्या उर्फ प्रकाश माहुरे याला विकल्या आहेत.

जलालखेडा पोलिसांनी या आठही जणांवर गुन्हे दाखल करीत त्यांना अटक केली असून त्यांनी चोरीत वापरलेली महिंद्रा बोलेरो (एम. एच. २१, सी. २१३२) , मारुती सुझुकी एक्सप्रेसो (एम. एच. ४९, बी. डब्ल्यू ७२६४) ह ६ भ्रमणदूरध्वनी, रोख ८० हजार असा ९ लाख ३३ हजारांचा माल हस्तगत केला. याप्रकरणी तपास सुरू आहे.

## वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

■ **महासागर प्रतिनिधी वणी / यवतमाळ, दि. २२ :**
अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना वणी मुकुटबन मार्गावरील साईलिला नगरी जवळील राज डिलक्स बियरबार जवळ घडली. अमर रतन करसे (वय ४५) वर्ष रा. सेवानगर असे या अपघातात ठार झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे.

अमर करसे हे झरीजामणी ग्रामीण रुग्णालयात कर्मचारी म्हणून कार्यरत असल्याचे समजते. रुग्णालयातील रात्रपाळीतील कर्तव्य आटपून ते सेवानगर येथे आपल्या घरी परतत असताना वणी मुकुटबन मार्गावरील साईलिला नगरी जवळील राज डिलक्स बियरबार जवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

# उपराजधानीत पुन्हा एका उड्डाणपुलाची भर

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**
नितीन गडकरी यांनी केंद्रात रस्ते व परिवहन खात्याचा कारभार सांभाळल्यापासून देशभरात रस्ते बांधणीला वेग आला आहे. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत रस्ते, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, बोगदे उभारण्यात येत आहेत. नागपुरातही मोठ्या संख्येने उड्डाणपूल बांधण्यात येत आहेत.

अमरावती महामार्गावरील ब्लॅक स्पॉट संपवणे आणि वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मे २०२१ मध्ये दोन उड्डाणपूल बांधण्याचे काम हाती घेतले होते. त्यातील वाडी पोलिस स्टेशन ते गुरुद्वारा (१.९५ किमी) उड्डाणपूल सुरू झाला आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) ते नागपूर विद्यापीठ कॅम्पसपर्यंतचे (२.८५ किमी) काम अंतिम टप्प्यात आले आहे. १५ ऑगस्टपूर्वी हा उड्डाणपूल सुरू होणार आहे.

प्रारंभी ३१ ऑगस्ट २०२४ मुदत होती. ती वाढवून आता १ जुलै २०२५ झाली असताना अद्यापही काम न झाल्याने आता नवीन मुहूर्त पुढे आला आहे. गडकरी यांच्या पुढाकाराने प्रादेशिक परिवहन कार्यालयापासून तर वाडी पोलिस ठाण्यापर्यंतच्या ५ कि.मी. अंतरावर दोन उड्डाणपूल बांधण्यास प्रारंभ झाला.



अमरावती महामार्गावरील वाडी नाका ते वाडी पोलिस ठाण्यापर्यंतच्या सुमारे अडीच किमीचा उड्डाणपूल सुरू झाला. अमरावती महामार्गावरील उड्डाणपूल प्रकल्पात, फुटाळा तलाव चौक, विद्यापीठ कॅम्पस ते आरटीओ पर्यंतच्या पुलाचे काम रेंगाळले आहे. आरटीओ कार्यालयासमोरील जुन्या नाल्यावर पूल बांधण्याचे काम केले जात आहे. याशिवाय आरटीओ ते बोले पेट्रोल पंपपर्यंत काँक्रिट रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पहिल्या टप्प्यात प्रादेशिक परिवहन कार्यालय ते विद्यापीठ कॅम्पसपर्यंत उड्डाणपुलाचे बांधकाम हाती घेण्यात आले होते. मात्र अनेक अडचणीमुळे हा मार्ग तयार करण्यासाठी विलंब झाला आहे. सध्या नाल्याचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी जुलै २०२५ पर्यंतचा वेळ देण्यात आला आहे.

एकूण ४७८ कोटींच्या दोन उड्डाणपुलाला अतिरिक्त कालावधी लागल्याने प्रकल्पाचा खर्च वाढला आहे. आरटीओ कार्यालय ते रवीनगर चौकापर्यंतची झाडे तोडण्याची परवानगी उशिरा मिळाल्याने बांधकामाला उशीर झाला होता.